सहकारी-पुस्तक-माला.

दारिद्र्य घालविण्याचे सोपे उपाय

१

# औद्योगिक सहकारिता.


लेखक

श्रीकृष्ण.



प्रकाशक

आ. रा. गानू—सेक्रेटरी, गानू आणि मंडळी.

१५३ बुधवार पेठ, पुणें.

—:o:—

मुद्रकः—के. रा. गोंधळेकर, ' जगद्धितेच्छु ' प्रेस, शनवार पेठ, पुणें.

१९१३

किंमत चार आणे.

१२६
कृपया पुस्तके जपून वापरा
11 JAN 1994
१२६
ग 3

# अर्पणपत्रिका.

## मेहेरबान, आर. बी. यूबँक,

आय. सी. एस्.

रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज्
मुंबई इलाखा—पुणें, यांसः—

आमच्या इलाख्यांत सहकारिसंस्थांचें बीं रुजविण्यांत त्यांची निरपेक्ष मेहनत, या लोकोपकारक संस्थांचा परिपोष वाढविण्यांत दिसून येत असलेलें त्यांचें यशस्वी धोरण, अशा संस्थांच्या द्वारां गोरगरिबांविषयीं त्यांनीं दाखविलेली सदय कळकळ व यामुळें त्यांनीं संपादलेली लोकप्रियता, विशेषतः ही अल्पशी कृति लोकांपुढें आणण्यास त्यांच्याकडून मिळालेलें सहानुभूतिपर प्रोत्साहन इत्यादि त्यांच्या बहुमोल गुणांचें स्मारक ह्मणून हा माझा पहिलाच प्रयत्न त्यांच्या परवानगीनें त्यांस मी

**अर्पण करीत आहे.**

लेखक.

20 NOV 2013
भारतीय सौ. मं. पं. वाचनालय, [illegible]
ग ३

# प्रास्ताविक.

चतुःसीमांचें निसर्गदेवताच संरक्षण करण्यास सज्ज झाल्यानें तिजवर पूर्णपणें विश्वासून हिंदुस्थानदेश गेलीं कित्येक शतकें स्वस्थ चित्तानें अनेक बाजूंनीं निद्रासुखांत मग्न झालेला होता. त्या अवधींत त्यावर परचक्रें आलीं नाहींत असें नाहीं, व कित्येक अंतस्थ राज्यक्रांत्याही घडल्या. पण दैनिक व्यवहाराची किंवा पोटापाण्याची त्याला कधींही विवंचना पडली नाहीं.

ख्रिस्ती शकाचे पंधरावे शतकाचे आरंभीं जगाच्या एका भागांत एक क्रांति घडून येत होती. तिचा परिणाम उगमाच्या ठिकाणच्या लोकांस सुद्धां आरंभीं कळून आला नाहीं; पण दोन तीनशें वर्षांचे अवधींत तिनें जगांतील सर्व देशांत खळबळ करून सोडली. ज्यांची झोंप हलकी ते लवकर सावध झाले व खडबडून उठून आपल्या उद्योगासही लागले. कांहींना हालवून जागे करावे लागले व कांहींना तर अजूनही हादरवून धक्के देऊन जागे करावे लागत आहे.

विचाऱ्या हिंदुस्थानची अवस्था या दुसऱ्या कोटींत आली आहे. नैतिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अशा अनेक कारणांनीं येथील लोकांची मनःप्रवृत्ति एका विशिष्ट प्रकारची बनली होती. सुमार एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं याचा परिणाम असा दिसूं लागला कीं, स्वतःपलीकडे बहुजन समाजाची दृष्टी जाईनाशी झाली व तीही स्वार्थी बुद्धी बऱ्याच खालच्या पायरीची बनली होती. हिंदुस्थानवासी लोक म्हणजे एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें an aristocracy of beggars प्रतिष्ठित भिक्षेकऱ्याच्या स्थितीस येऊन पोहोंचले होते.

इकडे जगामध्यें होऊं घातलेल्या मन्वन्तरांत संपत्तीस विशेष मान मिळूं लागला, व त्याचें पर्यवसान तूर्त तरी तिजला देव पदाप्रत आणून ठेवण्यांत झालें आहे. पैशाकरितां व्यापार व व्यापाराकरितां जगभर धिंगाणा अशी परंपरा उत्पन्न झाली आहे. या परिस्थितींतून एकटा हिंदुस्थान कस

श्री. सौ. गं. पं.
[illegible], मेरु

अलिप्त राहणार ! बापडे हिंदुस्थानवासी तर हा सर्व प्रकार पाहून भांबावून गेले. यांचीं पेवें हंगामावर भरेनाशीं झालीं. बाहेर सावकार तर तोंड बाहेर काढूं देईनात. पुनः नवीन स्थितीची पूर्ण ओळख करून घेण्याइतकें शिक्षणही त्यांना मिळालें नव्हतें व अजूनही नाहीं. सरकारानें यांच्या मदतीस येऊन कांहीं कायदे केले; पण अफाट समुद्रांत ज्याप्रमाणें एखादा मधुबिंदु टाकल्यानें फरक होत नाहीं त्याप्रमाणेंच बहुतांशीं त्या कायद्यांची गति झाली.

याप्रमाणें हताश झालेल्या आपल्या बांधवांची अल्प तरी सेवा करण्याच्या इराद्यानें कांहीं उदार आत्मे आजमित्तीस पुढे आले आहेत, ही अत्यंत समाधानाची व आशाजनक गोष्ट आहे. वास्तविक पाहतां पाश्चात्य देशांत ह्यासंबंधीं खटपट करणाऱ्या लोकांपुढें इकडील लोकांचें तेज फिक्के पडतें. तथापि फूल ना फुलाची पाकळी ह्या न्यायानें हीही त्यांची खटपट ईश्वरासमोर रुजूच होईल.

धनिकांचे सान्निध्यांत गरिबांचें दारिद्य जास्त भीषण व दुःखप्रद होऊं लागतें. अशा वेळीं वाढत्या दारिद्याची लाट मागें खेंचून धरण्याकरितां सर्व जगभर प्रचंड अट्टहास चाललेला आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांचेकरितां अनेक वेळां अनेक ठिकाणीं रणें माजलीं, क्रांत्या झाल्या, पण उपयोग झाला नाहीं.

जेथें महान् महान् धन्वंतऱ्यांच्या जाज्वल्य औषधांचीही मात्रा चालत नाहीं तेथें यःकश्चित् बायाबापड्यांच्या व्यावहारिक तोडग्यांनीं अति उपयुक्त कामगिरी करून दाखविल्याचा अनुभव प्रपंचांत आपणांस नेहमीं येतोच. या न्यायास अनुसरूनच इंग्लंडांत लँकेशायर परगण्यांत रॉक नदीच्या कांठीं दहापांच कंगाल कोष्ट्यांनीं आपल्या संसाराचा बोजा हलका करण्याकरितां १८४४ सालीं एकमेकांच्या हातांत हात दिला. एकादशी, शिवरात्रीच्या दिवशीं देवाच्या द्वारीं पुष्कळ कंगाल लोक एक सुरानें हेल काढीत हातांत हात घालून सहकार्य करीत असतात. पण रॉकडेल गांवच्या कंगाल विणकऱ्यांच्या सहकार्यांत एक अपूर्व तेज सांठवलें होतें. आत्मविश्वासांत जें दिव्य तेज सांठवलेलें असतें त्याचें ओजस्वी कवच त्यांनीं आपल्या मळक्या कपड्याआड धारण केलें होतें. रॉकडेलच्या कोष्ट्यांनीं

स्वतःच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवीत असतांना आपल्या राष्ट्राचाही प्रश्न सोडवून दाखविला आहे. इतकेंच नव्हे तर रॉकडेलच्या क्षुद्र प्रयत्नाचा अवलंब आज मित्तीस जगांतील सर्व राष्ट्रांनीं केला आहे.

याच सुमारास म्हणजे सन १८४८ सालीं जर्मनींत दोन उदारचरित भूतदयेनें कळवळून गोरगरिबांच्या उद्धाराकरितां पुढें आले. श्रीमंतांनीं आपल्या जादा वित्ताचें साहाय्य गरजू गोरगरिबांस देऊन त्यांच्या करामतीवर तें दामदुप्पट करविणें म्हणजे संपत्ति, खाऊन पिऊन फस्त करण्याऐवजीं, पेरून भरपीक काढून घेणें होय, हें अर्थशास्त्रांतील तत्त्व ओळखून त्यांनीं देशांत एका अर्ध्या ठिकाणीं सांचलेले संपत्तिचे ढिगारे समतेनें पसरवून सर्वतोपयोगी करण्याचा उपाय काढिला.

असे हे उपाय आहेत तरी काय? ह्या उपायांस सहकारिता म्हणतात. युरोपमध्यें निरानिराळ्या देशांत निरनिराळ्या मार्गांनीं या उपायाचा अवलंब झाला आहे. जर्मनीनें या उपायाच्या जोरावर आपले मोडकळलेले उद्योगधंदे सांवरले आहेत. पंगू आयर्लंदनें आपल्या देशांतील शेतीभाती याच उपायानें वैभवास चढविली आहे. डेन्मार्क, स्वीडनसारख्या लहानग्या देशांनीं सुद्धां याच उपायानें आपल्या शेतीस औद्योगिक उत्क्रांतीचें स्वरूप आणून दिलें आहे.

मग असा हा कल्पद्रुम आपल्यास नाहीं कां मिळवितां येणार? येईल! तो मिळवितां येईल व आपणांस तो हवाही आहे. आपल्या ग्रामसंस्थेंत सहकारितेची ओळख सांठविली आहे. पण ही संस्था आज खुळीखुळी झाली आहे. ती उभी करण्यास आज आपणास सहकारितेच्याच जिन्यानें गेलें पाहिजे. आपल्याकडे शेंकडा ८० लोक शेतकरी आहेत. त्यांची अवस्था अत्यंत कंगाल आहे. त्यांची शेतीची पद्धत जुनाट असून निव्वळ पोटमारा वाढवीत आहे. शिवाय मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणीं यांत्रिक युगानें आपला अम्मल बसविला असल्यानें सहकारितेसारख्या उपायाचें सर्वांगानें आपणांस अनुकरण केलें पाहिजे. आजचा काळ कांहीं तरी विधायक कृति करण्याचा आहे. हवालदीलपणें दोष काढीत बसण्याचा नाहीं. प्रथमावेगाच्या भरांत दोषाविष्करण होऊन गेलें आहे. आज उपायचिंतनाचा काळ आहे. अनेक उपायांत सहकारितेचा उपाय आपणाला अजमावून पाहण्या-

चा आहे. सरकारही या नवीन उपायाची माहिती देण्याकरितां आज पुढें आलें आहे. परंतु आपणांसच या बाजूनें पुष्कळ करावयाचें आहे. तेव्हां आरंभीं आपल्यांतील जाणत्यांनीं या उपायासंबंधींची माहिती आपल्या बांधवांना आधीं करून दिली पाहिजे. सहकारितेची जाणीव लोकांत उत्पन्न करण्यास आपल्याकडे दुर्दैवामुळें अजून साधनें उपलब्ध नाहींत. लोकांस तर हा विषय अपरिचित आहे. शिवाय लोकांत शिक्षणाचें मान फारच कमी आहे. शेंकडा फार तर आपणांकडे २८ लिहिणारे वाचणारे सांपडतात. आपल्या राजभाषेंत विपुल पुस्तकसंग्रह आहे खरा. पण खुद्द मुंबई ईलाख्यांत इंग्रजी जाणणारांचें शेंकडा १॥ प्रमाण पुरुषांत सांपडतें, आणि स्त्रियांत तर ५०० मध्यें १ स्त्री इंग्रजी जाणणारी मिळते. युरोपमध्यें साक्षर लोकांचें शेंकडा ९५ प्रमाण आढळून येतें. जर्मनींत १९१० सालीं सैन्यांत जेव्हां नवीन भरती झाली त्यावेळीं नवीन उमेदवारांत निरक्षरांचें शेंकडा ·०२ प्रमाण मिळालें. शिक्षणाची आपणाकडे इतकी उणीव असतांना सहकारितेसारखा नवा विषय लोकांत रिघविण्यास किती नवीं नवीं साधनें निर्माण केलीं पाहिजेत याचा थोडासा तरी अजमास होईल. जें राष्ट्र आपल्या घटकावयव व्यक्तीची शिक्षणानें उन्नति साधण्यास अविरत खपत असतें तेंच राष्ट्र निरोगी असा प्लेटोचा अभिप्राय आहे. शिवाय नागरिकत्वाची योग्य कल्पना अंगीं भिनण्यास शिक्षणाची मातबर अवश्यकता आहे, याची ओळख आज आपणास झाली आहे. १४ व्या लुईसारखा महत्वाकांक्षी बादशहा आणि कोलबर्टसारखा साम्राज्यवादी मुत्सद्दी ! पण असल्या दर्पांक्रांत अमदानींतही राष्ट्रीय खजिन्याच्या किल्ल्या वागविणाऱ्या कोलबर्टनें राष्ट्राची धनोत्पादक शक्ति वाढविण्याकरितां शिक्षणप्रसारार्थ दीर्घ प्रयत्न केले होते. आपल्या राष्ट्राची धनोत्पादक शक्ति वाढविणें हें अत्यंत जरूर आहे. आपण आज दरिद्री आहोंत. आपल्या लोकांत उत्पादक धंदे चालविण्याची कार्यक्षमता कोठें कमी आहे तर कोठें अनुकूल साधनांचा अत्यंत अभाव आहे.. अशा परिस्थितींत राष्ट्रीय औद्योगिक सामर्थ्याचा प्रश्न लोकशिक्षणप्रसारावांचून लंगडाच राहणार. इंग्लंडांतील औद्योगिक सहकारी प्रयत्नांची या छोट्या निबंधांत जी माहिती दिली आहे तिजवरून वरील प्रमेयांतील सत्यता स्पष्ट होते. एके काळीं पोटाची टीचभर

20 NOV 2013

खळगी भरण्याकरितां ज्यांना दोन आण्याची वर्गणी जमा करण्यास महत् प्रयास पडले, त्या इंग्रज मजुरांनीं आज मित्तीस शिक्षणउत्तेजनार्थ एक प्रचंड संघ निर्माण केला आहे. लोक जेव्हां दारिद्र्याच्या गाळांत कुजत असतात तेव्हां त्यांना प्रत्यक्ष भुकेशीं झगडावयाचें असल्यानें त्यांचें मानसिक दौर्बल्य वाढतें आणि असलें हें दौर्बल्य कसल्याही प्रकारच्या उन्नतीस अपायकारक आहे. १९ व्या शतकांतील इंग्रज मजुरांच्या परिस्थितीचा जो चित्रपट आंतील पानांत जसाच्या तसा रंगविला आहे त्या वरून वरील विधानांस बळकटी येते. हा तिकडचा चित्रपट नजरे समोर असतांना आपल्याकडील परिस्थिती व तिकडची परिस्थिती यांत महदन्तर आहे असें सकृद्दर्शनीं जरी मनांत येऊं लागतें तरी दारिद्र्याचा शेणकाला सर्व देशांत सारखा सांचलेला असल्यानें अशा शेणखाईतून चित्तक्षोभक चळवळीसारख्या विषारी वृश्चिकांचा उद्भव होऊं देण्यापेक्षां सहकारितेसारख्या पवित्र आत्मयज्ञाची वेदी सारवून काढण्याकडे तिजमधील शेणकाल्याचा कसा सदुपयोग करितां येईल हें ठळक रीतीनें लक्षांत यावें ह्मणून हा औद्योगिक क्रांतीचा इतिहास खुलाशानें निरूपण केला आहे. चार्टिझम, कॉर्नलॉज, लुडाईटस वगैरेंच्या धामधुमीच्या वृत्तांतावरून तरी वाचकांनीं हाच बोध घ्यावयाचा आहे. दारिद्र्यामुळें टीचभर गचाळ खुराड्यांत आपल्याकडील शहरांत हल्लीं लोकांची होत असलेली खेंचाखेंची, कंगाल परिस्थितीमुळें कौटुंबिक अगर गृहशिक्षणाचा होत असलेला ऱ्हास इत्यादि गोष्टी लोकशिक्षणास अत्यंत विघातक ठरत आहेत. तेव्हां त्यापासून निघणारा प्रश्न सहकारितेच्या द्वारां स्वावलंबनपर कसा सोडवावा, हें आपणास रॉकडेलसारख्या संस्थेच्या मनोरम इतिहासावरून शिकतां येईल.

लोकशिक्षणाचें ध्येय म्हणजे लोकांना अनुकरणीय नागरिक बनविणें व त्यांचें शील उदात्त करणें हें होय. नागरिकत्वाचें प्रमुख लक्षण म्हणजे प्रत्येकानें समाजांतील आपली उपयुक्तता वाढविणें हें होय. ह्या लक्षणानुसार औद्योगिक सहकारितेच्या प्रयत्नांत उद्योगधंद्यासंबंधीं जें सर्वांगसुंदर पण स्वयंभु शिक्षण मिळतें त्यावरून अशा सहकारी चळवळीचें पुराण आपल्या लोकांपुढें निरंतर वाचल्यास तें हितप्रदच होणार आहे. सहकारितेमुळें धंदेशिक्षणाचा प्रश्न आपोआप सोपा होऊन आपल्या लोकांची उत्पा-

भीर

दन शक्ति वाढीस लागेल. जुने अर्थशास्त्रवेत्ते असें प्रतिपादितात कीं, व्यक्तिस्वातंत्र्य वाढविलें, व्यक्तिसुखाच्या कल्पना जोरावल्या म्हणजे राष्ट्रसामर्थ्य वाढतें. या प्रतिपादनांत उपयुक्ततेचा भाग इतकाच कीं, अशा कल्पना पूर्णतेस पावल्या-लोकांना धंदेशिक्षण मिळालें-म्हणजे देशाची उत्पादन शक्ति वाढेल, प्रापंचिक जिनसांची विपुलता होईल व एकंदरींत सुख आणि समृद्धी वाढेल. येथपर्यंतची व्यक्तिस्वातंत्र्याची ही मजल सुखावह दिसली खरी; तरी तिची वाढ होतां होतां जीवनकलहाच्या प्रखर वाळवंटांत एकदां कां ती येऊन थडकली म्हणजे त्यांतील लोकोपकारक आर्द्रता केव्हांच जळून जाऊन प्रखर उन्हाची उष्णता तापवूं लागते. इंग्रज मजुरांनीं सहकारितेचें जें एक साधन पत्करिलें, त्यांत व्यक्तिसुख सार्वजनिक सुखाच्या अंकित ठेविलें आहे. म्हणजे आपल्याकडे 'मी' ही व्यक्ति सर्वांच्या सुखाकरितां लीन असावी, सर्वजण तिच्या सुखाकरितां नसावेत, अशी जी एक सात्विक भावना आहे ती भावना सहकारितेंत सांठवलेली आहे हें निदर्शनास येतें. ह्या भावनेची जोपासना करण्याकरितां सहकारितेसारख्या लोकोपकारक उपायांचें चिंतन, मनन सर्वत्रांकडून करविलें पाहिजे. युरोपांत जेवढे सहकारी प्रयत्न झालेले आहेत तेवढ्याचा सुरम्य इतिहास त्यांच्या मनावर अनेक मार्गांनीं ठसविला पाहिजे. शिक्षणांत आपले लोक फार मागें राहिल्यानें त्यांच्या जाणिवेंत फार उणेपणा आहे. ही गोष्ट ध्यानांत घेऊन सहकारितेची एकच गोष्ट पुष्कळ पुष्कळ शब्दांत थोडी थोडी व पुनः पुनः निरनिराळ्या दृष्टीनें तीच ती सांगितली पाहिजे. वास्तविक थोड्या शब्दांत पुष्कळ माहिती सांगतां येईल पण नवा विषय समजावून घेण्याइतकी जाज्वल्य धारणाशक्ति सामान्य जनसमूहांत नसल्यानें तसें करणें निरर्थक होईल. इंग्लंडांत सहकारिसंघानें अप्रबुद्ध शिशूवर्गाकरितां एक व प्रौढ लोकांकरितां दुसरा, असा दुहेरी शिक्षणाचा कार्यक्रम आपल्या पुढें आंखून घेतला आहे. उल्फ सारख्या कसलेल्या लेखकानें हेंच धोरण लक्षांत वागवून पतपेढ्यांचा तात्विक इतिहास रचित असतांना सामान्य लोकांकरितां छोटेखानी पुस्तकमाला लिहिण्याचा क्रम ठेविला आहे. या धोरणानुसार प्रस्तुत लेखकानें हा प्रयत्न केला आहे. औद्योगिक सहकारितेच्या इतिहासांतील एक ठळक पान म्हणजे—सहकारी भांडार कसें उभारावें रॉक-

डेलचें अनुकरण कसें करावें, वाढत्या महागाईत संसारांत पुरवणूक शक्य तितक्या रीतीनें कशी पाडून घ्यावी.--वगैरे लोकांना सरळ साध्या भाषेंत वांचून दाखविण्याचा येथें प्रयत्न झाला आहे. वास्तविक देशाची उत्पादन शक्ति वाढविण्याकरतां सहकारितेचीं सर्व अंगें आपल्या लोकांस माहीत पाहिजे आहेत. आणि त्या धोरणानें ' सहकारिता आणि शेती '; ' सहकारिता आणि उत्पादक धंदे '; ' सहकारिता आणि शिक्षण '; ' पतपेढ्या ' वगैरे अनेकविध माहितीचीं छोटीं पुस्तकें हे तयार करीत आहेत.

युरोपांत Continuation Schools—नांवाच्या व्यापारी, मजुर, शेतकरी वगैरे लोकांच्या मुलांकरितां शिक्षणात्मक संस्था आहेत. वरील वर्गांतील लोक किंवा त्यांचीं मुलें आपापले धंदे करून आल्यानंतर रात्रौ अशा शाळेंत आपल्या धंद्यास अनुकूल आणि नागरिकत्वास साजेशा विषयाचें शिक्षण मिळवीत असतात. असे वर्ग जर आपल्याकडे, इंग्लंडमध्यें टोनबी हॉलसला वाहून घेतलेल्या विद्वान तपस्व्याप्रमाणें कोणी शिक्षण कामास वाहून घेणारे काढतील, इंग्लंडमधील माजी ख्रिश्चन सोशियालिस्टाप्रमाणें गोरगरिबांना उत्पादक धंदे चालवितां येण्यास शिकविण्यास Union Clubs काढतील तर अशी पुस्तकमाला तेथें वाचण्यास अत्यंत उपयुक्त ठरेल. लेप्झिक येथील शाळाधिकारी Osker Pache ह्यांनीं रात्रीच्या बैठका भरवण्याचा नवीन उपक्रम केला आहे. या बैठकांत निव्वळ गप्पा गंजिफांचे आखाडे नसून मजूर व धंदेवाले किंवा अनेक गोरगरिब यांना आयुष्यक्रमांतील उदात्त भाग गमती गमतीनें सांगण्याची सुरवात केली आहे. आपल्याकडील गांवोगांव चावड्या व देवळें यांचा असा उपयोग करून घेतां येईल. या ठिकाणीं अशा उपयुक्त विषयांचें ज्ञान करून देतां येईल. पॅच साहेबांनीं थोर थोर लोकांच्या जयंत्या, राष्ट्रीय महोत्सव वगैरे उत्साहजनक प्रसंगांचा या कामाकडे उपयोग करून घेतला आहे. गांवगन्ना असे किती तरी प्रसंग आपणास उपयोगी करून घेतां येतील. या शिवाय सार्वजानिक वाचनालयें व प्रत्येक शिक्षणसंस्था अशा ठिकाणीं अशा पुस्तकांची संख्या वाढती असली पाहिजे. सारांश, लोकांच्या प्रयत्नानें व पुस्तकांच्या साहाय्यानें सहकारितेचें शिक्षण देणाऱ्या मंडळ्या देशभर निर्माण होतील तर ओवेनच्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे

16 MAR 1990

"गेल्या २९ वर्षांत मॅजिस्ट्रेट किंवा वकिलांच्या मदतीविना आम्ही आपला चरित्रक्रम लोटला. आह्मांपैकीं एकासही एकसुद्धां कायद्याची शिक्षा, दंड अगर ताकिद भोगण्याचा प्रसंग आला नाहीं; आमच्यापैकीं एकासही लोकांच्या भूतदयेवर राहण्याचा प्रसंग आला नाहीं; एकासही दारूपाणी, नाटकतमाशा इत्यादि व्यसनांकडे वळण्याचा प्रसंग आला नाहीं; आम्ही आपलीं कामें वक्तशीर, अहोरात्र न खपतां, हौसेनें व निपुणतेनें उरकलीं."

असें ह्मणण्याची पाळी व महत्वाकांक्षा हिंदुस्थानांतील लोकांसही लवकरच उत्पन्न होईल अशी पूर्ण आशा वाटते. येथें हेंही कळविण्यास आनंद वाटतो कीं, मुंबई इलाख्याचे सहकारीखात्याचे हल्लींचे रजिष्ट्रार साहेब मेहेरबान आर. बी. युवॅंक, आय. सी. एस्., यांचेकडे हें पुस्तक परीक्षणार्थ ग्रंथकर्त्यानें पाठविलें, तेव्हां त्यांनीं तें कृपाळूपणें वांचून पाहून त्यावर आपला उत्तम अभिप्राय देऊन पुस्तक "most interesting and instructive" ह्मणून गौरव केला आहे. इतकेंच नाहीं तर तें स्वतःस अर्पण करूं देण्यांत आपल्या सौजन्याचा फायदा लेखकास देऊन त्यांस जें उत्तेजन दिलें आहे त्याबद्दल ग्रंथकार त्यांचा फार आभारी आहे.

येथें आणखी एक आनंदाचें काम मजकडे आलें आहे. तें आभार मानण्याचें. प्रस्तुत निबंधाचे कामीं अव्वलपासून अखेरपर्यंत रा. रा. कृ. म. संत, बी. ए. आणि लं. वा. मांडके, बी. ए., यांचें अत्यंत साहाय्य झालें आहे; किंबहुना अशा निरपेक्ष साहाय्याविना निबंधाचा गाडा पुढें रेटताच ना. त्याचप्रमाणें निबंधांतील विषयासंबंधानें लेखकास ज्या ज्या पुस्तकांची मदत लागली किंवा अजून लागत आहे त्या त्या संबंधानें लेखकास वेळीं अवेळीं रा. रा. वा. वा. ठाकूर यांना अत्यंत त्रास द्यावा लागला व तो त्यांनींही मोठ्या संतोषानें सोसला. तसेंच ह्या पुस्तकाचें काम जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक यांनीं नीटनेटकें करून देण्यांत विशेष सौजन्य दाखविलें आहे.

ह्या सर्वांचे लेखकातर्फे मी मनापासून आभार मानण्याची परवानगी घेतों.

वास्तविक ही प्रस्तावना कोणातरी अधिकारी माणसानें लिहिणें युक्त होतें. माझा या विषयासंबंधाचा अभ्यास किंवा अनुभव कमी असतांना केवळ स्नेहकार्य ह्मणून मी हें धाडस केलें आहे.

अकोला—वऱ्हाड. }
१।९।१९१३. }

वि. कृ. राजवाडे.



LIBRARY
Date 15 SEP 1980
BHOR
16 MAR 199

# औद्योगिक सहकारिता.

R. S. Pant Sachiv 30/4
III



# दारिद्र्य नाहींसें करण्याचे सोपे उपाय.

## उपाय १ ला.

### भाग १ ला.

—:०:—

ओसाड खेडें.

१. आपण खेड्यापाड्यांत, आपल्या मूळ गांवीं हवापालट करण्यास चार दिवस जर गेलों तर शिवेच्या आंत पाऊल घालतांच किती मन उदास करणारा देखावा दृष्टीसमोर येतो! लहानपणीं टुमदार वाटत असलेलें तें सुंदर गांव आज उजाड दिसूं लागतें. तेथील जुने भव्य वाडे ओसाड पडले झडलेले दिसूं लागतात. हिरवीगार शेतें, फुलांफळांनीं बहरलेले मळे आबाळलेले, माळरानांच्या स्थितीला आलेले नजरेस येतात. कारण, शेतमळे जिवापाड कसून पोटापुरतें पीक जमिनींतून काढण्यास शेतकऱ्यांजवळ त्राण उरलेला नाहीं. सालोसाल पावसानें डोळे वटारल्यानें तो हैराण होऊन अनायासेंच सावकारांच्या सावलीखालीं जातो. अखेरीस कर्जाखालीं पुरा डुबून जाऊन, घरा-

दाराचा उन्हाळा झाल्यामुळें शेतवाडी सोडून मुलांबाळांसुद्धां तो परागंदा होऊन पोटाची खळगी भरण्याकरितां देशावर वणवण करीत भटकूं लागतो. यामुळें गांवांत शिरल्यावर सुद्धां जुन्या ओळखीचीं माणसें क्वचित्‌च पुनः आपल्या दृष्टीस पडतात. शेंकडा ८० लोक आपल्याकडे शेतीभातीवर उदर निर्वाह करणारे आहेत; आणि हे सगळे देण्याच्या बुजबुटानें गांजून गेल्यानें, आपली 'हरळीची मुळी' मोठ्या नाखुषीनें सोडून, पोटापाठीमागें देशोधडीला उधळलेलें असतात.

रंजला शेतकरी.

२. गावांत आणखी पुढें जावें तर ढुंगाला लंगोटी व डोक्याला रकटें गुंडाळलेला, थंडीवाऱ्यांत कुडकुडत असलेला, एक वाकळ पांघरून, मोट नाड्याचें ओझें खांद्यावर घेऊन शेतावर निघालेला शेतकरी आपल्याला भेटतो. कोण बिचाऱ्याची हैराण दशा असते! डोईवर सूर्यनारायण तापतच असतो. जमीन तापून सर्वत्र रखरख पसरली असते. खरपूस उन्हातान्हांत नांगरणी करीत खपत असतांना बिचारा घामानें डवडवून जातो. पावसाळ्यांत संततधार कोसळली असतांना अखंड दिवस चिखल पाण्यांत डुंबून लावणीची घात बिचारा सारखी साधात असतो. हिंवाळ्यांत ऐन थंडींत, गार वारा घोंघावत असतांना एका पटकुरावर शेताची तो राखण करतो, अगर जित्रवास पाणी देण्याकरितां वाफ्यांचीं दारीं मोडतो. पण त्याचा वाली कोण? इतकेंही करून भुकेच्या वेळीं त्यास कसलें सुग्रास अन्न मिळत असेल, अशी तुमची कल्पना आहे? काळ्या कुळकुळीत ढेंकळावर ज्वारी बाजरीची वाळलेली भाकर, चण्यानाचण्यांची उसळ, कांदा मिरचीची चटणी, हींच त्याचीं पंचपक्वान्नें. आणि हेंही जेवण कोरडेंच. दुधातुपांत ओलें करण्यास बापड्याला कोठून अनुकूलता असणार?

श्रीमंत सौ. गं. पं. वाचनालय, भोर



कारण, पाऊसपाण्याच्या सदा ओढाताणीनें त्यांच्या गुराढोरांचा पार फडशा उडालेला असतो.

कुजट खुराड्यांनीं बुजबुजाटलेलीं शहरें.

३. सोडा हें ओसाड खेडें. अंतःकरणांतील कालवाकालव क्षणभर दाबून ठेवून बारामतीच्या गुऱ्हाळावर किंवा मुंबईच्या गिरण्यांत अगर गोद्यारेलवेच्या हमालखान्यांत चला जाऊं या. मुंबईसारख्या अफाट शहरांत आपल्या ओसाड गांवच्या कंगाल शेतकऱ्यांचे थव्यांचे थवे घामाच्या धारांनीं निथळत असलेले दृष्टोत्पत्तीस येतात. येथील कारखाने अशा मजुरांनीं किड्यामुंग्यांच्या वारुळाप्रमाणें चिकार भरलेले असतात. माजगांव, चिंचपोकळी, परळ अशा गिरण्यांच्या जागीं टीच टीच खुराड्यांत कोंकणी, घाटी लोकांचीं एकापेक्षां अधिक कुटुंबें जिकीरीनें गुजराणा करीत असतात. अशा खुराड्यांत जेवणखाण, निजणें सवरणें, बसणें उठणें, सर्वांचें एकेच ठिकाणीं. तेथेंच पोरेंबाळें, तरुण मुलें मुली, म्हातारे म्हातारी, एका दावणींतच रात्रीं मुक्कामास असावयाचीं. पहाट फुटते न फुटते तोंच हे अभागी मजूर, आपल्या बायकांमुलांसुद्धां गिरण्यांच्या चार भिंतीआड एकदां त्या कारखानेवजा तुरुंगांत जाऊन हजर झालीं कीं, दिव्यांत वात पडल्यावर घरच्या वाटेला लागावयाचीं. बरें, कोंडवाड्याच्या बाहेर आल्यावर यांचीं तीं खुराडीं तरी मनाला क्षणभर संतोषविणारीं, विश्रांति देणारीं असावींत ! पण हें कसें व्हावें ? कारण, घाण पाण्याच्या सांचवणीनें ठिकठिकाणीं पाणोठा झाल्यानें त्यांच्या सगळ्या घरादारांत कचकचीत ओल सांकून भिंती सुद्धां बुरशानें मढविलेल्या असतात.

शहरांतलें अठरा विश्वे दारिद्य.

४. अशा तऱ्हेनें शहरांतल्या मजुरांच्या वांट्याला हाल अपेष्टा आलेल्या असतात. आपद्धा कर्जाच्या आंचीनें होरपळून जाऊन घरदार, शेतवाडी, चीजवस्त,

सौ. गं. पं. वाचनालय भोर

सर्व सावकाराच्या घरांत घालून, आगींतून निघाला खरा, पण शहरांतल्या या फुपाट्यांत येऊन पडला. अशा शहरांत कोण विलक्षण महागाई ! घरांत पोराबाळांचा जंजाळ. यानें दोन्ही दोन्ही हातानें मिळवावें; बायकोनेंही मोलमजुरी करून मीठ मिरची पुरती कमाई करावी, तरी पण पोटभर तुकडा कसा मिळेल, ही मागची नित्याची विवंचना केव्हांच संपू नये ! यानें त्रासून जाऊन दारू पाण्याच्या नादानें मनास किंचित् विसर पाडीत असावें. गिरण्यांतील सतत घरघरीनें किंवा विसाव्यास क्षणही न मिळतां पाठीचा कणा मोडे इतकें एकसारखें काम पडत गेल्यानें यास थकवा यावा, याचें डोकें भणभणूं लागावें, याच्या पोटांत आग पडावी, यानें अल्प खर्चानें—सवंग मिळणारें—चहाचें पाणी पोटांत घालून, भूक मारून पुन: डोळे बांधून घाण्यास मान द्यावी, अशा विकट परीस्थितीमुळें शहरांतल्या मजुरांच्या आयुष्याची दोरी कुजत कुजत जाऊन ती निम्या अधिक प्रमाणावर गळूनही गेली आहे.

१९ व्या शतकांतील इंग्लंडच्या परिस्थितींशीं साम्य.

९. एकोणिसाव्या शतकारंभीं इंग्लंड देशाची याहीपेक्षां जास्त भयंकर दैना झाली होती. यंत्रकलेचा त्यावेळीं कोठें नुकताच उदय झाला होता. हजारों धंद्यांत तिचा उत्तरोत्तर शिरकाव होत जाऊन हजारों हातउद्योगधंदे करणाऱ्या लोकांचे धंदे बसत गेले होते. गेल्या शंभर वर्षांत आपल्याकडील अनेक धंद्यांत विणकऱ्यांच्या धंद्याचा असाच धुव्वा उडाला आहे. कारण, हातमागावर साळी जें हातानें करी, तें वाफेनें चाललेल्या मागावर, यंत्राच्या जुळणीनें होऊं लागल्यानें एक कोष्टी जेथें एका हातमागावर एक धोतरजोडा तयार करीत होता, तेथें एका कोष्ट्याच्या देखरेखीखालीं २०।२५ माग वाफेनें चालून त्यावर रोज दरमागीं ८।१० धोतरें तयार होऊं लागलीं. त्यामुळें मजुरांच्या पोटाच्या सोई बसत चा-

ल्ल्या. अशा प्रसंगांतच तिकडे दुष्काळाचे दिवस व लढायांची धामधूम यांनीं शेतीची राळ केल्यानें शेतकरी शहरांत पाट्या वाहण्यास सैरावैरा धावूं लागले.

६. गेल्याच सालीं पंचमहाल, गुजराथ या प्रांतांत दुष्काळानें कोण कहर उडविला? यंदा नगरची काय अवस्था आहे? आपल्याकडे दुष्काळानें दरवर्षीं गांवचे गांव उठून जात आहेत, बेचिराख होत आहेत. काल धनी ह्मणवून घेणारा पाटील आज नोकरपेशांत राबत आहे.

बारंवार पडणारे दुष्काळ.

७. इंग्लंडमध्यें कारखाने निघाले खरे, पण तेथें तरी पोटापाण्याची कोठें शाश्वती होती! दररोज नवा शोध लागे. दर दिवशीं यंत्रांत नवी सुधारणा होऊन थोड्या मजुरांवर पुष्कळ कामाचा उठाव होई. यामुळें हातोहात लोकांचे रोजगार केव्हां बुडत याचा नेम उरत नसे.

८. आपण इंग्लंडांतील यंत्रकलेच्या क्रांतीचा थोडासा इतिहास पाहूं. वाफेच्या शक्तीनें ज्यांत सर्व क्रिया होतात, अशा प्रकारचा माग १८७९ सालीं कार्ट राईट नांवाच्या एका इसमानें तयार केला. या पूर्वीं ५० वर्षें धावत्या धोट्याची कल्पना निघाली होती. रुंद कापडाचा आडवा ताणा घालण्यास जेथें पूर्वीं दोन माणसें लागत तेथें या धोट्याच्या कल्पनेमुळें एक मनुष्य पुरें पडूं लागलें. कार्ट राईटच्या शोधानें हातमागही बुडाला व धांवता धोटाही माग पडला. पुढें पुढें जास्त जास्त शोध लागून यंत्रांनीं चालविलेल्य-कारखान्यांत पुष्कळ दिवसांच्या अनुभवाची किंवा चतुराईची गरज न उरल्यामुळें थोड्या शारीरिक श्रमानें ते चालवितां येऊं लागले. यामुळें, नव्या यंत्रांच्या शिरकावाबरोबर लोक भराभर कामाखालीं होत. कारण, एकच मनुष्य

इंग्लंडांतील औद्योगिकक्रांति

१९।२० वाफेचे माग चालवूं लागला. इतकेंच नव्हे तर लहान लहान पोरेंसोरें, किंबहुना मुली, यांनासुद्धां हीं यंत्रें चालवितां येणें सोपें झाल्यानें गिरणीवाल्यांनीं त्यांचाच भरणा वाढविला. पोरांना मजुरी थोडी दिली तरी चाले. साहजिकच दिवसानुदिवस मजुरीचा दर बसत चालला. लोकांचा पोटमारा वाढत चालला. वतनवाडीचा मागचा आसरा तर केव्हांच तुटून गेला होता. अशा बिकट व उपासमारीच्या प्रसंगीं लोकांना दे माय धरणी ठाय असें झालें. पुरुषांच्या दोन्हीं दोन्हीं हातांनीं जेव्हां भागेना, तेव्हां गिरण्या, कारखाने यांचें जोंखड जूं बायका पोरांच्या मानगुटीला आलें. ह्यानें प्रपंचांत भर पडण्याच्या ऐवजीं संसाराची धूळदाण मात्र होत गेली. तरुणबांड पोरें व पोरी एकेच ठिकाणीं काम करण्यास येऊं लागल्यानें त्यांच्या नजरा उघड्या बनत चालल्या. कोळशाच्या खाणीसारख्या भयंकर भुयारांत उघड्या वाघड्या अंगानें व मेलेल्या नजरेनें एकमेकांची चेष्टा कुचेष्टा करीत काम करीत असतांना मुलामुलींच्या वर्तनांत शिथिलता यावी, चवढव व्हावी, हें अगदीं साहजीक होतें. व त्याबद्दल आईबापांना निमूटपणें डोळ्यावर कांतडें ओढून घ्यावें लागे; कारण, घरांत खाण्यासाठीं तुळतुळ करणाऱ्या कच्चाबच्चांच्या दोन प्रहरच्या सोईकरितां सगळ्यांच्या हातांनीं आणवेल तितकी मजुरी घरांत हवीच असते. कोंबडीप्रमाणें आईबापांनीं आपल्या लहानग्यांना पंखाखालीं घ्यावयाचें तें बाजूलाच राहून उलट त्यांना कोंवळ्या पाडसांना सुद्धां जड जुवाखालीं राबवावें लागे.

औद्योगिक क्रांतीमुळें लोक बे-

९. बायका पोरांची अशी सोप्यांत बिगार मिळूं लागली. त्यांतच कारखान्यांत आजची मजुरी आज रोखीनें हातावर पडूं लागल्यानें लोकांच्या झुंडीच्या झुंडी या हमालखान्याकडे वळूं लागल्या. याचा परिणाम मात्र असा

2 0 NOV 2013

कार व बेरोजगार होतात.

झाला कीं, कारखानदारांना जों जों सोपें सांपडत गेलें तों तों त्यांना पैसा जास्त जास्त मिळविण्याची हांव उत्पन्न होऊन त्यांनीं मजुरांना रात्रीं अपरात्रीं घाणा घुसळावयास लावावें, मालाच्या राशीच्या राशी उठवाव्यांत, मेहनतान्याचे निरख पाडून पाडून अगदीं उपासमारीपर्यंत खालीं ओढावेत. मजुरांत यामुळें बेकार स्थिती सारखी वाढत गेली. पुनः बाजारांत एकदम मालाचा भरणा जादा झाला कीं, बाजाराचीं मंदी व्हावी, बाजारभाव उतरले कीं, आपल्या नुकसानीची भरपाई करण्याकरितां कारखानदारांनीं आपले कारखाने तरी बंद ठेवून लोकांस बेरोजगारी करावें अथवा मजुरी कमी कमी करून त्यांना पोटाकरितां कर्जबाजारी तरी करावें. आधींच यंत्रें, कारखान्यामुळं शहरांत पोटभरूंची चिकार गर्दी; कारण, आंगण थोडें पण नाचणारे फार; त्यामुळें जागेचीं भाडीं वाढलेलीं, त्यांतच महागाई, कारण देशांतील शेतकीचा धंदा बसत गेल्यानें कारखान्यांकडे लोक सरसहा धांवत सुटल्यानें देशांत धान्याधुन्याचा दुष्काळ, पण कापडाचोपडाचा सुकाळ, अशी स्थिती उत्पन्न झाली. धान्य महाग, पण चैनीचा जिन्नस मात्र सवंग, ह्मणजे पोटांत मंद पण कपाळीं गंध अशी अवस्था झाली. रोजच्या रोज यंत्रांत नवीन सुधारणा व्हावी, रोजच्या रोज नवे नवे लोक बेरोजगार व्हावेत; धंद्याची अशाश्वती व्हावी; आज आहे आणि उद्यां नाहीं अशी लोकांत विवंचना पसरावी; शहरांतल्या चिकार गर्दीमुळें घाणेऱ्या, कोंदट अशा जागासुद्धां किड्या मुंग्यांप्रमाणें भरून जाव्यात; याचा परिणाम ह्मणजे रोगराईच्या सांथी पसराव्यात; ह्मणजे गरिबीबरोबर शरीराचा व मनाचा उभयपक्षीं कमकुवतपणा वाढावा; आनंद, समाधान आणि सुख ह्या गोष्टी स्वप्नाप्रमाणें व्हाव्यात; अशा एकंदर वाढत्या संकटांनीं मजूरवर्ग बेजार, जर्जर झाला, निराशेनें नखशिखांत डवडवून

गेला. काळ बदलत चालला होता. नवा मनु नुकताच सुरू झाला होता. जुन्याचा तर विस्कळ झाला होता. नव्याची छाप अजून बसली नव्हती. तेव्हां हा अदला बदलीचा काळ भेसूर, आ-क्राळ विक्राळ भासत असावा. परिणाम असा झाला कीं, दरिद्री लोक निराशेनें ग्रासून जाऊन संतापाच्या आवेशांत त्यांनीं यंत्रांची जाळपोळही आरंभिली. पण अशानें कां निभाव लागत असतो! मजुरांनीं आपलें वेतन वाढवावें अशीही मालकांजवळ याचना करून

लोक यंत्रावर राग काढतात.

पाहिली. तीही जेव्हां व्यर्थ गेली तेव्हां हतभागी लोकांनीं आपला तरुणोपाय आपणच काढला पाहिजे, आपले शत्रू आपण व आपले मित्रही आपणच. असा कोठें लिक् लिक् प्रकाश त्यांच्या डोक्यांत पडूं लागला. आणि म्हणून त्यांना एक उपाय सुचला. निरूपाय झाला ह्मणजे तो कोठेंही सुचावयाचाच. उघडच आहे, धनी ह्मणवून घेणारांस आपला स्वार्थ सुटेना व नोकरांनाही उघड्या डोळ्यांनीं प्राण देववेना. प्रथम प्रथम त्यांनीं मालकाजवळ हातपाय जोडून पोटाकरतां गयावया केली. पण श्रीमंतांस जेव्हां लोभ सुटेना, तेव्हां आपला भार आपणच वाहिला पाहिजे, आपली चिंता आपणच निवारिली पाहिजे, हें त्यांस वाटावें, यांत नवल नव्हतें.

दाट निराशेंत आशेचा किरण.

१०. आपली चिंता वारण्यास हताश झालेल्या इंग्रजी मजुरांनीं जो उपाय योजून पाहिला त्याचें नांव "**सहकारिता.**" सहकारिता हा शब्द प्रथम आपआपणास नवासा भासेल. तो नवा नाहीं. तुह्मीं शेतकरी असाल तर क्षणभर शेतांत चला. शहरवासी असाल तर जवळपासच्या टेंकडीवर चला. येथें अनेक मुग्यांचीं वारुळें तुम्हांला दिसतील. प्रत्येक मुंगी आपल्या सामर्थ्याप्रमाणें कण कण वाहून नेऊन एके

ठिकाणीं बेगमी करीत असते. निरनिराळ्या घरट्यांत आपला कण नेऊन स्वतंत्रपणें किंवा एकलकोंडेपणानें सांठवीत नाहीं. मधमाशांचें पोळें पहा, येथेंही तोच प्रकार दृष्टीस पडतो. येथें प्रत्येक सर्वांच्या हिताकरितां सारखी झटत असते. याचें नांव " सहकारिता ". आपल्याच पोळीवर तूप ओढणें ही स्वार्थदृष्टि झाली. सहकारिता याच्या अगदीं उलट शिकविते. एकच धोंड जर पुष्कळांवर डोकावत असेल तर प्रत्येकानें आपलें सामर्थ्य एकवटून, एकमेकांकरितां शक्त्यनुसार कामाचा वांटा उचलून, तें हलकें करण्यास झटणें, आलेल्या वावटळींतील तीव्रता विभागून घेऊन कमी करणें यालाच सहकार्य ह्मणतात. येरवीं जातां जातां रस्त्यानें कुत्रें हाडूक चघळतांना आपण कित्येक वेळां पाहतों. समोरून दुसरें एखादें कुत्रें यावें, ह्मणजे दोन्हींही कुत्रीं एकमेकांवर गुरगुरत असतात. शेवटीं होतें काय कीं, भांडतां भाडतां हाडुक तर गटारांत कोठें तरी गळून जातें; पण दोघेही एकमेकांवर चालून जाऊन परस्पराचीं चाभाडीं मात्र काढतात. माशांचेंही याच मासल्याचें उदाहरण आहे. उन्हाळ्यांत त्यांची खूप चैन चाललेली असते. पण पुढें कसें होईल, हा विचार त्यांना स्वप्नांत सुद्धां शिवत नाहीं. अर्थात् पावसाळ्याकरितां यांच्याजवळ कणाचाहा कुणगा नसल्यानें ह्या पटापट मरून पडतात. ही सृष्टींतील ह्मणजे बाहेरच्या जगाची गोष्ट झाली. आपण तर माणसें आहोंत. सृष्टींतील आपण सजीव पात्रें आहोंत. बाह्य जगांतील सहकारितेचें हें बहुमोल उदाहरण आपणास शिकलें पाहिजे.

*निसर्गरचनेंत सहकारितेची ओळख.*

११. पण आपल्याकडे सहकार्य कसें करावयाचें याची मूळपासून कल्पना आहे. प्रसंगोपात तिजवर गंज मात्र चढला आहे. तो आपल्याला घासून पुसून

*पण आपल्याकडे पाया आहे,*

इमारत रचली पाहिजे.

काढला पाहिजे. खेड्यापाड्यांतील प्रत्येक गोष्ट जर आपण लक्षपूर्वक पाहिली तर आपल्याकडे सहकारितेचीं किती तरी उदाहरणें ठळक रीतीनें नजरेस येतील. गांवच्या वाटा, ओढ्याच्या ताला, मारुतीचें देऊळ, हमाम्याची जागा, गांवच्या तालमी, कालाष्टमी सारखे उत्सव, वगैरे अनेक सहकारितेचींच उदाहरणें आपल्याकडे आहेत. लांब पल्ला कशाला, प्रत्येक गांवच्या चार वेशीआड जी अलुत्याबलुत्यांची संस्था नांदत असते, ती आज तागायत सहकारितेची मूर्तिमंत प्रतिमा आहे.

सुरुवात.

१२. प्रतिमा आपल्याकडे आहे, पण ती आज घासून घासून झिजून गेली आहे. तिला पुनः आकार आणणें आहे. काबाडकष्ट करूनहीं जेव्हां पोटास टंचाई येऊं लागली, तेव्हां इंग्लंडांतील मजुरांना परावलंबी जीविताचा वीट आला. एकानें खपावें व दुसऱ्यानें मलिदा खावा,ही स्थिती बदलून आणण्याचा त्यांनीं इरादा बांधला. आधीं मिळकत जेमतेम, त्यांतून जेव्हां वाणी उदमी खिशाला कातर लावूं लागले तेव्हां त्यांनीं हे मधले गुरव हुसकावून लावून काटकसर साधण्याचा प्रयत्न करून पाहण्याचा चंग बांधला. त्यांनीं असा विचार केला कीं, दररोजच्या दररोज आपण धान्य धुन्य, दररोजचा शिधा बाजारांतून किरकोळीनें आणतो, तो आपणाला महाग पडतो; त्यामुळें चांगला जिन्नस घेण्यास परवडतही नाहीं. या पेक्षां सर्वांनीं मिळून थोडे थोडे पैसे घालून पेठेंतून एकदम आणल्यास दोन पैसे कमी पडून ते खिशांत राहतील. गांवच्या दारूखान्यांत काम करणाऱ्या मजुरांनीं ही युक्ति चालवून पाहिली.त्यांनीं दररोजच्या शिध्यास लागणाऱ्या पैशांचा एक कुणगा करून त्यांत वर्गणीची थोडी भर घालून प्रपंचास लागणाऱ्या जिनसा ठोकळ दरानें संग्रहास ठेवल्या. या जिनसांचा पुरवठा प्रत्येकास करण्याकरितां त्यांनीं एक दुकान काढलें. अशा

दुकानापासून त्यांना चांगलाच फायदा पडूं लागला. एकाचें पाहून दुसरा धाडस करतो ह्मणतात; या न्यायानें उलवीचच्या लोकांचें दुसऱ्या अनेक मंडळ्यांनीं अनुकरण केलें.

१३. इंग्लंडमध्यें घरोघर भाकरीचें पीठ बाहेरून मोलानें दळून आणतात. आपल्याकडे ज्याप्रमाणें हल्लीं 'नागनाथ ग्राइंडिंग मिल्स' वगैरे गिरण्या निघाल्या आहेत, त्या नमुन्याच्या गिरण्यांचा फैलाव इंग्लंडमध्यें १८ व्या शतकांत झाला आहे. अशा या गिरण्यांपासून वास्तविक लोकांची सोय व्हावी; पण तसा प्रकार न होतां उलट गैरसोय मात्र वाढली. कारण, गिरणीवाल्यांनीं अद्वा तद्वा दर लावावेत. निर्मळ पीठ न देतां वाटेल तशी त्यांत भेसळ करावी. अशा प्रकारच्या महागाईस व त्रासास कंटाळून जाऊन हल नांवाच्या एका गांवीं गांवकऱ्यांनीं एकमेकांच्या मदतीनें—सहकारितेनें ( १७९५ त ) आपली स्वतःची एक गिरणी उभारली. असाच दुसरा प्रयत्न डॅव्हनपोर्ट नांवाच्या गांवीं झाला. थोडक्याच काळांत स्वावलंबनाची ही सोपी युक्ती लोकांस इतकी पटली कीं, सुमारें १८२०—३३ च्या दरम्यान १३ वर्षांच्या अवधींत सुमार ४०० वर असे सहकारी प्रयत्न झाले. १८३४ मध्यें ह्मणजे एकाच वर्षाच्या अंतरानें ही संख्या ३०० नें वाढली.

प्रथम प्रयत्न.

१४. स्वावलंबी प्रयत्नाचा आरंभ इंग्लंडमध्यें हा असा झालेला आहे. आपल्याकडे यंत्रकलेचा मनू जरी पूर्णाशानें सुरू झाला नाहीं, तरी औद्योगिक काय, किंवा शेतकीच्या काय, धंद्यांत चोहोंकडे विस्खळ झालेला आहे. आपल्याकडील जुने हातउद्योगधंदे मोडकळले आहेत. नवे बाळपणांत रांगत आहेत. अशा स्थितींत हजारों लोकांना उद्योग नाहींसा झाल्यानें ते शेतीवर जाऊन पडत आहेत. शेती तर जुन्या निरुपयोगी पद्धतीनें

आपण धडा कां घ्यावा ?

चालली असल्यानें, पोटापाण्याचा प्रश्न अति बिकट होत चालला आहे. अशा स्थितींत इंग्लंडच्या नमुन्या बरहुकूम आपणही प्रयत्न केले पाहिजेत. येवढी गोष्ट खरी कीं, कोणत्याही देशांत आरंभीं शूरपणा बराच होतो. त्याप्रमाणें तो इंग्लंडमध्यें झालाही. असे स्वावलंबी प्रयत्न इंग्लंडमध्यें ज्या ज्या ठिकाणीं नव्यानें सुरू झाले त्या त्या ठिकांणीं कच्च्या अनुभवामुळें आरंभीं आरंभीं ठेंचा या लागल्याच; लोकांनीं हातपायही गाळले. कारण हा प्रयत्न नवाच होता. लोकांच्या कसोटीस अजून उतरावयाचा होता; याचमुळें प्रथम प्रथम थोडी फसगत झाली.

# भाग २ रा.

——:०:——

## श्रीमंतीचा सदुपयोग.

१९. रंजल्या गांजल्यांस आपले ह्मणणें हाच श्रीमंतीचा सदुपयोग होय. श्रीमंतीचा असा उपयोग करणें, ज्यांच्या अंतःकरणांत रुजलें, त्यांनाच उदारचरित् ह्मणावयाचें. अशा उदारचरितांपैकींच रॉबर्ट ओवेन नांवाचा एक गृहस्थ होऊन गेला. ता. १४ मे सन १७७१ रोजीं हे गृहस्थ जन्मास आले. इंग्लंडांत वेलस नांवाच्या परगण्यांत अनेक डोंगराळ खेडीं आहेत; त्यांपैकीं न्युटन नांवाच्या एका खेड्यांत यांचा जन्म झाला. ह्या खेड्यास एका सत्पुरुषाच्या जन्मभूमीचा मान मिळाल्यानें तें तिकडील लोकांना अत्यंत पूज्य झालें आहे. रॉबर्टचे आईबाप आपल्या गांवांत मोठीं, भलीं, वळणदार, बाळबोध व मानमान्यतेचीं माणसें होतीं. यांच्या वडिलांचा जिनगरीचा धंदा असे. गांव पोष्ट मास्तरकीचा अधिकारही त्यांजकडेस असे. रॉबर्ट यांस सात भावंडें होतीं. सर्वांत हेच चलाख व हुशार असत. रॉबर्ट यांस बाळबोध शिक्षण मिळावें, अशी यांच्या वडिलांची मोठी महत्वाकांक्षा असे. कारण, देशकालमानाप्रमाणें त्यांचें वाचन ह्मणण्यासारखें बरेंच झालें होतें. रॉबर्टची वर्गांतील हुपारी पाहून त्यांच्या पंतोजींनीं वयाच्या सातव्या वर्षींच त्यास खालचे वर्ग शिकविण्यास पाठविलें होतें. शिवाय हा मुलगा मोठा रसाळ, विनोदी, सुशील आणि परोपकारी असल्यानें गांवांतील बहु-

महात्मा रॉबर्ट ओवेन.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात

तेक शिष्ट शिष्ट लोक त्यास आपलीं पुस्तकें मोठ्या आनंदानें देत. यद्यपि रॉबर्टना शाळेचा अनुभव फारच थोडे दिवस मिळाला. कारण, वयाच्या नवव्याच वर्षी त्यांना एका दुकानावर नोकरी धरण्याचा प्रसंग आला. तेथें त्यानीं एक वर्ष काढल्यावर लंडन येथें त्याच्या भावाकडे त्यांची पाठवणी झाली. दीड दोन महिन्यांच्या अवकाशांत तेथून त्यांची उचलबांगडी होऊन त्यांस लिंकन परगण्यांतील एका गांवीं रंगाऱ्याकडे नोकरी धरावी लागली. या ठिकाणीं मात्र त्यानीं बरींच वर्षें काढलीं. ह्याही नोकरीस त्यानीं लवकरच

बाल्य.

राम राम ठोकला. मँचेस्टर येथें यंत्रें तयार करण्याचा एक लहानसा कारखाना चालू होता. या कारखान्यांत त्यानीं भागी पत्करली. प्रथम प्रथम येथें त्यांचें बस्तान बरें बसलें. पण ह्याही धंद्यास त्यानीं लवकरच राम राम ठोकला. नंतर त्यानें स्कॉटलंड देशांत न्यू लॅनार्क नांवाच्या गांवीं एका विणण्या कांतण्याचे गिरणींत भागिदारी व मॅनेजरशीप पत्करली. येथून त्यांच्या खऱ्या चरित्रक्रमाला आरंभ झाला आहे.

लॅनॉर्क गांवच्या गिरण्या कारखान्यांची स्थिती.

१६. लॅनॉर्क गांवीं ज्या गिरण्यांचा ओवेन मालक झाला होता, त्या गिरण्यांतील कामकरी लोकांची हाल अवस्था अत्यंत हृदयद्रावक होती. ओवेनसारख्या कोमल मनाचे मनुष्यास तिनें तावडतोब चटका लावून सोडला. त्यांचीं तीं केंबळीं, चंद्रमौळीं खुराडीं निव्वळ काड्यांमोड्यांनीं किंवा शेणामातीनें मढवलेलीं होतीं. कोणाच्या घरांत खावयाला तुकडा नसे. आंगावर तर नुसतीं चिंध्याचिरगुटांचीं रकटीं असत. घरोघर बाटलाबाईचा फैलाव मात्र अघळ पघळ असे. दारिद्र्यामुळें हे लोक नेकी, सचोटी किंवा इमान या सर्व गोष्टीला ते अगदीं पारखे झाले होते. कसबी बदमाषगिरीनें प्रत्येकाचें डोकें जणूं

नासलेलें होतें. लॅनॉर्क गांवचे गिरणी मजूर ह्मणजे प्रत्यक्ष नरक कुंडांतल्या किड्यांप्रमाणें कालक्रमणा करीत होते.

दारिद्र्य दुर्गुण पोसतें.

१७. कोणींही गिरणीवाल्या मालकांनीं असल्या बदमाष लोकांची हाकालपट्टी करून त्यांच्या ऐवजीं मिळतील तितके साळसूद लोक आणून भरले असते. परंतु आपल्या चरित्र नायकाच्या स्वप्नांतही ही गोष्ट मनास शिवली नाहीं. उलट, कंगालखोरीमुळें गोरगरिबांचीं मनें गंजलीं आहेत; त्यांचें शील सुधारण्यास त्यांचें जीवित सुखमय केलें पाहिजे. त्यांच्या मनावर हळूं हळूं चांगुलपणाचा ठसा उमटविला पाहिजे. पामरानें तयार केलेल्या, निर्जीव यंत्राची घासून पुसून निगा चाकरी करण्यांत यावी, पण प्रत्यक्ष परमेश्वरानें निर्माण केलेल्या अति नाजुक पण सजीव अशा चालत्या बोलत्या यंत्राविषयीं सर्वांनीं बेफिकीर असावें, ही अत्यंत अनिष्ट गोष्ट होय, असें ओवेनचें मत झालें होतें. अशा अनेक प्रकारच्या भूतदयेच्या विचारांनीं रॉबर्ट ओवेनचें अंतःकरण कळवळून निघालें होतें.

शील सुधारण्यास स्थिती सूधारली पाहिजे.

१८. तो नुसत्या विचारानींच कळवळला होता असें नव्हे तर त्यानें आपलें कळवळयाचे विचार आचारांत आणण्याची ही योजना सुरूं केली होती. आपल्या परोपकारी कामास सुरवात प्रथम त्यानें आपल्या कारखान्यांतच केली. पहिली गोष्ट ह्मणजे त्यानें मजुरीचे निरख चढविले. पूर्वीं मरेमरेतो मेहनत घेऊन पोटावर मात्र मारीत हा प्रकार त्यानें बंद केला. भरपूर काम तर भरपूर दाम हा न्याय त्यानें सुरु केला.

दारिद्र्यांतली कीड काढली कीं मनांतली सुद्धां निघते.

दुसरी गोष्ट ह्मणजे आधींच मजूर दरिद्री, त्यांतून मरेमरेतों मेहनत घेऊनही, हाडांचीं काडें करून, मालक पोटभर अन्न व आंगभर वस्त्र पैदा करतां येईल इतका मुषाहिरा देण्यास कासकूस करीत;

बाजारांत जावें तर दुकानदार हलकीं सरभेसळीची शिधा सामुग्री पदरांत बांधून माती विकून सोनें उकळण्याचा प्रयत्न करीत. यामुळें

लॅनॉर्क गांवचा कोठा.

गोरगरिबांची नुसतीच नागवणूक होत असे. येवढेंच नव्हे तर ते दुकानदारांचे कायमचे ऋणकरी बनून त्यांची पावलों पावलीं फसवणूक व त्याबरोबर संसारांत परोपरीनें गांजणूक होत असे. हाही प्रकार ओवेनच्या मनावर ठिबला होता. या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून आपल्या कारखान्याला जोडूनच मजुरांच्या प्रपंचाला लागणाऱ्या अन्नवस्त्राच्या सामुग्रीची एक वखार काढली. या वखारींत हरवस्त हंगामाच्या वेळीं, योग्य कसोशीनें व रास्त निरखानें, पुनः रोखीनें खरेदी केली असून, लांकुडफाटीं, दूध, तूप, अशा ह्या नित्याच्या–प्रपंचांतील–जिनसा मक्त्यानें मागविल्या असत. इतकेंच नव्हे, तर ह्या जिनसा कामकऱ्यांच्या उंबऱ्यांत पडल्या भावाप्रमाणेंच मिळाव्यात अशी योजना झाली होती. ओवेनच्या या औदार्ययुक्त योजनांमुळें गोरगरीब का-

प्रपंच हलका झाला कीं आंगी हुशारी आलीच.

मकऱ्यांच्या मिळकतींतून २५ टक्के बचत होऊं लागली. मजुरींचे दर तर वाढले होतेच. त्यामुळें कामकऱ्यांच्या पोटाला आतां भरपूर तुकडा मिळण्याची सोय झाली.

१९. ओवेननें दुसरी एक मोठी कामगिरी केली. ती अशी

दारिद्र्य आणि आरोग्य यांची फारकत आहे.

कीं, त्यानें गोरगरीबांच्या आरोग्याची काळजी वाहिली. वास्तवीक अशी गोष्ट आहे कीं, दारिद्री माणसानें कशाची घाण करावी व कसली स्वच्छता बाळगावी ? नाकाला पदर लावण्यास बिचाऱ्याजवळ फाटकें चिंधूक तरी कोठलें असणार ? निरूपायानें ह्मणा कीं संवयीनें ह्मणा, घाण खताऱ्यांत त्याची दृष्टी इतकी मरून गेलेली असते कीं, "बाबा

ही घाण आहे, हा अपाय आहे, " असें त्यास सांगणें ह्मणजे त्यास संताप आणणें आहे. खऱ्या न्यायानें अगर सदभिरुचीच्या दृष्टीनें म्हटलें ह्मणजे त्याच्या हरिद्रावर तें डागण्यासारखेंच आहे. तेव्हां अशा कंगाल लोकांना स्वच्छता कशी राखावी हें शिकविणें कांहीं लहान साहान गोष्ट नव्हे. ही असाध्य गोष्ट साध्य करण्या करतां पदराला खार लावून घेऊन ओवेननें कामकऱ्यांच्या राहण्याच्या सोयीकरतां सुंदर चाळी बांधल्या. या प्रमाणें त्यानें कामकऱ्यांच्या मनांतील विवंचना कमी करविल्या, त्यांच्या करतां सुख सोयी वाढवून त्यांची राहाणी सुखावह केली. जमीन इतकी नांगरून निघाल्यावर तींत सुंदर वृक्षाचें बीजारोपणच करावयाचें उरलें होतें. हा वृक्ष ह्मणजे ज्ञानवृक्ष. आपल्या मुंबईचे घाटी, कोंकणी व देशावरील व गिरण्यांतील कामकरी यांना अक्षर ओळख सुद्धां नसते.

अज्ञान व्यसनांचा सखा.

यामुळें निव्वळ अडाणी समजुतीनें ते पुष्कळशा व्यसनांच्या तडाख्यांत सांपडतातही. तेव्हां व्यसनांपासून त्यांना दूर ठेवण्याचा सोपा उपाय ह्मणजे शिक्षण देणें. येवढ्या करतां ओवननें कामकऱ्यांच्या शिक्षणाच्या सोयी काढल्या. त्यानें निरनिराळे वर्ग काढले. तेथें मजुरास लिहितां वांचतां येणें, देशकालपरिस्थितीचें ज्ञान देणें, वगैरे गोष्टी शिकविल्या जात. मजुरास भलभलत्या मार्गानें करमणूक करून घेण्याची कूस राहूं नये म्हणून त्यानें त्यांच्या करमणुकीकरतां नवीं नवीं साधनें निर्माण केलीं. काबाडकष्टांत निरंतर खपणाऱ्या मजुरांना व्यसनापासून दूर ठेवण्याचा एखादा उपाय ह्मणजे त्यांच्या शिणल्या भागल्या शरीराचें व मनाचें गाण्याबजावण्याच्या मोहानें रंजन करणें. या मोहानें नुसता श्रम परिहारच होतो असें नाहीं तर त्यास संसारांत नवा हुरूप वाटूं लागतो.

रंजनाचीं साधनें म्हणजे उन्नतीचीं साधनें होत.

२०. मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न अशा रीतीनें सोडवीत असतानां त्यांच्या पोराबाळांच्या बिकट भविष्याची खडतर कल्पना ओवेनच्या अंतःकरणांत जागृत झाली. बालवयांतच यांच्यावर पांट्या टाकण्याचा प्रसंग येई. यानां दोन अक्षरांची ओळख कशी होईल, पोटाकरतां काबाडकष्ट करीत असतांनाच यानां निरनिराळ्या धंद्यांचें ज्ञान कसें मिळवून देतां येईल, वगैरे विचार ओवेनच्या मनांत उभे राहून, प्राथमिक शिक्षणाचा कठीण प्रश्न सोडविण्यास ओवननें कंबर बांधली. त्यानें लहान लहान मुलांकरितां नमुनेदार वर्ग काढले. अशा वर्गांत वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मुलांना हांसत खेळत शिकतां यावें अशी सोय काढली होती. बाराव्या वर्षीं आइबापांची परवानगी असेल तर या मुलांना ओवेन कारखान्यांत कामावर घेत असे. येथें अशा मुलांना सूत कामाच्या निरनिराळ्या पण लहान लहान धंद्यांची माहिती मिळे. यंत्रें बनविणें, लोखंड पितळेचें काम, बांधकाम, कांतीव आणि ओंतीव काम, वगैरे नाना हुन्नरांची माहिती मिळण्याची सोय केली होती. मोठेपणीं आजच्या लहानग्या मुलांना पोटाकरतां निव्वळ परावलंबी पेशा पत्करावा लागूं नये म्हणून मुलांनीं अक्षरशत्रू राहूं नये, येवढेंच नव्हे तर त्यांनीं धंदेशिक्षणही मिळवावें, अशा उदार धोरणानें प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न ओवेननें हातांत घेतला होता. येवढ्यावरच ओवेन स्वस्थ बसला नव्हता; तर, थोर वयाच्या मजुरांना सर्व साधारणपणें ज्ञानाचा फायदा व्हावा म्हणून त्यानें त्यांच्याकरतां व्याख्यानगृहें उभारलीं, पुस्तक संग्रहालयें काढून त्यांना वाचनाची गोडी लाविली.

आज मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय करणें ह्मणजे उद्यांचा त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविणें आहे.

कृपया पुस्तके १७ जपून वापरा

२१. एकंदरींत, आपल्या आश्रयास आलेल्या गोरगरिबांच्या आजच्या उद्याच्या दिवसाची काळजी वाहून त्यांना सुजाण व सुजन बनविण्याचा पाया रचून, " सहकारितेचा जनक," " प्राथमिक शिक्षणाचा पिता," " अनाथांचा वाली," अशा थोर थोर पदव्यांस ओवननें आपणास पात्र करून घेतलें. ज्या गांवीं ओवेननें येवढ्या थोर कामगिरीच्या पायाची उभारणी केली त्या लॅनॉर्क नांवाच्या लहानशा, अप्रसिद्ध खेड्यास एखाद्या क्षेत्राप्रमाणें आज पदवी आलेली आहे. हें खेडें आजमित्तीस सर्व जगास व्यावहारिक शिक्षणाचा एक नमुनाच होऊन बसलें आहे.

जे कां रंजले गांजले त्यास म्हणे जो कां आपुले—

२२. वरील सर्व सुधारणा ओवेननें कनवाळूपणानें केल्या होत्या; पण इतर बरोबरीच्या धंदेवाल्यांस त्या कशा रुचाव्यात ? बरोबरच आहे, परोपकार झाला तरी कोठपर्यंत ? पदरास खार न लागे पर्यंत. खुद्द ओवेनच्या भागीदारांस ओवेनची करणी नुकसानीची बाब वाटली. हा परोपकारी कसला ? गाठोड्यांतील विक्रीचीं वस्त्रें माळावरील दगड—धोंड्यांना लेवविणाऱ्या नामदेवाप्रमाणें हा खुळा आहे, असें त्यांना वाटे. याच्या नादानें आपल्या मात्र हातांत करोटी येणार अशी त्यांना धास्तीही पडली.

परमार्थाची मर्यादा कोठपर्यंत, तर पदराला खार न लागे तोंपर्यंत.

२३. वास्तविक, त्यांची ही भिती अगदीं निराधार होती. कारण, कामाचे तास कमी झाल्यानें कामकऱ्यांस मुबलक विश्रांति मिळून, दुसऱ्या दिवशीं हुरुपानें ते कामास हात घालीत. मजुरीचे दर

पण ही मर्यादा खोटी आहे. मनाची प्रसन्नता का-

यांची उभारीवा. ढविते.

वाढविल्यानें धंद्यांत त्यांना आतां किफायत पडूं लागली. किफायत वाढल्यानें धंद्याविषयीं त्यांस आपलेपणा वाटूं लागला. आपलेपणाच्या अभिमानानें ते आतां कामही काळजीकाळ्यानें करूं लागले. मनुष्य त्रासलाच असला ह्मणजे कशीबशी बिगार टाळूं लागतो. तो प्रकार आतां उरला नाहीं.

एकंदर जग सुखमय करून सोडण्याची ओवेनची महत्वाकांक्षा.

२४ अशा प्रकारानें कामकऱ्यांची व त्यांच्या बरोबर कारखानदारांची दिवसानुदिवस भरभराट होत चालली. या मुळें ओवेनला इतका दांडगा उल्हास उत्पन्न झाला कीं, कंगालखोरीमुळें—आपआपसांत नखा दातांचा खेळ करीत बसणाऱ्या एकंदर दरिद्री लोकांस जर आपणांस प्रेमळतेचे धडे देतां आले, एकमेकांचीं दु:खें आपआपसांत वांटून घेऊन जड संकटें कमजोर करविण्यास शिकवितां आलें, तर आपण देशांत, उत्तरटोंकापासून दक्षिणटोंकापर्यंत, आबालवृद्धांची जीवनयात्रा सुखमय करून सोडूं, अशा प्रकारचीं सुखमय स्वप्नें त्यास रात्रीं नव्हे तर दिवसां पडूं लागलीं.

त्या करितां त्याचे प्रयत्न

२५ आपल्याप्रमाणें सर्व धनिकांनीं विपत्तिग्रस्तांच्या हांकेला धांवून यावें, म्हणून त्यानें एका छापील यादींत आपले सर्व उद्देश नमूद करून, ती याद सर्व कारखानदारांच्या माहितीकरतां फिरविली. या यादींत आपण आजपर्यंत काय काय केलें, आपल्या योजनांमुळें आपले कामकरी तरतरीत, दणदाकट, व सुखी कसे बनले, त्यांच्यांत कामाची धम्मक कशी वाढली, त्यांना रुचकर अन्न व मुबलक विश्रांति कशी मिळूं लागली, वगैरे माहिती विस्तारानें दिली होती.

20 NOV



२६ पण धनाढ्य लोकांस ओवेनची ही कृति खुळचटपणाची वाटावी हें जगाच्या रहाटीस धरूनच होतें. आपण मजुरांचा मुशाहिरा वाढविला, त्यांच्याकडून कमी तास काम करवून घेऊं लागलो, बायका किंवा पोरें यांचीं स्वस्तांत मिळणारी मजुरी घालविली, तर उद्या पटापट धंदे बसून दिवाळीं काढण्याची पाळी येईल, असे हे स्वार्थपूर्ण बुद्धिवाद सांगूं लागले.

चांगुलपणाचें अनुकरण लौकर होत नाहीं.

२७ ओवेन येवढ्यानें निराश होणारा प्राणी नव्हता. त्यानें आपले प्रयत्न कसोशीनें सुरू ठेवलेच होते. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, ज्यांच्या हिताकरितां तो अहोरात्र खटपट करीत होता, तेच मजूरलोक दारिद्र्यानें आणि अडाणिपणानें इतके दुर्बुद्ध बनले होते कीं, ह्या स्वकल्याणाच्या योजना त्यांच्या आंगवळणी मुळीं म्हणून पडेनात. ओवेननें तर आज नुसता आरंभ करून ठेविला होता. आतां ओवेननें घालून दिलेला धडा कित्येक गोरगरिबांनीं प्रामाणिकपणें गिरविण्याचा प्रयत्न केला. सहकारितेचीं तत्वें शिकविणारीं कांहीं थोडीं वर्तमान पत्रेंही जागोजाग निघालीं. पण अनुभव आहेच कीं, कोणताही धडा ठाम होण्यापूर्वीं अनेक वेळां मोडून पुनः पुनः तो नव्यानें गिरवावा लागतो. सहकारितेचा योग्य मार्ग तर अजून लोकांस कळावयाचा होता. प्रथम प्रथम आपल्या प्रयत्नांत लोक इतके चुकले, इतके फसले कीं, बहुतेकांनीं हातपाय गाळले व त्यांना योग्य मार्ग दाखविणारीं वर्तमानपत्रेंही बुडालीं.

पाहिल्या प्रयत्नांतील ओबडधोबडपणा.

२८ असा एकंदर पहिल्या ५०।६० वर्षांच्या काळांतील घडामोडीचा इतिहास आहे. यांतील पहिलीं निम्मीं वर्षें ह्मणजे

सहकारितेच्या पूर्व तयारीची होत. तो आरंभीचा काळ होय. या पुढचा काळ ह्मणजे धडा नीटपणें शिकण्याचा होता. या काळीं पंतोजी कोण झाला, गायत्री मंत्र कोणी दिला, धडा कसा पाठ झाला, वगैरे मनोवेधक इतिहास आपण पुढें पाहूं.



# भाग ३ रा.

## एक नमुनेदार संस्था.

*राष्ट्रीय गोष्टींचा उगम खेड्यापाड्यांनींच होत असतो.*

२९. आपणांस सहकारितेचा धडा घालून देणाऱ्या ज्या एका नमुनेदार संस्थेची माहिती करून द्यावयाची आहे, ज्या संस्थेच्या बहुमोल उदाहरणानें जागें होऊन इंग्रज लोकांनीं आपल्या मुलांबाळांच्या तोंडांत घांस घातला आहे, त्या संस्थेचा जन्म एका लहानशा शहरांत झाला. पुष्कळ महत्वाच्या गोष्टींचा उगम गांवढ्या गांवांतूनच होत असतो. जन्माच्या वेळीं व ठिकाणीं या गोष्टी इतक्या क्षुद्र स्वरूपांत असतात कीं, त्यांच्याकडे सहसा कोणाचें लक्षही जात नाहीं. एकाएकीं मागाहून रानजाईच्या किंवा कस्तुरीच्या गंधाप्रमाणें जेव्हां सारें रान दरवळून जातें, तेव्हां कोठें हरिणा प्रमाणें चकित झालेले लोक इकडे तिकडे त्यांचा शोध घेऊं लागतात.

*रॉक नदीच्या कांठचें क्षेत्र.*

३०. इंग्लंडांत मँचेस्टर व लँकेशायर या दोन शहरांच्या दरम्यान, रॉक नदीच्या तीरावर रॉकडेल नांवाचा एक गांव आहे. युरोप खंडांत अनेक सुंदर सुप्रसिद्ध शहरें आहेत, ताजमहाला सारख्या सुंदर इमारती आहेत, अनेक अजब ऐनेमहाल, अनेक भव्य देवालयें आहेत. ह्या सर्व देखाव्यांच्या मनोहर जागा पहावयाचें सोडून कोणीही सूज्ञ मनुष्य रॉकडेल सारखा खेडवळ गांव पाहण्यास जाण्याचा अट्टहास करणार

नाहीं. १९०२ सालीं सहकारी चळवळ करणाऱ्या लोकांची एक जंगी परिषद मँचेस्टर शहरीं भरलेली होती. या परिषदेस अमेरिकेसारख्या दूरदूर प्रदेशांतून सुद्धां प्रतिनिधी आले होते. कौतुकाची गोष्ट अशी कीं, प्रत्येक प्रतिनिधि रॉकडेल गांवच्या सफरीस तेथून एखाद्या भाविक यात्रेकरूप्रमाणें गेला. एखाद्या क्षेत्रास निघालेल्या यात्रेकरूंत किंवा एखाद्या जत्रा यात्रेच्या ठिकाणीं जितकें अगत्य अथवा हुरूप नजरेस येतो तेवढें अगत्य आणि हुरूप या रॉकडेल क्षेत्राच्या दर्शनास निघालेल्या प्रत्येक प्रतिनिधीच्या अंतःकरणांत उसळत होतीं.

या क्षेत्रांतील दारिद्र्य आणि हार्द्रि.

३१. अशी काय मोहनी या गावांत होती? ती जी काय असेल, ज्या गोष्टींनें इतके भाविक यात्रेकरूं या गांवीं आकर्षिले असतील, त्या गोष्टीचा पूर्वापार संगतवार इतिहास आपण क्रमाक्रमानें समजाऊन घेऊं. १८४४ च्या सुमारास या गांवांतले बहुतेक लोक दारिद्र्यानें व भुकेनें आतोनात पीडिले होते. एकवेळ तुकडा आहे तर दुसऱ्या वेळेला नसावा. आंथरावयास केवळ भुसा असावा तर पांघरावयास निव्वळ आकाश अशा कठीण परिस्थितींत काळ कंठीत असणाऱ्या हजारों मजुरांनीं पोटभर भाकरी करतां मालकांवर रुसवा फुगवाही केला. पण उपयोग काय? रुसशील तर उपाशी मरशील या न्यायानें १८३० सालीं लोकांनीं संप केला, पण अखेर त्यांनाच घरीं उपाशी बसावें लागलें. १८४१ सालीं सुमारें १५०० लोकांना या गांवीं सबंध आठवड्याचे रु. १ आणे ६ प्रमाणें वेतन पडूं लागलें होतें, ह्मणजे सरासरी ३ आणे रोज पडला. ८९९ लोकांना यांही पेक्षां कमी ह्मणजे आठवड्यास अवघे १८ आणे मिळत, ९०८ लोकांना तर बाराच आणे पडत आणि १३६ लोकांनां तर

ज़ा 3

सबंध एक आण्याचा अवजड तनखा रोजीं पदरांत पडे, असें रॉकडेल गांवच्या संस्थेच्या अखबारनिसानें नमूद करून ठेविलें आहे.

३२. १८४३ च्या अखेरीस असा एक दिवस उजाडला कीं

पोटांत उजाडलें तेव्हां डोक्यांत उजाडलें.

या कहर परिस्थितीचा त्या दिवशीं अगदीं कळस झाला. खुद्द तो दिवस सुद्धां अगदीं अशौच किंवा ओका ओका भासत होता. आपल्याकडे आषाढांत असे दिवस उगवत असतात. हे मलूल दिवस आपली छाया मनुष्याचे मनावर उदासवाणी अशीच पसरतात. अशाच एका रडक्या दिवशीं रॉकडेल गांवच्या फलाणीच्या कारखान्यातील विणकर लोकांची स्थिती अगदीं हलाखीची झाली होती. मजूरी जेमतेमच मिळत असल्यानें कित्येक अर्धपोटीच होते. कित्येकांचा तर अज्जी धंदा गेला होता. कित्येक रुसून दुःखी कष्टी होऊन घरीं बसले. कांहीं परत कामावर रुजूं झाले. पण त्यांच्या मिंधेपणास पारावार नव्हता. त्यांच्या हालअपेष्टा सारख्या दुणावत चालल्या. आपल्याकडे सिन्नलर लोकांनीं केलेला संप व त्यामुळें अनु-

धनिकांची बेफिकीरी आणि निर्धनांचे हाल.

भवास आलेल्या हाल अपेष्टा लोकांच्या अठवणींतून गेल्या नसतीलच. या स्थितीचा परिणाम असा झाला कीं, असे दळिद्री व बेरोजगार लोक श्रीमंतांचा अत्यंत द्वेष करूं लागले. ज्यांच्या जिवावर कारखाने चालवावयाचे त्या मजुरांची स्थिती अशी फाटकी कां व खुशाल चेंडु मालकांनां गाड्याघोडीं कशीं उधळतां येतात! मजुरांच्या मुलांना बाळपणापासून हमालगिरी करावा लागावी व श्रीमंतांच्या मुलांनां शिक्षणाचा फायदा मिळून समाजांत त्यांस अनायासें महत्पद मिळावें, असा फरक कां? अशाच प्रकारचे असमाधानी विचार त्यांच्या मनांत कहर उसळूं लागले.

३२ इंग्लंडांतील मजूर आपल्याकडील मजूर लोकांपेक्षां जास्त शिकलेले व देशकाल परिस्थितीचें ज्ञान असलेले असल्यानें त्यांनीं स्वतःची स्थिती सुधारण्यासंबंधानें अनेक वेळां अनेक उपाय योजून पाहिले आहेत. एकदां त्यांना असें वाटलें कीं, राज्य चालविणाऱ्या लोकांत आपले कोणी पुरस्कर्ते लोक नसल्यानें आपली परिस्थिती सुधारण्यासंबंधानें कोणी विचारपूस करीत नाहीं. येवढ्याकरतां जे लोक श्रीमंत नाहींत व अगदीं कंगालही नाहींत—असे मध्यम स्थितींतील लोक राज्य कारभार करण्यास निवडून द्यावेत अशा बद्दल त्यांनीं १८३२ सालीं खटपट करून पाहिली. हे मध्यम स्थितींतील लोक तरी पायथ्याशीं लोळत असलेल्या गोरगरिबांचा हवाला घेतील असा त्यांना विशेष भरंवसा होता. या ठिकाणीं त्यांची निराशा झाली. पुढें त्यांना असें वाटलें कीं, समाजांतील गोरगरिबांपैकीं व्यक्तीनाव्यक्तीचा शिरकाव देशाच्या राज्यकारभारांत झाला ह्मणजे आपल्या दुःखाचें परिमार्जन आपण स्वतःच करूं या करितां त्यांनीं बराच अट्टहास केला. ही चार्टिझम नांवाची त्यांची चळवळही फसली. या फसगतीस आपआपसांतील दुही बरीच कारण झाली. याच वेळेस दुसऱ्या कित्येकांस असें वाटलें कीं, आपल्या देशांत धान्य धुन्य कमी पिकतें म्हणून आपली उपासमार होते; तर ज्या बाहेरच्या देशांत जें जास्त पिकतें तेथून तें जर इंग्लंडांत पुरवठ्यास आणलें तर सर्वत्र स्वस्ताई होऊन पोटमारा होणार नाहीं. ही कल्पना अमलांत येऊन परदेशचें धान्य आंत घेण्याची चळवळ कोठें यशस्वी होते

गोरगरिबांची धरपड.

लोक राजकीय सुधारणा योजतात.

राष्ट्रीय सनदेचा हक्क मागतात.

पुरवठ्याला बाहेरच्या देशांतले धान्य आंत आणतात.

आहे न होते आहे तोंच कित्येकांस असेंही वाटलें कीं, बाहेरचें

बाहेरचें स्वस्त धान्य आंत आल्यानें देशांतले धान्य पिकेनासें झालें म्हणून बाहेरचे बंद करतात

धान्य आंत येऊं लागल्यानें देशांतील लागवड अजिबात मागासली आहे; जेथें थोडें फार पिकत होतें तेंही आतां पिकेतनासें झालें आहे. ही स्थिती सुधारण्याकरतां बाहेरचें धान्य आंत मुळींच येऊं न दिलें पाहिजे. ही चळवळ आतां जोरानें उसळल्यानें देशांतील धारण एकाएकीं कडाडली. सर्वत्र एकच हाकाहाक होऊन गोरगरीब अन्नावांचून चरफडूं लागले. रात्रंदिवस हाडें उघाळून जेव्हां पोटमारा चुकेना, पोरेंबाळें उपासमारीनें जेव्हां पटापट प्राण सोडूं लागलीं, तेव्हां

पण सगळेंच ओंफस.

मजूरवर्ग अत्यंत हवालदील झाला. कोणत्या चळवळीस जेव्हां यश येईना तेव्हां निदान पक्षीं पाळ्या तरी कमी व मगदुराप्रमाणें टाकावयास लागाव्यात, या

कारखान्यांत तरी सुधारणा केल्या म्हणजे सुख होईल.

संबंधानें चळवळ सुरू झाली. या प्रमाणें कामाचे तास शिस्तींत आणण्याबद्दल तर कोठें कारखाने सुधराईबद्दल चळवळी सुरू झाल्या. यावरून इतकें उघड होतें कीं, लोकांना आपली परिस्थिती चांगली ओळखूं येऊं लागली होती, व ही परिस्थितीची

जाणत्यांच्या शिकवणींनें लोकांना येवढी आत्मखूण ओळखुं येऊं लागली होती.

ओळख लोकांना करून देण्यास ओवेनसारखे परोपकारी महात्मे, डॉ० किंग, किंग्स्ले सारखे समाजसुधारक यांनीं दिलेलें शिक्षण कारणीभूत झालें होतें. यांनीं लोकांना थोडें थोडें शिकवून जागें केलें होतें.

३३ अशा प्रकारें जागे झालेल्या लोकांना अन्नान्न दशा येणें

16 MAR 19

जागे झालेल्या लोकांना उपासमारीनें डवचणें म्हणजे चित्त्यास डवचणें आहे.

ह्मणजे दुर्दैवच. फ्रान्स सारख्या देशांत याचा परिणाम भयंकर झाला होता. इंग्लंडमध्येंही पोटाकरितां रंजीस आलेल्या लोकांनीं दंगेधोपे, जाळपोळ, नासधूस कित्येक ठिकाणीं केली. कित्येकांनीं आपला राग यंत्रावरच काढला. १८४३ सालीं रॉकडेल गांवांत उंबरोउंबरीं अशी स्थिती दिसून

लोकांनीं प्रथम मालकांची पायमळणी केली.

येत होती. क्षणोक्षणीं तेथील लोकांना घरादारास टाळा लावून परागंदा व्हावेसें वाटे. क्षणांत ते पुनः मालकांची पायधरणी करण्यास जात. पण मालक पडले श्रीमान. ते कां आपल्या खिशाला चाट लावून

रुसून पाहिलें.

घेतील! लोकांनीं अखेरचा उपाय ह्मणजे संप केला. संप तर पडलें सुडाचें अस्त्र. मालकांनीं ही कारखाने बंद ठेवून लोकांची खोड मोडण्याचा प्रयत्न केला. लोकांनीं ही आपला निश्चय तडीस लावण्याचा निर्धार केला. त्यांनीं संपामुळें उपाशी मरणाऱ्या लोकांकरितां वर्गणी जमा केली. शिवाय बेदाद मालकांनी लोकांवर नुकसानभरपाईचे दावे आणले. या दाव्यांत

पण रुसशील तर उपाशी मरशील.

गुरफटलेल्या लोकांच्या कुटुंबाचा परामर्ष फंडांतल्या वर्गणीनें होत असे. परंतु भिक्षेवर आणि लोकांच्या दयेवर कोणाचा चरितार्थ किती दिवस चालणार? कारण उभयपक्षींही तें वाईटच–पैसे घेणारास मिंधेपणा व देणारास ओझें.

३४ ही परिस्थिती सुधारण्याकरतां अनेक लोक आपआपल्या

आपणच आपले तारक अथवा आपणच आपले मारक.

बुद्धी प्रमाणें उपायांचा खल करीत. कोणी म्हणत दारूला आळा बसला पाहिजे. कोणी म्हणत राज्यकारभारांत सुधारणा झाली पाहिजे. रॉकडेल गांवीं असेच कांहीं चळवळवाले वाद-

विवादाप्रीत्यर्थ एके ठिकाणीं जमले होते. आपली परिस्थिति कशी सुधारेल यावर तेथें बराच उहापोह निघाला होता. या भवति न भवतीच्या प्रसंगीं चार्लस हावार्थ नांवाचा एक इसम बरेंच मन घालीत होता. अशाच एका प्रसंगीं तो पुढें सरसावून म्हणालाः—"बाबांनो आपली मिळकत तर वाढत नाहीं. आहे या मिळकतींच भागविलें पाहिजे इतकेंच नव्हे तर कांहीं निराळें करून दाखविलें पाहिजे. आपल्या सोडवणुकीचा खराखुरा मार्ग म्हटला ह्मणजे ज्या धंद्यावर आपण उपजीविका करतों ते धंदेच आपल्या मालकीचे करून टाकले पाहिजेत. प्रत्येकानें संसारांत थोडी फार हायगय सोसून, काटकसर करून अल्पस्वल्प मागें टाकीत गेलें पाहिजे. आतां मुद्दाम कांहीं शिल्की टाकूं म्हटलें ह्मणजे टाकतां येतेंच असें नाहीं. आपण २८ जण मजूर आहोंत, दरिद्री आहोंत; प्रत्येक जण प्रपंच करतोच आहे; किरकोळीनें दररोज पैशा अधेल्याचा जिन्नस वाण्या उदम्यांच्या दुकानांतून आणून गुजराणा करीत आहे; यांत आपली पैशाला पैशा प्रमाणें फसवणूक होत असते. ही फसवणूक जर थांबवितां आली तर आपल्याला काटकसर करून दोन पैसे गांठीला करण्याला उपाय सांपडला. ज्यांना ज्यांना अनुकूळ आहे ते काय करतात? ते हंगामा हंगामाच्या वेळीं प्रपंचाच्या सर्व वस्ता घाऊक रीतीनें खरेदी करून टाकून वर्षाची संसाराची बेगमी करून ठेवितात. या मुळें भाव जर मधींच कडाडले तर यांना जडीक जात नाहीं. शिवाय, या मधल्या वाण्या उदम्यांची भर होत नाहीं, मालही मूळ किंमतीस मिळून शिवाय चोख मिळतो, आपल्या

वादे वादे जायते तत्व बोधः

आहे यांत करून दाखवा.

दसका लकडी एक का बोजा.

हंगामाच्या वेळची खरेदी म्हणजे मिळकतीची वाढ होय.

जवळ घाऊक खरेदी घेण्यास पैसे नसल्यानें दुसरा एक अनिष्ट परिणाम आपणास पत्करावा लागतो, आपणास दररोजच्या शिधोरी करतां लागणारी बाजरी ज्वारी व कोरड्यासाची मीठमिरची रोज मुजरा हातावर पडे तो पर्यंत शेजारच्या शेटजीच्या दुकानांतून उधारपाधार आणावी लागते, शेटजी उधार देतो म्हणजे काय? प्रथम अव्वाच्या सव्वा भाव लावतोच, पुनः हवा तसा हलकासालका माल पदरांत बांधतोच, शिवाय मुद्दल उधार राहिलें म्हणून व्याजासकट मागाहून उगवणी करतो ती निराळीच. म्हणजे काय झालें? शेटजी सांगेल ते दाम, घालील तें माप व देईल तो पदार्थ, अशी स्थिती पत्करावी लागते. आधींच वेतन उपासमारीचें, त्यांतून वाण्याउदम्यानें खिशास कातर लावलेली व अखेरीस पोटांत घाण, गव्हार अन्नाचा भरणा, हीं परिस्थिती आपणास सुधारतां येईल.

वाण्याउदम्याचा फसवेपणा.

कशी म्हणाल तर आपणा २८ जणांस जो रोजमुरा मिळतो तो त्यानें घेऊन एके ठिकाणीं यावें. प्रत्येकाच्या प्रपंचास रोजीं चार आणे खर्च येतो असें समजा; संध्याकाळीं सुट्टी झाल्यावर प्रत्येक जण आपले चार आणे घेऊन जर एके ठिकाणीं आला तर २८ जणांचे प्रत्येकीं चार आणे मिळून ७ रु. एकंदर जमतील. हे सात रुपये घेऊन शेजारच्या शेटजीच्या दुकानीं किरकोळीनें सौदा करण्यास न जातां दाणेआळींत एकदम अर्धापल्ला ज्वारी बाजरी खरेदी करण्यास गेलों तर आपणांस आठ बारा आण्याचा फायदा तरी सहज सांपडेल, पुनः माल चोख मिळून वाढाव्यानें मिळेल, एक वर्षभर जर आपण निश्चयानें, परस्पर विश्वासानें आणि नेटानें अशी कळ सोसली तर पुढच्या वर्षाच्या तरतुदीसाठीं आपणां जवळ अलपस्वल्प भांडवल अगाऊ जमेल. असें तें जमत गेलें ह्मणजे

थेंबें थेंबें तळें सांचे.

पुढची पायरी. आपला बाजार जर गेल्या वर्षी दाणे आळींत दिवसा दोन दिवसाआड होत असे तर आतां सबंध वर्षाच्या बेगमी करतां भर पेठेंत—नानाच्या पेठेंत—आपणास खरेदी करतां जावें लागेल. जळण एकदम भर गाड्या तळावरून आणतां येईल; वस्त्रें प्रावणें मागावरून ह्मणा किंवा सट्या-नें ह्मणा विकत घेतां येतील. अशा धोरणानें आपली बचत विशेष होणार आहे.ती इतकी कीं,जर आपण आपला निश्चय कसोटीला लावला तर आपणां २८ जणांपैकीं, एकास बाकीच्यांच्या प्रपंचाच्या जिनसा पुरविण्याकरितां एक लहानसें दुकानच काढतां येईल. या दुकानांत माल मूळ किमतीइतका स्वस्त—ह्मणजे खर्चवेंच घालून ज्या मो-लानें तो पडला त्या किंमतीस तो मिळूं लागेल. तो निर्भेळ व खा-त्रीचा मिळेल. त्यांत वाण्याउदम्यांच्या नफ्याची कीड आपणास लागणार नाहीं. आपल्या फाटक्या संसारास पुरवठा येईल. ही शिंक्यावरची हांडी नव्हे. हा कांचेचा हारा नव्हे; हा भक्तीचा, हा भावाचा, हा प्रेमपुरस्सर सहाय्याचा प्रश्न आहे." युक्ति तर निघाली. पण ती फलद्रूप कशी झाली तें पुढें पाहूं.



दाखल नं ......
भोर

# भाग ४ था.

—:०:—

## एक नमुनेदार संस्था.

—:०:—

२

चार्लस हावार्थची सुप्रसिद्ध युक्ती.

३९ चार्लस हॉवार्थनें सहकारी प्रयत्नानें दुकान कसें काढावयाचें हा बूट मंडळी पुढें ठेविला खरा, पण तो त्या बैठकींत कित्येकांस रुचला नाहीं. दुकानें बुडतात असें त्यांचें ह्मणणें पडलें. हॉवार्थनें पुनः असा सल्ला दिला कीं, दुकानें जीं बुडालीं आहेत तीं उधारीच्या व्यवहारामुळें ठार झालीं असल्यानें आपण आपला व्यवहार उधारीचा ठेवावयाचाच नाहीं. यावर पुनः अशा शंका निघाल्या कीं, दुकान काढून जर दुकानांत आपलीच मंडळी माल घेण्यास आली तर बरी नाहींतर आसपास सवंग सौदा करण्यास गेली तर काय उपयोग? आपला अनुभविक सल्ला मसलतगार ह्मणाला, याला तोड अशी कीं, इतर जवळपासच्या दुकानदारांनीं जर केवळ चढाओढीनें भावाचा चडउतार चालविली नसेल तर त्यांच्या बरोबरीनें आपण रास्त निरख देत जाऊं इतकेंच नव्हे तर आपल्या कडील माल सचोटीनें व साजूक, खात्रीचा मिळेल. शिवाय, आपण आपल्या बचावासाठीं अभिमानानें हें दुकान काढीत आहोंत. हा अभिमान्यांचाच प्रश्न आहे. निरभिमान्यांचा नाहीं. व्यापारी जो अव्वाच्या सव्वा नफा घेतील तो तर आपण घेणार नाहींच, पण जो थोडा फार आपल्याला पडेल त्यांत बूडतूट फूट वजा जाऊन, खर्चवेंच काढून घेऊन शिल्की नफा आपण, आपल्या खरेदीच्या मानानें,

2 0 NOV 2013



आपआपसांत वांटून घेऊं. हें आपल्याकडे विशेष आहे. इतर दुकानदारांकडे नाहीं. आपल्या बाजूला सचोटी असल्यानें लहानापासून थोरांचा आपल्यावर विश्वास जडेल. आपल्या दुकानांतून थोडा फार नफा साल अखेर आपल्या हिश्यास येत गेल्यानें, थेंबें थेंबें तळें सांचें," या न्यायानें आपल्या ऐपतींत थोडी थोडी भर पडेल.

युक्ती निघाली पण भांडवल कोठें होतें?

३६ युक्ती लोकांनां पटली; इतकेंच तऱ्हे तर घरोघर चुलीपाशीं नवरा बायकोंत तिच्या संबंधानें चर्चाही सुरू झाली. अखेर, मांजराच्या गळ्यांत आतां घाट बांधावयाची कशी येवढाच बिकट प्रश्न उरला. सर्व मंगलकार्यांच्या सुरुवातीस प्रथम तांदूळ लागतात. हे फलाणीचे विणकरी तर गरीब, फाटके, पाजणी देणारे शिपी, यांनीं खिशांत किती जरी खोल खोल हात घालून चापसलें तरी बाहेर काय येणार ? आणि धंद्यास किती जरी लहान भांडवल लागत असलें तरी तें कसें जमा होणार ? विणकऱ्यांनीं अखेर असें ठरविलें कीं, २८ जणापैकीं प्रत्येकानें एक एक पौंड ह्मणजे १५ रु. वर्गणी करून मुद्दल जमवावयाचें. आतां १५ रुपयांची रक्कम एकदम देतां येणार नाहीं सबब आठवड्यास दोन दोन आणे जमेस घालून एकंदर रकमेची भरपाई करावी अशी सवलतीची सोय निघाली. प्रत्येकांकडोन ही दोन आण्याची रक्कम गोळा करण्या करतां त्यांनीं तीन मनुष्यांची नेमणूक केली; कारण वर्गणी देणारे एकमेकांपासून लांबलांबच राहत असत. असल्या भिकार वर्गणीकरतां या तिघां परोपकाऱ्यांनीं खडकाळ, दलदलीच्या अवघड रस्त्यांवरून लांब लांबचा प्रवास करून आपले पाय झिजविले आहेत.

भांडवल जमविण्याची युक्ती.

11 JAN 1954

३७ क्षुद्र कामा करतां येवढ्या कसोटीनें ज्यांनीं आपले श्रम

गरीब २८ विणकऱ्यांचा जयकार.

वेंचले, आज दिडकी दुगाणीही देण्याचें सामर्थ्य नसतांना केवळ उद्याच्या अशाश्वत आशेवर पण उत्साहानें स्वतःच्या पदराला अपरिमित खार लावून घेऊन ज्यांनीं गांठीचा पै पैसा सोडून आठवड्याच्या वर्गणीची भरपाई केली, त्या रॉकडेल गांवाच्या २८ गरीब विणकऱ्यांची कथा सत्यनारायणाच्या कथेंतील मोळी विक्याच्या कथेप्रमाणें जगाच्या कानाकोंपऱ्यांतून सांगण्यासारखीच झाली आहे. दारिद्र्य घालविण्याचा पहिला सोपा उपाय या अठाविसांनीं शिकविला. हाच पहिला बोबडा धडा आपणास आज शिकावयाचा आहे.

प्रसिद्ध रॉकडेल गांवाच्या सहकारी धुरिणांच्या कोठाड्या॰ प्रस्थापना.

३८ ता. २१ दिसेंबर सन १८४४ रोजीची संध्याकाळ, रॉकडेल गांवाच्या विणकरी लोकांच्या स्वावलंबी प्रयत्नांच्या इतिहासांत अत्यंत महत्वाची झाली आहे. गरीब लोक ह्मणजे भणंग, उनाड भ्रांतिष्ट, असा सर्व ठिकाणीं समज आहे. या समजानुसारच या विणकऱ्यांच्या प्रयत्नाची गांवांत टर चालली होती. या भिकाऱ्यांनीं एक दुकान काढून आकाशास हात घालण्याचें धारिष्ट केलें आहे अशी हूल लौकरच गांवांतल्या लहान मोठ्या उदम्यांत पसरली. आणि तें ठकित्र झालें, कारण फजितीचें कुडमुडें चारीदिशांनां लौकरच दुमदुमतें, पण यशाचा नगारा शेजाऱ्यास सुद्धां ऐकूं जात नाहीं. गांवांत गांव कुटाळ लोक काय कमी असतात? छिद्रावर टोंचावयास कावळे जसे तात्रडतोब जमा होतात त्याप्रमाणें ता. २१ दिसेंबरच्या रात्रीं रॉकडेल गांवांतले अनेक गांवकुटाळ लोक एके ठिकाणीं जमा झाले होते. मग असें या रात्रीं होतें तरी काय? कांहीं नाहीं. या

छिद्राच्या ठिकाणीं टोंचा मारण्यास कावळे कसें तयार असतात.

रात्रीं हे गरीब विणकरी पूर्वीं ठरविल्या प्रमाणें प्रापंचिक सामुग्रीचें एक दुकान काढणार होते. दुकान उघडण्यास रात्रीचा मुहूर्त धरला ह्मणून तो गोरज असावा असें कोणी समजूं नये. दमडी अधेल्याचें हिंगमिऱ्याचें दुकानांतील ऐश्वर्य दिवसा ढवळ्या समारंभानें उघडें करून दाखविण्याची कोणाची छाती नव्हती ह्मणून त्यांनीं रात्रीचा मुहूर्त धरला. या दिवशीं हे २८ वीर आपल्या नशीबाचा डाव टाकण्याकरतां एका घराच्या तळ मजल्याच्या अंधेऱ्या खोलींत कवाडें लावून बसले होते. कवाड सताड उघडें करून आंतलें ऐश्वर्य जागपुढें खुलें करण्यास कोणीं धजावेना. रस्त्यांत जमलेल्या तमासगिरांनीं आपल्याला असल्या कंगाल दुकानांत पहावें याबद्दल सर्वांस मनस्वी लाज वाटूं लागली. अखेरास एक धारिष्टवान पुढें सरसावला. भयंकर गर्दींतून घोरपडीच्या सहाय्यानें जणूं तटबंदी चढून किल्यावर निशाण नेऊन रोंवणाऱ्या वीराप्रमाणें त्यानें खिडक्या तर खडाखड खुल्या केल्या. दुकान उघडें झाल्याबरोबर टॉडलेनच्या सबंध गल्लीभर, जमलेल्या तमासगिरांत एकच हिः हिः हिः झाली. आंतील सामुग्री पाहतांच कित्येक कुटाळांनीं तर, "कशाला आठ दिवसानंतर दुकान उघडें राहते आहे, आहे काय आंत दगड धोंडे, करतील दोन दिवस हौस, टाकतील पैसे उधळून बसतील हाका मारीत झालें," असें भाकीतही बोलन दाखविलें.

३९ पण हें भाकीत खरें झालें नाहीं. कारण लौकरच या मूळ २८ सांचे ४० जण झाले. प्रत्येकानें थोडी फार जास्त वर्गणीभरून आपला भाग पुरा केला. दुकाना करतां १५० रु. सालाप्रमाणें त्यांनीं एक जागाही मुक्रर करून टाकिली. या २८ विणकरी मंडळींना "रॉकडेल गांवचे धुरीण"—रॉकडेल पायोनीयर्स—असें नांव मिळालें आहे.

कावळ्यांच्या आशिर्वादानें गाय मरत नसते.

४०. अशा प्रकारें दुकान निघालें. दुकानावर त्यांच्या पैकींच अॅशवर्थ नांवाच्या इसमास त्यांनीं स्वतंत्रपणें देखरेख करण्यास ठेविलें. प्रथम प्रथम चहा साखरेपासून त्यांनीं सुरुवात केली. घाऊक व्यापाऱ्या कडोन हे जिन्नस आणावेत व बाजार भावानें परस्परांत पुरवून घ्यावेत असा आपला सर्व व्यवहार यांनीं चोख, रोखीच्या तत्त्वावर सुरु केला. हळू हळू ते एक एक जिन्नस वाढवूं लागले. कणीक, लोणी, धान्यधुन्य अशा सारख्या, दररोज चुलीपाशीं लागणाऱ्या जिनसा एकामागून एक दुकानांत आल्या. पहिल्यानदां या जिनसा आपल्या बेताखातच दुकानांत येऊन पडत. कारण भांडवलच मोठें ना! बारदानाचा खर्चवेच वजा घालतां माल खरेदीस अवघे १४ पौं. ह्मणजे २१० रु. वाट्यास आले होते. येवढ्या रकमेंत काय काय व्हावें? अर्थात् दुकानांतलें सामानसुमान इतर दुकाना प्रमाणें झळक फळक रीतीनें मांडलेलें किंवा भरपूर साठ्याचें नसावें यांत नवल नव्हतें. कोणाही गिऱ्हाइकाच्या मनांत तें एकदम उतरेल असें नव्हतें. परंतु ज्या आत्मविश्वासावर या विणकऱ्यांनीं आपलें होडगें समुद्रांत ढकललें होतें तोच आत्मविश्वास, तीच कर्तव्यनिष्ठा, त्यांना उत्तेजन देऊन पुढें प्रेरीत होती.

*धुरणीच्या संस्थेची प्रगती.*

*आत्म विश्वास हा उन्नतीचा पाया आहे*

४१. संसारांत कोणतेंही पुण्यव्रत चालावावयाचें झालें ह्मणजे धर्मपत्नीची सहानुभूति अवश्य लागते. ती जर घेतली नाहीं अगर मिळाली नाहीं तर तो संसार केवळ असार होय. पतीनें चालविलेल्या पुण्यव्रतांत आडव्या येणाऱ्या बाया "अळी प्रमाणें दंड भोगतात." रुक्मांगद राजाच्या एकादशी व्रताआड आल्यानें त्याच्या स्त्रीनें संसाराचा केवढा अनर्थ करून टाकला होता? या २८ सांनीं जें सत्कार्य आरंभिलें होतें त्याच्या पुण्याहवाचनास त्यांच्या

स्त्रियांची मदत मिळणें अति जरूर होतें. या धुरीणांच्या बायकांस आपल्या पतींनीं शिरावर घेतलेल्या कामगिरीचें महत्व कळून चुकलें होतें. अर्थात् त्यांनीं आपापल्या परीनें यजमानांच्या हातास हात लावून चीज केलें. प्रत्येक बाई या दुकानांतूनच माल आणवीत असे. कित्येक बायांच्या घरीं कुटुंब मोठें असल्यानें या दुकानांत लांबवर जाऊन माल खरेदी करण्यास परवडत नसे. कारण हें दुकान वस्ती पासून एक दोन मैलांच्या अंतरावर असून दुकानांत मालाचा अपुरा सांठा असल्यानें केव्हां हेलपाटा पडेल याचा नेम नसे. शिवाय, कधीं कधीं तर भांडवलाच्या अभावीं एखादी जिन्नस दुकानदारासच महाग पडली ह्मणजे गिऱ्हाइकांस ती बाजारापेक्षांही महाग पडावयास जाई. पुनः आसपासचे दुकानदार या दुकानाची द्वेषानें नुसती नालस्तीच पसरीत येवढेंच नव्हे तर भावांत चढउतार करून ह्या दुकानाचा पाडाव करावयास झटत. सत्य संकल्पाचा दाता भगवान् ह्मणतात, या न्यायानें या २८ जणांच्या पत्नींनींही आपल्या पतींच्या पाऊलावर पाऊल टाकण्याचा निश्चय केल्यानें या संकटांतूनही त्यांनां निभावून जातां आलें.

*मंगल कार्याच्या पुण्याहवाचनास भार्येची अपेक्षा त्यांच्या कृतीचें*

४२. इतकेंच नव्हे तर आपल्या पतींच्या कार्याचें बाळकडू त्यांनीं आपल्या मुलाबाळांनांही पाजलें होतें. एक कथा अशी सांगतात कीं, एक लहान मुलगी इतक्या लांब या कोठ्याच्या दुकानांत जाऊन माल घेण्यास खळखळ करीत असे. ती आपली जवळपासच्याच परक्या दुकानांतून तो विकत घेत असे. तिला तिच्या आईनें एकदां शिकविलें कीं, "बाईग, आपलं कोठ्याचं दुकान तुझ्या बापानेंच काढलें आहे, मग आपल्या दुकानांत नाहीं कां जायचं? आपल्या दुकानांतला माल चांगला असतो, आणि तो खपला ह्मणजे

*कुळधर्म कुळाचाराची ओळख पोराबाळास घरांतील स्त्रियांनीं करून द्यावी.*

आपल्याला पैसे मिळतात, आणखी साल अखेर आपल्याला या दुकानांतून नफ्याचे पैसे बक्षीस मिळतात, देईल कां शेजारचा दुकानदार तुला ते? आणि हे पैसे आले ह्मणजे तुला परकर चोळी मिळेल, हवीना तुला ती?" निराळें सांगणें नकोच, मुलीची समजूत तावडतोब पटली व ती दररोज हौसेनें सकाळीं पहिलें काम ह्मणजे या दुकानाकडे जाण्याचें करीत असे. घरची मंडळीही ती तेथून पदार्थ घेऊन येईपर्यंत न्याहारी खोळांबून धरीत.

४३. रॉकडेलच्या अभिमानी कोष्ट्यांनीं स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा जो हा चंग बांधला त्याच्या मुळाशीं अनेक उदात्त तत्वें होतीं. पैकीं त्यांचे जे उत्तम उत्तम हेतु जाहीर झाले होते ते असेः—

*रॉकडेलच्या धुरीणांच्या कार्यातील उदात्त तत्वें.*

१ आपआपसांत गोरगरिबांची संसाराची घडी पैशा अडक्याचा फायदा पाडून देऊन, नीट करावयाची. तेवढ्या करतां १५।१५ रुपयांचा एक भाग करून तो प्रत्येकास अगदीं आपल्या सोयीप्रमाणें विकत घ्यावयास लावावयाचा.

२ हें भागरूपानें जें भांडवल जमेल त्यांतून प्रपंचास लागणाऱ्या अन्नवस्त्रादि जिनसांचा पुरवठा कोठा उभारून परस्परांस करून ध्यावयाचा.

३ आपल्या मंडळीचे राहाण्याचे हाल जावेत ह्मणून शक्यतर इमारती बांधावयाच्या, नाहींतर खरेदी करावयाच्या.

४ शक्य तितक्या जिनसा तयार करण्यास आपले स्वतःचे कारखाने उभारावयाचे. अशा कारखान्यांत आपल्या सभासदांपैकीं ज्यांना ज्यांनां उद्योग धंद्याची वाण असेल त्यांनां त्यांनां उद्योग लावून द्यावयाचा.

५ संस्था कायम चालावी ह्मणून जमीन जुमला वगैरे खरेदी घ्यावयाचा. तो ज्यांनां उद्योग धंदे नाहींत अशा सभासदांस कौलानें लावून द्यावयाचा.

६ सभासदांस दारुपाण्याचें व्यसन असल्यास, तें नाहींसें करण्याकरितां उपहार गृहा सारख्या सोयी निर्माण करावयाच्या.

७ आपल्या मंडळींत नाना जाती, नाना मतें व अनेक पंथांच्या लोकांचा समावेश होत असल्यानें, कोणाच्या धर्माची अगर मताची अवहेलना होईल असें कांहीं न करावयाचें.

८ अखेरचा आणि मोठा उद्देश ह्मणजे शक्य तेवढ्या सायासानें संस्थेकडून मालाच्या पुरवठ्याचा, पैदासीचा व त्याप्रमाणें लोकशिक्षणाचा बिकट प्रश्न सोडवून दाखवावयाचा. संस्थेच्या कार्यांनां यश मिळवावयाचें.

त्यांच्या व्यवहाराचें धोरण.

४४. मंडळींचे वरील उद्देश निवळ ढोबळ होत. त्यांनीं ज्या धोरणांवर प्रत्यक्ष व्यवहार हांकला होता तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ व्यापाराला लागणारें भांडवल स्वतःच्या मालकीचें करावयाचें.

२ जिनसा नेहमीं निर्भेळ व ताज्या पुरवावयाच्या, लांडीलबाडीला जागा ठेवावयाची नाहीं.

३ वजनें व मापें खरीं खरीं वापरावयाचीं. दांडी कांटा सचोटीनें द्यावयाचा.

४ जिन्नस बाजार भावानें विकावयाचा. व्यवहार रोखीनें ठेवावयाचा.

५ सभासदांच्या सौद्याच्या प्रमाणांत सालअखेर हिस्सेर-

सीनें नफा वांटून द्यावयाचा. नफ्या पैकीं कांहीं ठरावीक भाग बाजूला काढून ठेवावयाचा.

६ संस्थेच्या अंतर्व्यवस्थेंत प्रत्येक सभासदास मत देण्याचा अधिकार द्यावयाचा. स्त्री पुरुषास समान हक्क असावयाचा.

७ कामाच्या व्यवस्थे करतां सभासदांकडून एक कार्यकारी मंडळी निवडून घ्यावयाची.

८ नफ्या पैकीं कांहीं भाग शिक्षण फंडाकरतां बाजूला काढून ठेवावयाचा.

९ मंडळींच्या हिशेबाचे तक्ते, जमाखर्चाचे ताळेबंद वगैरे जाहीर रीतीनें प्रसिद्ध करावयाचे.

साल अखेर झालेला नफा वाटून देण्याची पद्धत.

४५ अशा धोरणावर चाललेल्या या संस्थेंत प्रत्येक गिऱ्हाइकास आपल्याला साल अखेर किती नफा पडला हें ठोकताळ्यानें पहाण्याकरितां, दररोज जो त्यानें सौदा केला असेल, तो कागदावर नोंदून देण्यांत येई. साल अखेर सभासद अशा चिठ्या दुकानांत आणून हजर करी. मग कोणीं १०० रुपयांची खरेदी केली तर कोणीं २०० रुपयांची केली असें आढळून आलें ह्मणजे पहिल्यास १० रुपये तर दुसऱ्यास २० असा नफा वांटून देण्यांत येई.

४६ ह्या संस्थेनें आपल्यास “ रॉकडेल गांवचे समतेच्या तत्वानें सहकारी कोठा चालविणारे धुरीण ”—Rochadale Egne table Pioneers असें नांव घेतलें होतें. पहिल्या पहिल्यानें आपआपल्या पुरता व्यवहार असल्यानें आठवड्यांतून फारतर दोन तीन तास कोठा उघडा ठेवीत; इतका तेथें थोडा व्यवहार असे. पुढें विस्तार जसजसा वाढत चालला तसतसा कोठा सबंध दिवस, किंवा आठव-

ज्यांतून सर्व दिवस खुला ठेवण्याची व्यवस्था झाली. कोठ्याचें काम पहिल्या पासूनच इतक्या हुरुपानें चाललें होतें कीं, सुरुवातीच्याच वर्षीं आपल्या भांडवलावर व्याज व खरेदीवर नफा मिळेल अशी आशा वाटूं लागली होती. दृढनिश्चय, सचोटी आणि आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर सहकारितेनें चालविलेल्या व्यवहारांत नफा मिळविल्याचें, या मंडळीचें पहिलें वर्ष, मोठें लक्षांत ठेवण्यासारखें झालें आहे. निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंची फळ. कंगाल २८ विणकऱ्यांच्या खजीनदारास या सालीं नफा वांटून देत असतांना केवढा आनंद, केवढें कौतुक वाटलें असेल ?

संस्थेच्या कार्यक्रमाची वाद.

निश्चयाचें बळ

४७ पण एकंदर या खजीनदाराच्या खजिन्यांत रक्कम तरी अशा किती असेल ? ती येवढी मोठी रक्कम होती कीं एका ससाच्या पाठीवर सुद्धां वाहून नेतां आली असती. निढळाच्या घामाची भाकर पंचपक्वांन्ना पेक्षांही रुचकर लागते. पुढें गोष्ट अशी झाली कीं, याच खजीनदारास इतकी मोठी रक्कम पेढीवर वहून नेण्याचा प्रसंग आला कीं, तिच्या ओझ्यानें तो कायमचा अधु झाला. सालोसाल पुढें जास्त जास्त नफा दृष्टीस पडूं लागल्यावर सभासदांस आपल्या स्वार्थत्यागाचें, आपल्या दूरदर्शीपणाचें हें गोड फळ हातांत पाहून केवढा अभिमान वाटला असेल ?

संस्थेचा आरंभीचा खजिना.

४८ सहकारी कोठ्या सारखा कल्पतरु हातास आल्यानें रॉकडेल गांवच्या लोकांत दररोज नवे नवे चमत्कार ऐकूं येऊं लागले. नव्या नव्या गोष्टींची चर्चा गोरगरीबांतून सारखी होऊं लागली. सो-

संस्थेनें लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर घडवून

आणलेले परि- णाम. नार, सुतार, चांभार, घिसाडी, अशा कारखान्यांतील लोकांत कोठ्या संबंधानें दररोज नवी वाटाघाट हुरुपानें चाले; किंबहुना कानाकोपऱ्यांतील गप्पांच्या अड्ड्यांतून, बायकापोरांतून सहकारी कोठ्यांतून साल अखेर नफा मिळाला ही शुभवार्ता वाऱ्या सारखी पसरली. कोणी बाई कौतुकानें यंदा अमका दागिना नवा केला, घरांत तमकं लुगडं नवं आलं, दुसरी " दहावीस वर्षांत सोन्यामोत्याचा विटाळ होता हो, अगदीं लंकेची पार्वती होतें, " तिसरी, " आपऱ्या पोराला क्निई यंदाच नवं झबलंनंबिबलं मिळालं हो, " अशी जी ती बाई आनंदानें आपआपली नवी गोष्ट एकमेकींस गौरवून सांगे, लहान लहान नातवंडें आपलीं नवीं आंगडीं आंगांत घालून आपल्या आजोबा आजीबाईकडे दुडदुड धांवत जात.

४९. सहकारी कोठ्यांतून मिळणाऱ्या नफ्या मुळें गोरगरींबांच्या संसारांत उत्पन्नाची ही एक नवी बाबत होऊन बसली. पुष्कळसे कोठ्याचे समासद आपला नफा घरीं घेऊन न जातां दुकानच पुनः आपल्या नांवें जमा करून ठेवीत. असा वरचेवर नफा मुदलांत सामील होत गेल्यानें गोरगरीबांचें भांडवल वाढीस लागत असे. या प्रकारें कोठ्याच्या अचळांतून दुधाची धार सुटत गेल्यानें एकेकाळीं फाटके तुटके असलेले भणंग मजूर भले गलेलठ्ठ, गाजरासारखे लाल फुगले. रॉकडेल गांवच्या जुन्या व नव्या मजुरांत जमीन अस्मानचें अंतर पडलें. आज त्यांनां चांगलीं शोभिवंत घरें, पोटभर सुग्रास अन्न, व आंगभर स्वच्छ वस्त्र मिळूं लागलें; इतकेंच नव्हे तर त्यांच्या करमणुकीकरतां कित्येकांना पेटीबिटीसारखीं सुस्वरवाद्यें घरांत ठेवण्याची ऐपत आली.

५०. अशा प्रकारें संस्थेची भरभराट चालली असतानां १८५०

संस्थेचें पुढचें पाऊल पिठाची गिरणी.

सालीं संस्थेनें एका पिठाच्या गिरणीचे भाग विकत घेतले. पीठ दळण्याचें अति उपयोगी कामांत जेव्हां या कोष्टयांनीं हात घातला तेव्हां पेठकरी व्यापाऱ्यांचें पित्त साहजिक उसळलें. यांनीं आतां या कोष्टयांची गट्टी कशी बिनसेल, यांच्या कामकऱ्यांत आपआपसांत माऱ्यामाऱ्या लागून फाटाफूट कशी होईल हें पहाण्याकरतां क्लृप्त्या योजण्यास सुरवात केली. कांहीं मजूर तर त्यांनीं फितविलेच; कांहींनां दारुपाण्याची लांचलुचापत लावली.यामुळें सगळीच घडी विस्खळते कीं,काय

गिरणीमुळें झालेला अपकर्ष व त्यामुळें सभासदांच्या मनाची चलबिचल.

अशी भीती उत्पन्न झाली. सभासदांपैकीं कित्येक तर खरोखरीच घाबरून गेले. ते आपले पैसे भडाभड परत मागूं लागले. ज्यांनीं ज्यांनीं आपले पैसे बँकेंत न ठेवतां कोठ्याच्याच शिलकेंत जमा केले होते त्यांनीं कोठा डबघाईस आलेला पाहून धीर सोडला. इतकें झालें तरी या कोष्टी मंडळीनें मात्र आपलें सत्व मावळूं दिलें नाहीं. एके प्रसंगी अशी गम्मत झाली कीं, एक अधीर आपले सगळे पैसे मागण्याच्या कृतनिश्चयानें मंडळीकडे आला, परंतु दारांत आल्यावर मागूं कां नको, मागूं कां नको, अशी त्याच्या मनांत डळमळ उत्पन्न झाली. त्याचा पैसे परत मागण्याचा रोंख ओळखून मंडळीनें त्यास कायदेशीर अडचण दाखविली. ठेवींत ठेवलेले पैसे एकदम काढावयाचे असल्यास प्रथम आठ दिवसांची अगाऊ नोटीस द्यावी लागते असें त्यांनीं त्यांस सांगितलें. त्या गृहस्थास जरा धीर येऊन तो ह्मणाला—'तर मग, आजच माझी पहिली सूचना समजा व पुढें माझे पैसे द्या' इतकें ऐकल्याबरोबर मंडळीनें पुढच्या आठ दिवसांची वाट न पहातां एकदम सगळे पैसे त्याच्या पुढें केले. " बाबारे, हे तुझे पैसे आजच घेऊन जा, मंड-

ळीजवळ पैसे नाहींत असें समजण्याचें व घाबरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. आमच्या जवळ पैसे नसले ह्मणजे सुचनेबिचनेचें अगत्य पडतें; " मंडळीचें हें धीराचे शब्द ऐकून तो मनुष्य अगदीं विरमून जाऊन पैसे घेऊन परत फिरला. कोठा तर बुडत आहे आणखी पैसे परत मिळतात कसे, याचें त्यास राहून राहून आश्चर्य वाटलें. पुढें दोन वर्षें त्यानें ते पैसे तस्से घरीं लोळत ठेविले; पण कोठा कांहीं बुडत नाहीं, येथें निश्चयाची गांठ आहे, अशी जेव्हां त्याची खात्री झाली तेव्हां ते पैसे त्यानें परत कोठ्याच्या ठेवींत नेऊन

संस्थेचो दानत ठेविले. दुसरी एक गम्मत अशी झाली कीं, एका बाईला, " कोठा बुडतो आहे, जा तूं आपले पैसे काढून आण, " असें एकानें चिथाविलें. बाई कोठेवाल्या कोष्टयांची दानत जाणून होती. ती ह्मणाली, " माझें काय आहे ह्मणून मी परत काढून आणावें ? मला फायदा मिळाला तो तरी दुकानानेंच मिळवून दिला आणि तो मी जेथल्या तेथेंच ठेविला. इतर दुकानें कोठें येवढा उदारपणा दाखवितात ? " येवढी ही भक्ती सचोटीच्या पोटींच उपजत असते. सांगणें नकोच कीं, लोकांच्या येवढ्या आदरास पात्र झालेल्या कोष्टयांनीं आलेल्या संकटांतून निभावून जाऊन गिरण्यांचा व कोठ्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष साधला.

संस्था संकटांतून निभावते.

९१. अशा रीतीनें १८४४ सालीं या Rochadale Equitable Pioneers मंडळीचा जन्म झाला. आरंभाला २८ मंडळींनीं २८ पौंडावर व्यवहार उभा केला. या नंतर ६५ वर्षांनीं, ह्मणजे १९०९ सालीं मूळ २८ सांचे १७०५४ सभासद झाले. मूळारंभीं डोंगराच्या पायथ्याशीं केंसाप्रमाणें झुळझुळ वाहणारा हा झरा होता. पुढें रानावनांतून अनेक नद्या, नाले, ओहळ हे त्यांत सामील होऊन ब्रह्मपुत्रा नदी प्रमाणें मूळ

ओघाचें प्रचंड पात्र बनून त्यांत मोठमोठ्या नावा चालतील अशी त्याची प्रचंड नदी बनली. या साली यांचें भांडवलच मुळीं ३,३३४६८ पौंड वाढलें होतें. यांची गंगाजळींतील ठेव १०,००८ पौंडाचीं झाली होती. यांनीं साल अखेर ३६४,९९४ पौंडाची उलाढाल केली. शिक्षणा करतां या सालीं यांच्या हातून ६३२ पौंड खर्ची पडले. यांनीं ९६,७७८ पौंड किंमतीचा माल आपल्या स्वतःच्या कारखान्यांत निपजविला. यांच्या कारखान्यांत १२२ कामकरी कामास असत. किरकोळ विक्री वगैरे करतां यांचे २७३ नोकर असून एकंदर पगाराप्रीत्यर्थ यांनां २४,३७२ पौंड वाटावे लागले.

उत्कर्षाची चढती कमान.

९२. संस्थेचा असा उत्कर्ष होत असतांना मंडळीस जास्त काटकसर करून पाऊल पुढें टाकावें अशी साहजीक महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. आतांपर्यंत दुकानांत लागणारे जिन्नस मंडळी निरनिराळ्या पेठांतून खरेदी करून आणीत असे. यांत बराच फाजील खर्चवेंच होत असे. हा टाळण्याकरितां आपल्या स्वतःची एक मोठी वखार असावी, येथें हंगामा हंगामांतला माल एकसट्ट्यानें खरेदी करण्यांत येऊन सांठविलेला असावा, व तेथून वेळोवेळीं आपल्या कोठ्यांत पुरवठा पाडून द्यावा, असा या मंडळींनीं संकल्प धरला. अशी वखारही त्यांनीं काढली.

संस्थेची घाऊक मालाची वखार.

महत्वाची योजना.

९३. ही वखार काढल्यानंतर संसारांत लागणाऱ्या हरजिनसा बाजारांतून आयत्या विकत घेण्यापेक्षां आपल्या कारखान्यांत आपणच तयार केल्या तर याही पेक्षां जास्त काटकसर साधेल असें त्यांच्या अनुभवास आलें. महत्वाकांक्षेस अनुभवाची जोड मिळाली ह्मणजे ती व्यवहार्य होते. नुसत्या बिछाइतांशीं देवघेव करण्याचें अडत्याचें भाडोत्री दुकान आपलें नसावें, आपला माल

16 MAR 1990

आपण काढून, आपल्या कोठ्याच्या साधनानें तो मंडळींच्या घरीं शक्य तितक्या सवलतीनें पावता करावा असें त्यांच्या मनानें घेतलें. ही ही महत्वाकांक्षा त्यांनीं खरी करून दाखविली. शक्य तितक्या रीतीनें काटकसरीस यांनीं वाव केल्यावर व मालाचा पुरवठाही भरपूर होऊं लागल्यावर यांनीं मंडळींच्या सोयीकरतां हातोहात कोठ्याच्या शाखा, उपशाखा काढल्या. याप्रमाणें मंडळींच्या भरभराटीची कमान सारखी चढत होती.

रायीचा खरोखर च मर्वत करून दाखविला.

९४. येणेंप्रमाणें दुर्दैवी पण दीर्घ प्रयत्नी, दरिद्री पण अभिमानी, २८कंगाल विणकऱ्यांनीं रुजविलेल्या कोयींतून भला मोठा आम्रवृक्ष निपजून, थोड्याच अवकाशांत तो मोहोरानें फुलून खुलून त्याचा सुगंध दरवळूं लागला व आपल्या छायेखालीं दमल्या भगल्या वाटसरांस गोडफळांच्या भारानें संतोष देऊं लागला.

संस्थेचा मनोरंजक कार्यक्रम.

९५. या नमुनेदार संस्थेच्या दिवसाच्या व्यवहाराचा कार्यक्रम मोठा मनोरंजक आहे. सकाळीं ७ वाजल्याबरोबर कोठा उघडे. पांच मंडळी गिऱ्हाइकांशीं देवघेव करण्यांत येल्हांपासून चूर असत. कांट्यावर एका स्वतंत्र माणसाची नेमणूक असे.दुसरे दोन तरूण फळयावरचे जिन्नस हातासरसे करण्यास किंवा मापून देऊन जागच्याजागीं ठेवण्यांत गर्क असत. गिऱ्हाइकांशीं दोन्ही बाजूंनीं देवघेव सोयीवार करतां यावी ह्मणून बारा हात लांबीचें एक ऐसपैस टेबल मांडलें होतें. दुकानांत सभासदांच्या बायकां मुलांची झुंडच्याझुंड लोटून येई. आंतील गिऱ्हाइकें बाहेर येई पर्यंत बाहेरची गिऱ्हाइकें बाहेर मांडलेल्या बाकांवर एकमेकांत गप्पाटप्पा करीत बसत. वाणसवद्याच्या शाखेसमोरच कापडचोपडाची शाखा असे. तेथेंही तीन गुमास्ते बायकांमाणसांस नुसते नमुने काढून देण्यांस असत. या शाखेपलीकडेसच

बटाटे, लोणी, कणीक वगैरे अनेक जिनसां करतां शाखा उघडल्या होत्या. अशा प्रकारें प्रापंचिकांच्या हरएक वस्तु संग्रहाची ती एक माळच गुंफिली होती. बूट, जोडे, शिवण टिपण कामाची शाखा-ही निरनिराळी तेथेंच लागून होती. संस्थेनें सभासदांची दुकानांत नांववार खातीं घातलीं होतीं. या कामाकरतां एका स्वतंत्र फडण-वीसाची योजना असे. सभासदांस फावल्या वेळीं वाचण्या सवर-ण्याची संवय लागावी ह्मणून तेथेंच माडीवर वाचनालयाची योजना काढली असे. या वाचनालयांत २०।२५ तरूण मंडळींचें वाचन सदैव चाललेलें असे. वाचनालयांत निरनिराळीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें येत असत. वाचनालयास जोडूनच एका खोलींत आपल्या आठवड्याच्या हप्त्याच्या जमावसुला-च्या बाबी सभासद निवडीत बसत. वाचनालय बारामास अठराकाळ मोकळें असून चिटणीस पुस्तकांची देवघेव करण्यांत सदा गुंग असे. पुस्तकें सभासदांच्या बायकां मुलांस सुद्धां वाचवयास मिळत. रात्रीं दहाच्या सुमारास ही गजबज आटपे. सभाविभा बोलाविण्याकरितां येथें एक सार्वजनिक दिवाणखाना शृं-गारला असे. या ठिकाणीं मंडळींच्या नित्याच्या सभा भरत. या संस्थे-च्या एकंदर रहाटणीनें व या सभाच्या द्वारां २००० कामकऱ्यांस एकमेकांच्या सहवासाचा लाभ घडून लोभाची वाढ होई व समा-जोन्नतीचा प्रश्न उत्तरोत्तर उच्च पदवीवर चढण्यास मदत होई.

संस्था आणि ज्ञानार्जनाची सोय.

९६. तात्पर्य, रॉकडेल गांवच्या दरिद्री विणकऱ्यांनीं आपल्या फाटक्या तुटक्या पण करारी प्रयत्नांनीं देशां-तील एक मोठा बिकट प्रश्न सोडवून दाख-विला आहे. वर आपण वाचलेंच आहे कीं, एका टॉडलेनच्या कोठ्याच्या अनेक जिनसांच्या भरपूर पुरवठ्या करतां निरनिराळ्या अशा १९ शाखा निपजून त्या परस्परांत गुरफटल्या

संस्थेनें लोकशिक्षणाचा प्रश्न कसा सोडविला.

आहेत. संस्था एकच पण प्रत्येक शाखे करतां निरनिराळें वाचनालय उभारल्या मुळें एका संस्थेंत निरनिराळीं १९ वाचनालयें स्थापन झालीं आहेत. मधला कोठा व त्या सभोंवारच्या शाखा नुसत्या डोळ्यांनीं पाहून येण्यास सहजासहजीं एक तास लागतो. मध्यवर्ती कोठ्याला जोडूनच एक जंगी वाचनालय आहे. प्रतिदिवशीं येथील पुस्तक संग्रह वाढत असल्यानें त्याच्या नुसत्या याद्याच छापविण्यास दरवर्षीं हजारो रुपये खर्चीं पडत आहेत. दुर्भिणी, सूक्ष्मदर्शक यंत्रें, वगैरे प्रकारचीं अनेक उपकरणें येथें मंडळीच्या बुद्धीचा विकास करण्याकरतां सांठविली आहेत. येथें सकाळ संध्याकाळचीं, तशींच रोजचीं व आठवड्याचीं वृत्तपत्रें, मासिकें, समालोचकें, हरदिवशीं इतकीं येऊन सामील होतात कीं, येवढा मोठा प्रचंड संग्रह एखाद्या मोठ्या शहरांतही सांपणार नाहीं.

९७. संस्थेची या पुढची पायरी ह्मणजे हिनें शिक्षणाचे व औद्योगिक वर्ग काढले आहेत. संस्थेच्या ज्या कामकऱ्यांस आणि सभासदांस अगर त्यांच्या मुलांबाळांस औद्योगीक अथवा शास्त्रीय शिक्षण मिळवून आपल्या धंद्यांत तें उपयोगी व्हावें, आपले धंदे तरबेज पणानें चालवितां यावेत, असें वाटत असेल त्यांनीं या वर्गाचा फायदा घ्यावा, अशी हे वर्ग काढण्यांत योजना आहे. शिवाय आपला कामकरी आपल्याच शाळांत शिकून निघावा असें कोणास आवडणार नाहीं ?

संस्था आणि धंधे शिक्षण.

९८. या वर्गांत लोकरीचें काम, वीणकाम, अनेक हुन्नर कला, कुशलतेचें काम, शिवाय, गणीत, फ्रेंच, लघुलिपी वगैरे भाषा ज्ञान मिळण्याची सोय आहे इतकेंच नव्हे तर रसायनशास्त्र व व्यवहारशास्त्र यांची योग्य सांगड जमविलेली असून शिक्षणाची अगदीं व्यवहारोपयोगी योजना येथें आंखून निघाली आहे. या वरही कडी ह्मणजे या संस्थेनें फिरत्या

मोफत वाचनालयाची योजनाही अमलांत आणिली आहे. दरवर्षी या संस्थेचा ग्रंथसंग्रह सररहा वाढत आहे, इतकेंच नव्हे तर, नुसत्या दाखले पहाण्याच्या ग्रंथाचा निराळाच संग्रह ही मंडळी वाढविते. याप्रमाणें लोकशिक्षणाचा पवित्र प्रश्न सोडविण्याचा या संस्थेनें स्तुत्य प्रयत्न केला आहे.


संस्थेचा परमोत्कर्ष.

५९. जातां जातां संस्थेच्या विस्तारासंबंधानें असें सांगितलें पाहिजे कीं, सबंध गांवभर आतां या विणकऱ्यांच्या मालकीची मालमत्ता पसरली आहे. मंडळींच्या राहाण्याच्या सोयी करतां आतां यांनीं स्वतःच्या मालकीचीं घरें बांधून काढिलीं आहेत. आपल्यांतील बेरोजगार मंडळींना रोजगार मिळावा ह्मणून यांनीं धान्य दळण्याच्या व कापडाच्या अनेक गिरण्या उभारल्या आहेत. शिक्षणाकरतां त्यांनीं एक स्वतंत्र फंड उभारला असून, नफ्या पैकीं शेंकडा २॥ टके त्या करतां ते अगदीं वेगळे काढून ठेवितात. यांनीं आजमित्तीस आपल्या कारखान्यांत आपण शिकवून तयार केलेले लोक उपयोगीं केले आहेत. अशा कामगारांनां जमिनी आंखून द्यावयाच्या, त्यावर त्यांचा चरितार्थ चालेसा करावयाचा, व अखेरीस त्यांना अशा जमीन जुमल्याचे मालक व स्वयंपूर्ण स्वावलंबी संस्थांचे चालक बनवून सोडावयाचे; असा श्रेष्ठ संकल्प रॉकडेलच्या महत्वाकांक्षी चालकांनीं आज “ जीवीं धरला आहे. ”

६०. रॉकडेल येथील संस्थेच्या इतिहासाचें जें पान आपण आतां वांचलें तें काय शिकवितें ? तें असें शिकवितें कीं, एकमेकांच्या हातांत हात घालून, मितव्ययानें पण प्रेमाच्या सहानुभूतीनें,

चिकाटीनें पण धोरणानें प्रपंच हांकण्याचा जर प्रयत्न केला तर तो "नेटकाच" झाला पाहिजे. ह्मणजे, दारिद्र्य घालविण्याचा पहिला सोपा उपाय जर कोणता असेल तर तो "**सहकारी तत्वावर प्रपंचोपयोगी वस्तूंचा कोठा काढणें,**" हा होय.

दारिद्र्य घालविण्याचा पहिला सोपा उपाय ह्मणजे कोठा.



# भाग ५ वा.

## सहकारी कोठा.

६१. सहकारी कोठा ह्मणजे काय हें एकदां कळलें ह्मणजे तो काढावयाचा कसा येवढेंच शिकावयाचें राहतें. एखाद्या जवळ पैसा मुबलक असला तर तो एक नव्हे दहा कोठे उभारील. पण पैशाचीच तर आपणा कंगाल लोकांजवळ वाण आहे. ह्मणून दहाजणांनीं लकडी जमवून एकाचा बोजा तयार केला पाहिजे. थेंब थेंब जमवून सगळ्यांची तहान भागविण्यास एक मोठें तळें सांचविलें पाहिजे.

सहकारी कोठा म्हणजे काय.

६२. प्रपंचांत आपली दररोज कशी नाडवणूक होत असते, हें आपण गेल्या दोन भागांत पाहिलें आहे. दरिद्र्यांनां ही स्थिती कशी परवडणार ? यांची चोहोंकडून ओढाताण. आधीं मिळकत कमी आणि अशाही तुटपुंज्या प्राप्तीला वायफट वाटा फार. आपला व्यवहार आपण हातांत घेऊन काळजीपूर्वक पाहिला तर बरेंच हित साधेल. खाणावळींत जेवणें व घरीं जेवणें यांत जी खर्चाची काटकसर आहे तीच काटकसर बाजारांत एकट्या दुकट्यानें किरकोळीनें जिनसा खरेदी करणें व चारचौघांनीं मिळून त्या एकदम खरेदी घेणें यांतही आहे. चार पैसे उसनवार काढून हंगामांत जिनसा खरेदी करून सबंध सालाची बेगमी करून ठेवण्यांत हेंच धोरण असतें. पण हा एकट्या दुकट्याचा प्रश्न झाला. आपल्याला आपल्या शेजाऱ्यांचा, आपल्या गांवकऱ्यांचा, आपल्या देशबांधवांचा, आपल्या राष्ट्राचा प्रश्न याच धोरणानें सोडवावयाचा आहे.

प्रपंचांत नाडवणूक कशी चालते.

६३. आपला कारभार आपण नीटपणें हाकावयास शिकलों म्हणजे आपला व्यापार ही आपण करण्यास शिकूं. आपल्याकडे सुनालेकीं सुद्धां आपला कारभार आपण हातांत घेण्यास किती उत्सुक असतात ? जेथें मुलीबाळींस हा प्रश्न समजतो तेथें जाणत्यांनीं आपल्या पायावर उभें राहतां येण्यास स्वावलंबनाचा धडा शिकणें व तेवढ्या करतां एकमेकांच्या हातांत हात घालणें अत्यंत इष्ट आहे. शाळेंत जाणाऱ्या मुलांनां सुद्धा हा प्रश्न न शिकवितां कळत असतो. एखाद्या वर्गांतील मुलांना टाक, पेन्सिली, दौती, कागद, पुस्तकें हरजिनसा नेहमीं लागतात. प्रत्येकजण ह्या जिनसा बाजारांतून वेगवेगळ्या आणतोच. न्युस्कुलांत लेखकाच्या विद्यार्थी दशेंत एक उदाहरण घडून आलें. तें असें कीं शाळेशेजारीं दिक्षित नांवाच्या एका स्टेशनरी वाल्याचें दुकान असें. तो शाळेला सर्व स्टेशनरी पुरवी. एकदां कागद महाग झाले वगैरे सबबीवर यानें कॉपीबुकाची किंमत दिढीनें वाढवली. तेव्हां यत्तेंतील सुमार १५० एक मुलांनीं दिक्षिताकडे कॉपीबुकें न घेण्याचा निर्धार करून वर्गाच्या सेक्रेटरीस तीं दुसरीकडून आणून देण्यास सुचविलें. रिसवडकर नांवाचा वर्गाचा सेक्रेटरी मोठा कल्पक डोक्याचा मुलगा होता. त्यानें यत्तेंतील वर्षभर लागणाऱ्या कॉपीबुकांची नोंद घेऊन तितक्यास लागणारे बंद एकदम रिमांच्या भावानें कोरे आणले. नंतर तें त्यानें घोरपड्यांच्या कारखान्यांतून आंखून घेतले. वर लागणारे रंगीत पुठेही तसेंच त्यानें सापकरांच्या छापखान्यांतून छापवून आणून कॉपीबुकें घरीं शिवून तयार केलीं. अर्थात हीं बुकें पहिल्या किंमती पेक्षांही स्वस्त पडून एकंदर व्यवहारावर २।४ रुपये त्यास नफाही बाजूला काढतां आला. मुलांनां

स्वतःचा व्यवहार स्वतः पाहूं लागतां तो फायदेशीर होतो.

स्वावलंबन मनुष्याच्या शक्ती वाढवितें.

विद्यार्थी दशेंतील एक उदाहरण.

तर या यशामुळें अति आनंद होऊन त्यांची ईर्षा वाढली. त्यांनीं या समाईक नफ्यानें पेन्सिली खरेदी केल्या. यांतही त्यांना नफा पडला. जसजसें हे एक एक पायरी वर चढू लागले तसतसे त्यांनीं टांक, पेन्सिली, कागद वैगेरे लागणारी स्टेशनरीच नव्हे तर सालो-साल लागणारीं नवीं नवीं पुस्तकें सुद्धां एकदम मागवून बराच नफा मिळविला. पांचव्या यत्तेंतच अशी गंमत झाली कीं, वर्गाच्या मास्तरानें ॲराबेला. बी. बक्ले कृत इंग्लंडच्या इतिहासाचें पुस्तक यत्तेस नेमून घेतलें. यांत गोम अशी होती कीं, गांवांत एकाच दुकानदाराकडे या पुस्तकाच्या अवघ्या १०० प्रतीच शिल्लक होत्या आणखी मास्तर साहेबांनीं याच गोष्टीचा फायदा घेऊन दुकानदाराशीं अंतस्थ पाती ठेवून पुस्तक आग्रहानें नेमून घेतलें होतें. पुस्तकाची मूळ किंमत अवघी १॥ रुपये होती पण दुकानदारानें ती वाढवून २।. केली होती. मुलांच्या कानां-वर ही गुणगुण आली होती. त्यांनीं थेट इंग्लंडहून या पुस्तकाच्या प्रती आणविल्या. यांत त्यांनां इतका नफा सांपडला कीं, त्यांनीं सर्वांच्या सम्मतीनें अशा नफ्यांतून गरीब विद्यार्थ्यांस मोफत स्टेशनरी पुरविण्याचा नवा आरंभ केला. बिचा-ऱ्या मास्तराचा कोण हिरमोड झाला असेल ? बापड्या दिक्षितानें आपलें दुकान केव्हांच हालविलें होतें. लहान वयांत स्वावलंबनाचा धडा शिकण्यास शाळा ही अनुकूल जागा आहे.

६४. लहानपणीं ज्याचा या प्रकारें अंकूर रुजावयाचा असतो त्याच तत्वाचा मोठेपणीं मोठा वृक्ष बनावयाचा असतो. त्यांतल्या त्यांत जेथें दारिद्र्य मूर्तीमंत वास करतें ती जमीन सहकारितेच्या पिकास अत्यंत अनुकूल होय. आ-पल्या कडील शेतकरी ह्मणजे अती दरिद्री लोक; त्याच प्रमाणें हात उद्योग करणारे, खेड्यापाड्यांतील बलुतेअलुतेदार—साळी,

कोयींतूनच आम्रवृक्ष फोफावतो

कोष्टी, सुतार, सोनार, लोहार, चांभार—वगैरे अठरा कारखानदार व कारागीर लोक, त्याच प्रमाणें आजकालचे मध्यम स्थितींतील नोकरदार लोक, राहिला वर्ग ह्मणजे गिरण्या कारखान्यांतील अगर अनेक हमालखान्यांत अहोरात्र खपणारे मजूर लोक, हे सर्व सहकारितेच्या तत्वास अति लायख लोक आहेत. दुपारची वेळ कशी-बशी भागवतांभागवतां सारी संसारयात्रा विवंचनेंत कंठणें, हें या वर्गांच्या यावज्जन्म नशीबीं आलें आहे. आपले शाळामास्तर, आपले पोलीस, आपले अनेक कोर्ट कचेऱ्यांतील कारकून व शिपाई, आपले म्युनसिपॅलिट्या, रेल्वे, पोष्ट, छापखाने वगैरे अनेक ठिकाणचे लोक दारिद्र्यांत मनस्वी हाल काढीत आहेत. यांनीं सहकारितेची कास धरून आपला तरणोपाय रॉकडेलच्या कोष्ट्या प्रमाणे आपणच होऊन काढला पाहिजे.

सहकारी कोठा उघडण्यास लायख लोक कोण?

६९. मग सुरुवात कशी करावयाची ? मँचेस्टर येथें १८३१ मध्यें कांहीं गरीब लोकांनीं "संपत्तिवर्धक मंडळी," असें एक जंगी नांव धारण करून एका सहकारी कोठ्याची प्रस्थापना केली. आरंभास हे सगळे आठजण. प्रत्येकानें माणसीं एक एक पौंड वर्गणी घातली. प्रथम प्रथम अगदीं निर्वाहाच्याच जिनसांनीं ह्मणजे कोठें चहा, साखर येथून सुरुवात करून नफ्यांतून पुढें त्यांनीं एक एक जिन्नस हळूं हळूं वाढविण्यास सुरुवात केली. नंतर त्यांनीं कातडी-सामान, किरकोळ कारकोळ कपडेलत्ते वगैरे विकावयास ठेवून नंतर अशा जिनसांचे कारखानेच त्यांनीं उभारले. अशा कारखान्यांत त्यांनीं आपल्यांतील लोकांस उद्योग लावून दिला. पुढें या सुरवातीच्या आठांचे ३६ बनून त्यांनीं भरपूर सामानाचा एक नुसताच कोठा चाल-

कोठ्यास सुरुवात कशी करावी?

मँचेस्टर येथील "संपत्तिवर्धक मंडळीचा" नमुना.

विला, इतकेंच नव्हे, तर आसपासच्या गांवीं सहकारी लोकांनीं काढलेले अनेक जिन्नस आपल्या दुकानांत भरपूर आणून भरले. या ३६ छत्तिसांत कातणारे, ताणा मारणारे, विणणारे, रंगारी, सांधे जोडणारे–जोडार, ठोप्या करणारे, चांभार, पत्र्यांचें काम करणारे वगैरे अनेक हुन्नरी लोक होते. पहिल्याच वर्षीं, अखेर आढावा घेतां, त्यांनां २० पौंडांचा नफा झाला होता. यांच्या दुकानांतील माल केव्हांही बाजारी, हलका नसून तो कळाकुसरीनें तयार केलेला, टिकाऊ व नमुनेदार असल्याची ख्याती होती. मंडळीचे सभासद आठवड्यांतून दोनदां कोठ्यांत जमत. येथें अंगावर घेतलेल्या व्यवहारा संबंधानें खल व ख्याली खुशालीच्या गप्पाटप्पा चालत. यामुळें होई काय कीं, कांहीं मंडळींना कलालाच्या दुकानाकडे जाण्याच्या मोहास कमी अवसर मिळूं लागला. पुढें यांनीं त्यांच्यांतील मंडळी करतां व त्यांच्या मुलांबाळां करितां शाळा, वाचनालयें काढण्याचें धोरण ठेवलें. येणें प्रकारें या सहकारी संस्थेमुळें आंत गोंवलेल्या मंडळींना–( १ ) निर्भेळ पदार्थ, ( २ ) चोख भाव, ( ३ ) कळाकुसरीनें केलेला माल, ( ४ ) उद्योग धंद्याची प्राप्ती, ( ५ ) मितव्यय अथवा काटकसर आणि निर्व्यसनतेची जोड, ( ६ ) स्वतःला आणि आपल्या मुलांबाळांनां शिक्षणाची सोय इत्यादि सद्गुणांचा लाभ होत असे.

सहकारितेस लायख लोक.

६६. दुसरें, रॉकडेलचें नमुनेदार उदाहरण, आपल्या पुढें ताजें आहेच. या २८ कोष्ट्यांप्रमाणें प्रत्येक शाळेंतील समदुःखी मास्तर किंवा पोष्टांतील कारकून, अगर रेल्वेमधील नोकर अथवा निरनिराळ्या ऑफिसांमधील कमी पगाराचे कारकून, एक जुटीनें प्रयत्न करतील तर आजच प्रपंच निम्मा हलका होऊन उद्यां हेच दरिद्री लोक देशांतील मोडकळीस आलेले धंदे ऊर्जितावस्थेंत नेण्याचें श्रेय संपादतील. रॉकडेलच्या नमुन्यावर सुरु-

वात करावयास आपल्या मिळकती बाहेर भांडवल लागतें असें नाहीं. आणि आपणां गरिबांजवळ तें नाहींही. तेव्हां चार समदुःखी एका धंद्यांतील लोकांनीं प्रथम एके ठिकाणीं जमावें. आपल्या इष्ट मित्रांची सभा बोलवावी. एकमेकांच्या हातांत हात घातल्यानें काय फायदा होतो, तें रॉकडेलच्या उदाहरणा वरून जमलेल्या मंडळीस समजावून द्यावें. गोष्ट प्रत्येकास पटल्यावर आपल्या पगाराच्या दिवशीं घर प्रपंचास जो जे खर्च करणार असेल ते पैसे प्रत्येकानें आपल्यांतील पुढाऱ्याजवळ आणून द्यावेत. अशा पुढाऱ्यास सगळ्यांच्या संमतीनें मंडळीतर्फे चिटणीस व खजीनदार निवडावे. या चिटणिसानें आरंभास तांदूळ, ज्वारी सारखा एखादा, जो प्रपंचांत सर्वांना सारखा लागत असेल, असा पदार्थ या जमलेल्या समाईक भांडवलानें, व घाऊक भावानें, भर पेठेंतून खरेदी करून आणावा. असा हा जिन्नस सांठविण्यास गोर गरीबां जवळ प्रथम बारदान किंवा जागा कोठून असणार? या बाबतींत प्रेस्टन येथें निघालेल्या कोठ्याचें उदाहरण घेण्यासारखें आहे. या गांवीं अवघ्या १६ मजुरांनीं असा कोठा उघडला होता. या बिचाऱ्यांचा कोठा एका गल्लींतील कोंपऱ्यांत निघाला होता. एकमेकांस लागणारा शिधा मंडळीनें समाईक पैशानें घाऊक घेऊन तो चिटणिसाच्या घरीं सांठवावा. चिटणिसाच्या घरीं घर साफसुफ करून धान्याधुन्यांतील निवडवेंच करण्यास गडी माणूस कोठून असणार? तें काम त्याच्या बायकोनें करावें. या सुशील बाईनें घरांची नुसती झाडलोट अगर धान्याधुन्याची सांठवण सफाई करावी येवढेंच नव्हे तर घरांतील चूल संभाळतां संभाळतां संध्याकाळीं कामावरून आलेल्या मंडळीस कोठ्यांतील लागणारी शिधासामुग्री मोजून मापून पदरांत घालावी.

आरंभींची योजना.

६७. अशी सुरुवात झाल्यावर दर महिन्यास मंडळीचें पाऊ-

[library stamp, partly legible]


ल पुढें पुढें पडूं लागेल. निश्चयाची कास मात्र दाट चिकाटीनें धरली पाहिजे. मंडळीचा व्याप वाढूं लागला ह्मणजे नवे नवे लोक येऊन मिळूं लागतील. असें झालें ह्मणजें मंडळीस भांडवल वाढवावें असें साहाजीक वाटूं लागेल. मग तें कसें वाढवावें ?

भांडवल जमविण्याचे मार्ग.

६८. भांडवल वाढविण्याचे एकंदर ७।८ प्रकार आहेत. ते असेः—

१ वर्गणीच्या रुपानें
२ प्रवेशफीच्या रुपानें
३ श्रीमंत सभासदांपासून ठेवी घेऊन
४ मंडळीच्या पतीवर मुदतीच्या हुंड्या मागवून
५ ठेवीच्या रुपानें
६ देणग्यांच्या रुपानें
७ भाग रुपानें
८ ज्यास्त श्रीमंत सभासदांवर समूळ जबाबदारी टाकून.

६९. या आठही प्रकारांपैकीं वर्गणी, प्रवेश फी, अगर भाग भांडवल हे तीनही मार्ग राजमान्य आहेत, पण रॉकडेलच्या कोष्टयांनीं घालून दिलेल्या मार्गा इतके ते सोपे नाहींत. प्रवेशफीचा प्रश्न तर मागाहून येऊन मिळणारा करतांच आहे. प्रवेशफीच्या जमेंतून बारदान खर्च निघणारा—असतो. बाकीचे पांच मार्ग ज्यांनां अनुकूलता असेल, किंवा ज्यांची परिस्थिती जशी सुधारेल तसे त्यानें पत्करावेत. रॉकडेलच्या २८ कोष्टयांनीं तर आठ आण्या पासून सुरुवात केली आहे. हे आठ आणेही सबंध वसूल होईनात. तेव्हां त्यांनीं प्रथम दोन दोन आण्याचा हप्ता भरला. बाकीचे ६ आणे त्यांनीं महिन्यास वांट्यांस येणाऱ्या नफ्यांतून फेडले. ह्मणजे महिन्यास जो व्यवहार होईल, त्यांत जो नफा पडेल तो

हे वांटून घेत. हा नफा मंडळी परत संस्थेजवळ भरून भांडवलाची भरपाई व वाढ करीत. भांडवलावांचून भांडवलाशीं टक्कर देण्याचा हा विजयी मार्ग आहे. आपल्या सारख्या कंगाल लोकांस हाच बरा. मात्र स्वत:वर तसाच परस्परांवर वज्राप्रमाणें अचल विश्वास पाहिजे. रॉकडेलच्या दोन आण्यांत एकंदर जगावर उपकाराचें ओझें लादण्याचें सामर्थ्य आहे. गोरगरिबांची दिडकी दुगाणी सबंध राष्ट्राला तारक होते ती अशीच.

भांडवल जमविण्यास रॉकडेलची पद्धत सर्वोत्तम.



20 NOV 2013

# भाग ६ वा.

—:०:—

## खेड्यापाड्यांतील सहकारी कोठा अथवा गांव कोठा.

*गोरगरिबांनाच नोकर चाकर फार लागतात.*

७०. डा. वॅटस् नांवाचा एक सहकारी गृहस्थ ह्मणतो कीं, गोरगरीबालाच नोकर चाकर फार लागतात. परमुलखावरून मालाचा पुरवठा करणारास गोरगरीब पोसतो; यांच्या मागून मोठमोठे दलाल त्याच्या खिशास कात्री लावतात; यांच्या मागून फुटकळ विक्री करणारे दुकानदार, फेरीवाले वगैरे अनेक प्रकारचे लोक त्याच्या पैशावर ताव मारतात. हे सर्व प्रकारचे लोक त्याचे नोकर होत. ते त्याचीं कामें करतात आणि आपला पगार घेतात. विचारा गोरगरीब त्यांच्या मदतीमुळें निव्वळ ऐधी बनतो. तो इतका कीं, कित्येक वेळेला त्यास त्याच्या ऐधीपणामुळेंच उपाशी मरण्याची पाळी येते. ज्या दारिद्र्यास श्रीमंत होण्याची इच्छा असते त्यानें हे नोकरचाकर आधीं कमी केले पाहिजेत.

*सहकारी कोठा काढण्यास मोठें भांडवल अगर अगाध ज्ञान लागत नाहीं.*

७१. आपला प्रपंच आपण शिरावर घेतल्याशिवाय या लुटारूंचें बंड मोडणार नाहीं. आणि प्रपंच नेटका कसा करावा हें शिकविण्यास सहकारिते सारखा दुसरा शिक्षक नाहीं. मँचेस्टर, प्रेस्टन येथील सहकारी प्रयत्नांचा इतिहास पाहिला म्हणजे सहकारीतेनें प्रयत्न करूं लागण्यास पुष्कळ मंडळी, मोठें भांडवल, विस्तृत ज्ञान वगैरे लागतें अशांतली गोष्ट नव्हे, असें समजून येतें. पहिल्या ठिकाणीं तर आठच लोकांनीं कडोसरीच्या

पैशावरच सुरुवात केली; दुसऱ्या ठिकाणीं अवघे १६ जणांनीं कामास हात घातला होता. रॉकडेलचें उदाहरण जगप्रसिद्ध आहेच. इतका हा सहकारी प्रयत्नाचा सोपा उपाय आहे.

गांव कोठा काढण्यास लायख म्हणजे शेतकरी.

७२. आपल्याकडे दरिद्री लोकांचा भरणा शेतकऱ्यांत जास्त आहे. यांच्या करतां सहकारितेच्या मदतीनें कोणकोणते उपाय योजले पाहिजेत. याचें विवेचन दुसऱ्या एका ठिकाणीं होणारच आहे; पण खेडेगांवांत सहकारी कोठ्याची उभारणी करणें, हा एक उपाय येथें सांगण्या सारखा आहे. आपल्या शेतकऱ्या जवळ भांडवल नसल्यामुळें तो अव्वल पासून अखेर पर्यंत सावकाराच्या पेंचांत सांपडतो. बींबियाण्यापासून सावकाराच्या पैशानें सर्व गोष्टी चालत असल्यानें पीक उभें राहतांच सावकारास तारण लावून द्यावें लागतें. सावकार अर्थातच शक्य तितक्या कसोशीनें आडवून व भाव पाडून पीक घरीं वाहून नेतो. दुसरा एखादा अडलेला शेतकरी आपलें पीक गाड्यांत भरून बाजार पेठेंत आणतो, दलाल मग तें पेठेंतील व्यापाऱ्यांस विकतो व आला पैसा दस्तुरी कापून घेऊन शेतकऱ्यांच्या पदरांत टाकतो. यांत अशी मौज होतें कीं, दलालाच्या अगर अडत्याच्या वखारींत गांवोगांवचा माल हरहमेश येऊन पडत असल्यानें तेथें चढाओढीस प्रारंभ होऊन भावाची सारखी कुतर ओढ होत असते. अडत्यांचा बेफिकिरपणा सारखा वाढत असतो. अखेरीस गरजू शेतकरी जेरीस येऊन मिळतील तेवढे दाम घेऊन हवालदीलपणें परत फिरतो. मोळीविके, गवताचे भारेवाले, खेडेगांवचे दूधवाले, गवरीवाल्या बाया, मंडईत माळवीं आणणारे, लोण्याच्या पाट्या वाहणारे मावळे, यांचे बाजारांत गिऱ्हाईक कोण हाल करीत असतें, यांची फसवणूक व त्यामुळें नेहमीं नागवणूक किती होते, याची

पैशाच्या अभावी शेतकऱ्याच्या हजार अडचणी.

कल्पना बाजारांत जाणाऱ्या येणाऱ्यास होण्यासारखी आहे.

७३. अशा या परिस्थितीमुळें बापड्या शेतकऱ्याचा माल मातीमोलानें जातो ही गोष्ट तर खरीच, पण शहरांतल्या उद्योग धंदेवाल्या गृहस्थास, किंवा प्रापंचिकास धान्यधुन्य नेहमीं विकत घ्यावें लागतें त्यांचेही अपरमित हाल होतात. त्यांनां या अडत्या एजंटांच्याच त्रासामुळें अव्वाच्या सव्वा मोल देऊनही चांगला माल मिळण्याची मुष्किल असते.

शहरांत राहणारा आणि गांवांत राहणारा यांनीं परस्परांच्या हातांत हात घातले पाहिजेत.

तेव्हां प्रापंचिकांनां म्हणजे शहरवासीयांनां ऐनजिनसीं ऐन किंमतीस माल मिळूं लागण्यास त्यांची व धान्य पिकविणाऱ्यांची प्रत्यक्षाप्रत्यक्ष गांठ पडणें श्रेयस्कर आहे. येथें मध्यस्थांचा खोडा नको आहे. म्हणजे गिऱ्हाइकांस माल मूळ किंमतीस व चोख मिळेल व शेतकऱ्यांस गरजू गिऱ्हाईक मिळून त्याच्या मालाची त्याला भरपूर किंमत मिळेल. उभयपक्षीं यांत फायदाच आहे. पुण्यांत अडत्यांच्या दुकानांत अनेक गांवचे व अनेक प्रतीचे तांदूळ येणार. अडत्या थोडेंच ते गांववार व चांगले व वाईट असें काळजीपूर्वक निवडून ठेवणार आहे. तो बरे वाईट ढीग सारे एकेठिकाणीं मिसळून सरसहा प्रत लावून दर लावणार. अशा या भेसळीच्या प्रकारांत मावळांतले तांदूळ चांगले व घोडनदीचे मध्यम असे तारतम्यानें ओळखून माल निर्भेळ मिळविण्यास थोडाच अवसर राहणार आहे. तेंच कसें तें पहा; कार्ल्याच्या रानचे तांदूळ एकजात, एकदाण्याचे चांगले असतात. कार्लें लोणावळ्या जवळ आहे; आणि लोणावळ्यास सहकारी कोठा आहे; तर लोणावळ्याच्या सहकारी मंडळीस कार्ल्याच्या शेतकऱ्यांशीं जर प्रत्यक्ष संबंध ठेवतां आला तर कार्ल्याचा उत्तम तांदूळ कवडी मोलानें नानाच्या पेठेंत अडत्याच्या वखारींत जाऊन पडणार नाहीं, व तेथें त्याच्या चांगुल-

पणाचा मुलामा इतर काशा लोखंडाच्या जिनसावर चढून सगळेंच बावनकशी सोनें, असें खोटें मोलतरी त्याला चढणार नाहीं. मग अशी स्थिती घडून यावी कशी ?

शेतकऱ्याचें पीक आणि कारखान्यांतले जिन्नस यांचीं कोणाच्या मध्यस्तीविना अदलाबदल झाली पाहिजे.

७४. खेडे गांवांनीं दुसरी अशी एक गोष्ट आपण पहातों कीं, खेड्यापाड्यांतील लोकांनां लागणारा कपडालत्ता, भांडेंकुडें वगैरे प्रपंचास लागणारे हजारों जिन्नस, अथवा पानतंबाखू सारखे विश्रांतीच्या वेळचे ख्यालीखुशालीचे पदार्थ, चोळ्याबांगड्यांसारखे बायकांच्या गरजांचे पदार्थ, किंवा लग्नकार्य, उरुस उत्सव सारख्या प्रसंगीं लागणारे जास्तकमी जिन्नस शेजारपाजारच्या, चार दोन मैलांच्या हेलपाट्याच्या गांवी बाजारहाटला जाऊन आठवड्यांतून एकदां मिळवून आणावे लागतात. अहूपें, निंगडळें अशा सारख्या डोंगरांतील गांवच्या लोकांना अंबेगांवच्या पेठेंत दाहा बारा मैल बिकट रस्ता काढीत येऊन चार पैशांचें तेलसुद्धां डोक्यावर वाहून न्यावें लागतें. पठाणांची सावकारकी अशा अडचणीच्या खेडेगांवीं किती उत्तम चालते, हें सर्वांना ठाऊक आहेच. हे लोक खेड्यापाड्यांत कपड्यालत्यांचीं गाठोडींच्या गांठोडीं पाठीवर मारून खेड्यापाड्यांनीं हिंडत असतात. असे फेरीवाले गांवांत आले ह्मणजे गांवांतील बायका मुलांची त्यांच्या भोंवतीं झुंडच्या झुंड जमते. कोणीं कांहीं, कोणी कांहीं,—लांडीं अपुरीं लुगडीं, खण, जाडेंभरडें कापड हापापल्यासारखें उचलीत असतो. जवळ तर कोणाच्याच अडका नसतो. हे पठाण बेलाशक उधारीनें माल अंगावर टाकून देतात. अर्थात रुपयाच्या मालाचे चार रुपये घेणाऱ्याच्या माथीं बसतात; पण वस्तु घेणाऱ्याच्या हें तांबडतोब ध्यानांत येत नसतें. तो नवा जिन्नस मिळाला

गांवकऱ्यांस पठाण वगैरे कसे बुचाडतात.

या आनंदांत हुरळून गेलेला असतो.चार साहा महिन्यांनीं या पठाण साहेबांची स्वारी पुनः गांवांत येते. पठाणापासून घेतलेल्या चिरगुटाच्या तर केव्हांच चिंध्या उडून गेल्या असतात, पण आतां गिऱ्हाइकांस तोंड चुकवितां चुकवितां पुरेवाट होते. पठाणसाहेब खुशाल गिऱ्हाइकांच्या घरीं जातात, त्याच्या चुलींत पाणी ओततात आणखीं आपला पैसा उकळतात. बिचाऱ्या गिऱ्हाइकास त्या जबरदस्त सावकाराचें ऋण फेडण्याकरितां दुसऱ्या सावकाराची पायधरणी करावी लागते.

७५ अशा परिस्थितींत समजा, शहरांत कोष्ट्यांनीं सहकारी कोठा काढला आहे. या कोष्ट्यांनां जर धान्यधुन्य शेतकऱ्या जवळून मध्यस्तांच्या अडचणी शिवाय मिळण्याची व तसेंच धान्यधुन्य पुरविणाऱ्या शेतकऱ्यास मोबदला वस्त्रप्रावर्ण कोष्ट्यांपासून मिळण्याची सोय झाली तर उभयपक्षीं अत्यंत हितावह होणार आहे. अशाप्रकारचें हितसाधण्याकरतां प्रत्येक जिल्ह्यांत खेड्याखेड्यांनीं अगर अनेक खेड्यांच्या समुदायानें तालुक्यासारख्या ठिकाणीं सहकारी कोठे अथवा सहकारी डेपो काढले पाहिजेत. गांवचा प्रत्येक शेतकरी अशा कोठ्याचा सभासद असला पाहिजे. अशा कोठ्यांत किंवा डेपोंत प्रत्येक सभासद–शेतकऱ्यानें आपल्या शेतांतलें पीक आणून सांठविलें पाहिजे. शहरांतही कारखाने, गिरण्या वगैरे अनेक उद्योगाच्या ठिकाणीं कोठें असतीलच त्यांनीं अशा " गांव कोठ्यांशीं " संबंध राखला; घेवाण देवाण रूपानें नातें जोडलें, म्हणजे व्यवहारांत किंवा देशाच्या परिस्थितींत सांपत्तिक दृष्ट्या एक मोठी क्रांती घडून येईल.

गांव कोठा आणि नगर कोठा यांच्यांतील परस्पर संबंध.

७६ एक तर, प्रत्येक शहरीं कारखान्यांत, ऑफिसांत पाट्या वाहून दमलेल्या गोरगरीबांस–( १ ) एका रानचें, बिन भेसळीचें ताजें धान्यधुन्य, दूध तूप मिळूं शकेल.

अशा योजनेचे फायदे.

(२) तें पुष्कळ स्वस्त मिळेल: उलटपक्षी गांवकऱ्यांना जसे हवे तसे जिन्नस शहरच्या कोठ्यांतून योग्य मोलानें मिळतील. त्यांची नागवणूक होणार नाहीं. ( ३ )—यंत्रकलेनें चालविलेले कारखाने व विगर यंत्रानें कसलेलीं शेती यांच्यांतील दुजाभाव नाहींसा होऊन प्रेमळता वाढेल.

गांव कोठा आणि हात उद्योगधंद्यांचें पुनर्जीवन.

७७. गांवकोठार निघाल्यानें आणखी एक ठळक फायदा होणार आहे. शेतकरी घर बसल्या बसल्या फावल्या वेळीं कांहीं हात उद्योगधंदे करीत असतात; स्वित्सरलंद मधील शेतकरी घड्याळें करतात; आपल्याकडील शेतकरी सूत वगैरे काढून बारीकसारीक विणकाम करितात; बव्हेरिया मधील शेतकरी कांहीं खेळांचे जिन्नस तयार करतात; गांवकोठा निघाला म्हणजे अशा हात उद्योगानें काढलेल्या जिनसांस शहरांतला बाजार मिळून शेतकऱ्यांच्या मिळकतींत अवश्य भर पडेल.

गांवकोठा निघाल्यानें जेथलें धान्य तेथेंच राहून पुरवठा वाढेल.

७८ गांवकोठार निघाल्यानें देशाच्या सांपत्तीक स्थितीवर—आणखी एक हितावह परिणाम होणार आहे. आजमित्तीस खेड्यापाड्यांतील धान्याधुन्यास अनुकूल बाजार न मिळाल्यानें तें रेलवे वगैरे वाहतुकीच्या साहाय्यानें अन्य ठिकाणीं जाऊन, पिकतें तेथें विकत नाहीं. यामुळें धान्य पुरेसें पिकून सुद्धां पुरवठ्यास येत नाहीं. आपल्या मुंबई इलाख्याची अशीच स्थिती आहे, असें मे. किटिंगसाहेबांनीं नुकतेंच आपल्या एका पु-

आणि शिल्लक धान्य अन्यत्र जाईल.

स्तकांत नमूद करून ठेवलें आहे. गांव कोठे निघाल्यानें प्रत्येक जिल्ह्यांत पुरवठ्याचें धान्य जेथल्या तेथेंच राहून शिल्की धान्य फक्त इतर

ठिकाणीं जात जाईल. हा अत्यंत मोठा व सांपत्तिक दृष्ट्या अति महत्वाचा फायदा आहे.

७९. गांवडेपोंची ही युक्ती इग्लंडमध्यें १९०९ सालीं 'न्युकॅसल ऑन टाईन' या गांवीं भरलेल्या एकेचाळिसाव्या राष्ट्रीय सहकारी परिषदेंत न्युजंट हॅरिस नांवाच्या एका गृहस्थानें सुचविली होती. जर्मनी वगैरे सारख्या ठिकाणीं "धान्यधुन्य विकून देणाऱ्या सहकारी मंडळ्या" ( Corn Societies ) "शेतकीचीं उपकरणें व खतबीत पुरविणाऱ्या मंडळ्या" ( Supply Societies ) अनेक आहेत; पण आज आपल्या या छोट्याशा पुस्तकांत त्यांच्या उल्लेखापलीकडे जास्त कांहीं येणें शक्य नाहीं.

न्युजंट हॅरिस, गांवडेपोंचा योजक.

शहरच्या कोठ्यांत व गांवकोठ्यांत एक मोठा फरक आहे. तो असा कीं, गांवकोठ्यांत सगळेच सभासद कंगाल शेतकरी असल्यानें त्यांच्याजवळ थोडी कां होईना पण रोकड मिळणें कठीण असते. त्यांना कांहीं मजूरी मिळावयाची नसते. पीक हाच त्यांचा पैसा. तेव्हां गांवकोठा उभारण्यास गांवांतील इनामदार, जहागिरदार अथवा पाटलाबिटलासारख्या शिष्टांनीं थोडी फार जबाबदारी अंगावर घेऊन पुढाकार घेतला पाहिजे. यांच्याकडून थोडें फार भांडवल आगाऊ जमलें म्हणजे शेतकऱ्यांनीं धान्यधुन्य डेपोंत आणून भरल्याबरोबर त्यांना बाजारभावाप्रमाणें ठरणाऱ्या मालाच्या किंमतींतून कांहीं कमी रक्कम अगाऊ खर्चास देतां येईल. बाकीची रक्कम बाजारभाव नक्की पडल्यावर अगर शहरकोठ्यांतून आणिवलेल्या जिनसांच्या मोबदल्याच्या रूपानें फेडतां येईल.

गांव कोठा आणि नगर कोठा यांच्यांतील फरक.

# भाग ७ वा.

—:o:—

## शहरांतील कोठा अथवा नगर कोठा.

३

*नगर कोठा म्हणजे काय.*

८० कोठ्यासंबंधीं माहिती देतांनां, तो काढावा कसा, कां काढावा, किती जणांनीं काढावा, भांडवल किती लागतें, सुरुवात कशी करावी, भांडवल कसें उभारावें, गांवकोठा ह्मणजे काय, गांवकोठा व नगरकोठा यांच्यांतील नातें कसें असावें, वगैरे संबंधीची बरीच माहिती मागील दोन भागांत आली आहे. या भागांत शहरांतील कोठ्याची रचना व त्यापासून फायदे वगैरे गोष्टी संबंधानें आपण थोडक्यांत विचार करूं.

*मोठमोठ्या व्यापाऱ्याच्या केंद्रीं सहकारिता शिरत नाहीं.*

८१ असें ह्मणतात कीं, मोठमोठ्या शहरांत सहकारितेचें बीं लौकर रुजत नाहीं. उघड आहे, कारण मोठमोठ्या शहरांत धनाढ्य व्यापारी, सामाजिक राजकीय सुखाचीं तत्वें शोधून काढणारे तत्ववेत्ते यांची गर्दी उसळलेली असते. यामुळें येथील लोकांनां तेलातुपासारख्या क्षुद्र प्रयत्नांकडे लक्ष घालण्यास फुरसत मिळत नाहीं. परंतु ज्या ज्या ठिकाणीं लोक दारिद्र्यानें रंजले गांजले असतात, संकटांचीं ज्यांनां चांगलीच आंच मिळाली असते, तेच लोक, किंवा तींच शितें मऊपणानें एकजीव होतात. उन्हांतलेच लोक सांवलीची इच्छा करतात. खुद्द डेनमार्क देश सहकारी कोठ्यांनीं फुलून गेला आहे, पण कोपेनहेगन सारखें राजधानीचें शहर अझून कोरडेंच आहे. उलटपक्षीं लँकेशायर, यॉर्कशायर, ग्लॅसगो सारख्या शहरीं ह्मणजे ज्या ठिकाणीं उद्योगधंद्यांच्या विलक्षण व चढाओ-

ढीच्या उलाढालीमुळें उपासमार सररहा वाढत आहे, अशा ठिकाणीं कोठ्यांची गर्दी उसळून गेली आहे. जर्मनींत सॅक्सनी नांवाच्या गांवीं गिरण्याकारखान्यांची अशीच गर्दी असल्यानें तेथें सुद्धां सहकारी प्रयत्नांचा पाऊस दारिद्र्याचा ताप कमी करण्यास कारण झाला आहे.

पण आपल्याकडे गिरण्या कारखान्याच्या ठिकाणीं ती शिरेल.

८२ आपल्याकडे मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, नागपूर, कराची, कलकत्ता व मद्रास अशा धंद्याकारखान्यांच्या शहरीं सहकारी कोठ्यांची अत्यंत जरुरी आहे. आपल्याकडे दारिद्र्य विशेष जाणवत असल्यामुळें तीं अशा उद्योगधंद्याच्या ठिकाणीं भासते असें नाहीं, तर प्रत्येक शहरोशहरीं, गांवोगांवीं अशा सहकारी प्रयत्नांचें नुसतें छत झालें पाहिजे. इंग्लंडमधें आजमित्तीस एकंदर लोक वस्तींत शेंकडा २० लोक सहकारी प्रयत्नाच्या धाग्यानें विणले गेले आहेत. आपल्याकडे प्रमाण अगदीं उलट म्हणजे शेंकडा ८० लोक सहकारि धाग्यानें तुणले गेले पाहिजेत.

नगर कोठ्यास भांडवल कसें जमवावें.

८३ सहकारी कोठा कसा उघडावा याची आतांपर्यंत जी माहिती दिली तिचा पुनः सारांशः—

१ ज्याठिकाणीं कोठा काढणें असेल तेथील लोक प्रथम एकत्र जमवावेत.

२ त्यांनां सहकारी प्रयत्नांची माहिती करून द्यावी.

३ नंतर ज्यांनां ज्यांनां सहकारी कोठा हवा असेल त्या सर्वांच्या एका वहींत सह्या घ्याव्यात.

४ नंतर भांडवल जमविण्याच्या मार्गास लागावें.

८४ आतां भांडवल कसें जमवावें या संबंधानें पुनः थोडक्यांतः—

१ भांडवल रॉकडेलच्या नमुन्याप्रमाणें आपल्या प्रपंचाच्या
. जिनसा एकवटून घाऊक भावानें खरेदी करून.
२ वर्गणीच्या रुपानें.
३ सभासदापैकीं प्रत्येकानें नियमित रक्कम घालून.
४ भागरुपानें.
५ ठेवी घेऊन. ( मेंबरांपासून )
६ प्रवेशफीच्या रुपानें.
७ कर्जाऊ रक्कम घेऊन.

८५ या प्रकारें कोणत्याही उपायांनीं भांडवल जमविल्यावर आपल्या इलाख्या तर्फे "कोऑपरेटिव्ह" खात्याचे अधिकारी यांजकडे अर्ज करून कोठा काढण्यास लागणाऱ्या नियमांची एक प्रत मागवावी. सहकारी मंडळ्यांचा आपल्याकडे एक कायदा आहे त्याची एक प्रत व त्याचप्रमाणें "सहकारी कोठा" कसा उघडावा या संबंधीचे पत्रक मंडळीनें मिळवून, त्याप्रमाणें आपल्या करतां नियम धारे आंखून घेऊन मंडळी नोंदण्या करतां मे. रजिस्टर साहेबांकडे अर्ज करावा व मंडळी नोंदवून घ्यावी.

८६. मंडळी नोंदल्या नंतर पहिलें काम म्हणजे तात्पुरती एक व्यवस्थापक कमेटी नेमावी. या कमेटीनें सर्व सभासदांची एक साधारण सभा बोलावून कोठ्याच्या व्यवस्थेकरतां एक कार्यकारी कमेटी निवडून घ्यावी. या कमेटींतले लोक व्यवहारदक्ष, मनमिळाऊ, प्रामाणीक, शांत डोक्याचे, सरळ मनाचे आणि सहकारी तत्वांची ओळख असलेले असावेत. कमेटीच्या मंडळींत निरनिराळ्या कामाकरतां निरनिराळे लोक असावेत. ते असेः—( १ ) मॅनेजर—दिवाणजी, ( २ ) सेक्रेटरी—चिटणीस, ( ३ ) खजिनदार, असे पृथक् पृथक् अधिकारी पाहिजेत; यांत दिवाणजीची कामगिरी म्हणजे—मालाची खरेदी करणें, निर-

संस्था कशी उभारावी.

निराळ्या पेठांचे भाव माहीत पाडून घेणें, बूड, तूट, फूट यांची कसोशी राखणें, हंगामाच्या हंगामास मालाची खरेदी व विक्री करणें, गिऱ्हाइकांची आवडनिवड लक्षांत घेणें, दुकानांतलें बारदान आहे नाहीं पहाणें, वगैरे प्रकारानें अत्यंत जोखमीची आहे. दिवाणजीनें आंत बाहेरचा व्यवहार होतांहोईल तो रोखीनेंच ठेविला पाहिजे. चिटणीस या अधिकाऱ्याचें काम हिशेब टिशेब ठेवणें, सभासदांची खातेवार खरेदी टिपणें, बिलांची देवघेव ठेवणें हें होय. या शिवाय मंडळींच्या सभाची व्यवस्था आंखणें, त्या सभांतील मिनिटांची व ठरावांची नोंद ठेवणें, हें आहे. चिटणीसानें खरेदीं विक्रीचा हिशेब रजिस्टरीं चोख ठेवला पाहिजे. सभासदानें दररोज खरेदी किती केली हें चटकन कळण्याकरतां "आर्डरफार्म" कोठ्यांत ठेवावेत अथवा तशा फार्मांच्या वह्या प्रत्येक सभासदाजवळ देऊन ठेवाव्यात. सभासदानें कोठ्यांतून काय काय माल पाहिजे तो वेळोवेळीं या फार्मावर नोंदून तो फार्म कोठ्यांत विक्री करणारा जवळ द्यावा व त्याची दुसरी प्रत सभासदानें आपल्या जवळ ठेवावी. या आर्डर फार्मावरून चिटणीसानें सभासदाच्या नांवें खतावणींत नोंद ठेवून किमतीचें बिल तयार करावें. अशा आर्डर फार्मांच्या योगानें सभासदांस साल अखेर आपण किती खरेदी केली हें पडताळून पाहाण्यास सांपडेल, व चिटणीसानें आपल्या खरेदीवर किती नफा वांटून दिला हें ही समजेल. दुकानच्या मालांत नासधूस, बुडतूट वगैरे किती आली त्यांची नोंदही चिटणीसानें निराळी ठेवून त्याचें एक नियमित प्रमाण अगर आडाखा ठेवला पाहिजे. दुकानांत बारदान बाहेरचें आलें किती, परत गेलें किती वगैरेचा हिशेबही चिटणीसानें तयार केला पाहिजे. या शिवाय दुकानांत जांगड

अंतर्व्यवस्थेचें धोरण.

आर्डर फार्म.

संस्थेंतील निरनिराळे अधिकारी चिटणीस.

जमाखर्चाची वही ह्मणून एक खातें ठेवावयाचें असतें. या खात्यांत गिऱ्हाइकानें न खपलेला माल परत आणण्याच्या बोलीवर नेलेला असतो, त्यांची जांगड मांडावयाची असते, शिवाय बाहेरून आलेला मालही कांहीं वेळ असाच परतीच्या बोलचा असतो, त्याची वासलातही जांगड मालांत लावावयाची असते. लग्नकार्याच्या प्रसंगीं पुष्कळ प्रमाणावर निव्वळ अदमासानें मालाची उचल झालेली असते, तेव्हां अशा वेळीं राहिला माल परत करण्याची सोय ठेवणें अत्यंत इष्ट असते. या मुळें जांगडीची सोय करावी लागते. या शिवाय दिवाणजी चिटणीसाची महत्वाची कामगिरी म्हणजे दुकानच्या देवघेवीच्या व्यवहाराचा चोख ताळेबंद तयार करून तो नियमित वेळीं सर्व साधारण कमेटीपुढें मांडणें व त्याच प्रमाणें कोठ्यांतील प्रमुख ठिकाणीं जाहीर रीतीनें डकविणें. ताळेबंदांत मंडळीच्या व्यवहाराची जमा, खर्च, शिल्लक, घेणें देणें आणि इतर मालमत्ता दाखविलेली असावी. सहकारी संस्थांचा ताळेबंद हा महत्वाचा कागद असून, तो त्यांचें प्रसिद्ध जाहीरपत्रक आहे.

ताळेबंद

याशिवाय रोजकीर्द, व्याजखातें, मंडळीच्या मेंबरांचें रजिष्टर बूक, खर्चखातें वगैरे खातीं ठेवावीं लागतात, त्यांची बिनचूक माहिती मे. रजिस्ट्रर साहेबांकडून मिळवावी.

हिशेबाची माहिती इलाख्याचें सहकारी मंडळ्यांचे रजिस्ट्रर साहेब यांजकडोन मिळवावी.

खजिनदार यांचें कांम ह्मणजे संस्थेचा पैसा अगर फंड संभाळणें,

८२६ / ग१३

खजिनदार. फंड गोळा करणें, ठेवी मिळविणें, हुंड्या पटविणें, बँकखातें, ठेवीचें खातें, व्याजखातें ठेवणें; सारांश संस्थेच्या रोकडीचा सर्व व्यवहार पाहणें.

८३. कार्यकारी मंडळ या प्रमाणें निवडल्यावर नोकरांचाकरां-

कार्यकारी मंडळ. ची व्यवस्था येते. हे लोक कमेटीच्या मंडळीच्या आप्तेष्टांपैकीं किंवा वशिल्याचीं तट्टें नसून अगदीं त्रयस्थ माणसें असावींत. कारण उघडच आहे, सभासदांनीं योग्य तक्रारी केल्या तर कार्यकरी मंडळास संबंधी नोकरांचा मुलाजा पडतो. हे लोकही प्रामाणीक व मनमिळाऊ असावे लागतात, इतकेंच नव्हे तर कोठ्याविषयीं त्यांनां योग्य अभिमान वाटूं लागण्यास त्यांनां योग्य मुशाहिरा व सालअखेर बक्षिसी द्यावी. जुन्या संस्थांत दिवाळी दसऱ्यास नोकरास शेलापागोटें देण्याचा जो रिवाज आहे त्यांतील मर्म तरी हेंच आहे. नोकरांच्या कामाचे तास त्रासदायक अगर कंटाळवाणे होतील असे लांबलचक नसावेत. सणावारास आलटून पालटून सुट्टी असावी. सभासदांनींही आपली खरेदी अवेळीं न करण्याची शिस्त संभाळावी.

८४. दुकानची मांडणी ही एक चतुराईची कलाच आहे.

दुकानाची मांडणी. दुकानांत माल नीटनेटका व सुंदर रीतीनें मांडलेला असला, पदार्थांची स्वच्छता राखली असली, कोठी निव्वळ उंदीर घुशींचें बळद न होतां काळजीपूर्वक ठेविली असली, जेथला माल तेथें व हातास चटकन लागेल अशा रीतीनें ठळक ठिकाणीं नांवानिशीं चिठ्या लावून ठेवला असला ह्मणजे सोयीस्कर होतें. अमेरिकेंत मालाची सुबक मांडणी कशी करावी हें शिकावें लागतें. गिऱ्हाइकाच्या घरीं कित्येक वेळेला हमालाच्या हातीं ओझीं पोहोंचतीं करावीं लागतात. दरवेळेस हमाली भरणें जरा जडीकच होणार आहे. येवढ्या कारितां पुष्कळशा गि-

व्हाइकांकडे एक हेलपाट्यास माल पावता करण्याकरतां कोठ्यानें हातचाकी गाड्या ठेवलेल्या बऱ्या. कोठ्यांतील बारदान, सामानसुमानही सोयीचें असावें. कांटा, वजनें, मापें, पोतीं, डबे, बैठक, दिवाबत्ती, मालदेण्याचें मेज, बसण्याकरतां बांक, जाजम, वगैरेस सुरवातीस १५०।२०० रु. खर्च लागतो.

माल पोंहचविणारी गाडी.

बारदान.

८५. आतां मंडळीची जी सर्वसाधारण सभा बोलवावयाची असते ती मागें झालेलें कामकाज समाधानकारक झालें आहे कीं नाहीं, कोणी काम कसें केलें, पुढें कोणतीं धोरणें पाहिजेत, सालअखेर जमाखर्चाचा खर्डा बरोबर आहे कीं नाहीं, पुढील सालाकरितां किती मुद्दल.अगाऊ धरावें, त्यावर बूडतूट कशी आकारावी, नवे सभासद आंत घेण्यासंबंधीं काय तजवीज करावी. नफ्याची वांटणी कशी करावी, शिक्षणफंडा करतां किती नफा अगाऊ काढून ठेवावा, वगैरे नाना प्रश्न सोडविण्या करतां बोलवावयाची असते आणि तिच्या चालने संबंधानें मे. रजिस्टर साहेब यांनीं शक्य ते नियमधारे घालूनही दिले आहेत.

सर्व साधारण सभा.

८६. आतां सांगावयाचें जें राहिलें तें शिक्षणसंस्थेसंबंधानें. रॉकडेल संस्थेचा इतिहास रेखाटतानां शिक्षणासंबंधानें कायकाय तजविजी कोठा करुं शकतो, हें खुलाशानें सांगितलें आहे. शिशुशिक्षण, औद्योगिक व कला शिक्षण, प्रौढबोध वाचनालयें वगैरे संस्था करतां कोठ्यानें आपल्या नफ्या पैकीं ठराविक भाग काढून ठेवून हळूंहळू व्यवस्था करीत असावी.

शिक्षण फंड.

# भाग ८ वा.

—:०:—

## घाऊक मालाच्या वखारी.

८७. किरकोळीनें मालाची देवघेव करणाऱ्या कोठ्यांची गरजांनुसार जागोजाग प्रस्थापना झाली पाहिजे. इंग्लंडमध्यें अगदीं कंगालांच्या झोपडी पासून तों थेट श्रीमंताच्या दिवाणखान्यापर्यंत सहकारी कोठ्यांतून मालाचा पुरवठा होतो. तिकडे ज्या गल्लींतून दारिद्र्याची घाण दुर्गंधी सुटली असे, जेथें अति कंगाल, फाटके लोक राहात अशा कारोनेशन नांवाच्या रस्त्यांत " संडर्लंड सोसायटी " नांवाच्या मंडळीनें एक कोठा काढला होता. येथें गोरगरीबांस नित्य लागणाऱ्या कांदालसुणासारख्या पदार्थांपासून चरितार्थाचे सर्व पदार्थ स्वच्छ व शुद्ध ठेवले होते थेवढेंच नव्हे तर ते दमडी टोलीपासून विकीत असत. आपल्याकडील ड्रेनेजच्या कामावरील मजूर, किंवा टाटाच्या कारखान्यांतील मजूर अथवा भाटघर धरणावरील मजूर किंवा गोद्या, रेलवे, बाजारपेठा येथील हमाल यांच्या करतां अशा सोयीस्कर संस्था निघणें इष्ट आहे. हे गरीब लोक हरहमेश आपल्या अंगावरील चांदी रुप्याचें किडुक मिडुक किंवा घरांतील तांब्या थाळी मारवाड्याकडे गहाण टाकीत असतात. मारवाडी त्यांनां रुपया दोन रुपये कर्जाऊ देऊन सबंध जिन्नस व्याजावारी गडप करून टाकतो. संदर्लंद मंडळीनें गोरगरिबांना अशा फसवणुकीपासून सोडविण्याकरतां आपल्याच दुकानांत गहाणपहाणाचें खातेंही ठेवलें. सहकारिता अशा प्रकारें गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत नेऊन भिडविण्यांत

गोरगरिबांच्या गल्लयाकुच्यांतून सहकारिता कशी न्यावी.

संदलर्डमंडळी.

सेवासदन तें काम करील.

इंग्लंडमधील स्त्रियांचा मोठा भाग होता. आपल्या कडील सेवासदनास ही गोष्ट करतां येणें शक्य आहे.

सिव्हिल सर्व्हिस असोसिएशन.

८८. गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत या प्रमाणें सहकारिता पोहोंचली आहे. इंग्लंडमध्यें " सिव्हिलसर्व्हिस असोसिएशन " नांवाची दुसरी एक श्रीमंत लोकांकरतां संस्था आहे. आपणांस शुद्ध व स्वच्छ मालाचा पुरवठा करून घेण्याकरितां श्रीमंतांनीं ही संस्था काढिली आहे.

समाजांत कानाकोपऱ्यांत सुद्धां सहकारिता गेली पाहिजे.

८९. सारांश समाजांतील कानाकोपऱ्यांत सुद्धां सहकारिता जाऊन भिडल्यावर अपूर्व काटकसर सर्व ठिकाणीं साधावी, लोकांच्या संसारिक अडचणी पैकीं बऱ्याच अडचणी आपोआप कमीकमी होत जाव्यात, हें साहजिकच होतें. सहकारितेच्या साहाय्यानें आपल्या निर्वाहाच्या जिनसांचा फुटकळ विक्रीचा व्यापार लोकांनीं आपल्या हातांत घेऊन प्रपंचांत शक्य तितकी काटकसर साधली खरी, पण अशा फुटकळ विक्री करणाऱ्या सहकारी कोठ्यांनां तरी पेठेंतील व्यापाऱ्यां कडूनच माल आणावा लागत असे. येथें थोडी फार फसगत होणें अनिर्वाह्य असते. दुसरी गोष्ट अशी कीं, एकदम सट्ट्यानें माल घेतला ह्मणजे तो सवंग पडतो. हें जितकें व्यक्तिविषयक खरें आहे, तसेंच तें फुटकळ विक्रीच्या दुकानासंबंधानेंही खरें आहे. एकदम माल खरेदी करण्यास रोकड अगर बाजारांत चांगली पत लागते. आपल्या रॉकडेलच्या संस्थेला अगर तिच्या नमुन्या बरहुकूम निघालेल्या अनेक संस्थांनां येवढी पत अझून आली नव्हती, अथवा त्यांच्या जवळ मुबलक रोकडही खेळती नव्हती. रॉकडेल पायोनिअ-

कारंजाच्या अनेक फवाऱ्यांना पाण्याचा पुरवठा होण्याकरतां कोठेंतरी साठा पाहिजे.

JAN 1944

संचे तर छापखानेवाले पैसे अगाऊ मिळेनात म्हणून हिशोबाचे तक्के छापून देईनात, किंवा इतर धंद्याचे लोक यांच्या हुंड्या पत्करीनात. शिवाय लहानमोठ्या व्यापाऱ्यांनां यांच्या विषयीं हेवा वाटत असल्यानें यांनां माल पुरविणाऱ्या मंडळ्यांशीं ते व्यवहार ठेवीनात.

९०. अशा अडचणींत सहकारी लोकांचे हाल व्हावेत, त्यांनां बाहेरच्या दुकानापेक्षांही आपल्या दुकानांत माल महाग पडावा यांत नवल नव्हतें.

९१. अडचणी आल्यामुळें तर रॉकडेलच्या कोष्ट्यांनीं सतावून जाऊन स्वसंरक्षणाची तोड काढिली. चार्लस हावार्थ नांवाच्या इसमास त्या वेळीं ती तोड सुचली होती. आजचा प्रसंगही तसाच होता. ओल्डहॅम गांवापासून अर्ध्या मैलावर "जंबोफार्म" नांवाचें एक शेत होतें. येथें जार्जबूथ नांवाचा एक इसम राहात असे. तो मँचेस्टर येथील भर पेठेंत जेव्हां जेव्हां बाजारा करतां जाई; तेव्हां तेव्हां सहकारी फुटकळ विक्रीदुकानदारांचे हाल त्याच्या नेहमीं दृष्टीस पडत. कधीं कधीं तर हे सहकारी दुकानदार माल पटविण्याच्या चढाओढींत आपआपसांतच भावाची चढाओढ करीत. ही

बूथची घाऊक मालाच्या वखारीची युक्ती.

परिस्थिती बदलवून कांहींतरी इष्ट सुधारणा घडवून आणण्या करतां बूथनें आपल्या घरीं कांहीं सहकारी बोलावून खल चालविला.

९२ घाऊक वखारी उघडण्याकरतां या प्रमाणें लोकमत तयार

आब्राहम ग्रीनउडनें ही घाऊक मालाच्या वखारीची युक्ती अम

होत असतांना रॉकडेलच्या कोष्ट्यांनीं याही कामांत पुनः आघाडी मारिली. त्यांच्यांत आब्राहाम ग्रीनऊड नांवाच्या इसमानें ही युक्ती चालवूनही पाहिली. रॉकडेल येथील कोठा लँकेशायर

लांत आणून दाखविली.

व यॉर्कशायर येथील कोठ्यांस थोड्या फार प्रमाणानें माल पुरवीत असेच. त्यांनीं आतां लंडन येथील एका घाऊक मालाच्या वखारीशीं दळण वळण बांधून "उत्तरइंग्लंडची सहकारी घाउक मालाची वखार," या नांवाची वखार जेमतेम उभी केली.

घाऊक मालाच्या मध्यवर्ती कोठ्या करतां भांडवल.

९४ सहकारी कोठ्याची इमारत माणशीं अवघ्या दोन आणे वर्गणीवर निघाल्याचें आपणास माहीत आहेच. याच प्रमाणें इंग्लडांत आरंभीची घाऊक मालाची जी वखार निघाली तीहि एक एका दिडकीच्या ( Farthing ) देणगीवर निघाली आहे. ह्या वखारीच्या संस्थापनेची कल्पना अशीः—प्रत्येक सहकारी कोठ्यांत जितके सभासद असतील त्यांपैकीं प्रत्येकानें या वखारीच्या भांडवलाचा एक भाग विकत घ्यावा. तो घेण्याचें ठरल्यावर आणि तो घेण्याचे पूर्वी संस्थेस एक फार्दिंगची देणगी भरावी. फंड अशा प्रकारें जमा झाल्यावर सर्व सहकारी कोठ्यातर्फें एक मध्यवर्ती एजन्सी अगर घाऊक मालाची वखार स्थापून प्रत्येक कोठ्यास लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मालाचा तेथें मोठ्या प्रमाणावर साठा व्हावा. या वखारीच्या क्लृप्तीच्या योजकानें तिच्या स्थापनेपासून जे फायदे दाखविले ते असेः—

घाऊक मालाच्या वखारीचे फायदे.

( १ ) सहकारी कोठ्यांनां या वखारीमुळें विशेष काळजी काढ्यानें व उत्तम मिळेल. पूर्वीं भांडवलाच्या अभावीं व अनेक ठिकाणीं माल घ्यावा लागत असल्यानें सहकारी कोठेवाल्यांनां सुद्धां अद्वातद्वा भाव पडून मालही चवढवीचा पदरांत पडे; ही परिस्थिती जाऊन चोख माल मिळण्याची व्यवस्था होईल.

( २ ) माल असा चोख व शिस्तवार भावानें मिळूं लाग-

20 NOV 2013

एक भाव.

ल्यानें फायदा ही व्यवस्थित पडूं लागेल; कारण खर्च वेंच कमी होई. पूर्वीं हिकडे तिकडे माल पडताळून पाहाण्यास, किंवा एक अर्ध्यावेळीं तो वाईट लागला म्हणून वगैरे अनेक कारणांनीं नुकसानीची बाब होत असल्यानें कमी नफा पडे. ही परिस्थिती आतां टळली.

खात्रीचें ठिकाण.

( ३ ) नवीन नवीन निघणारे कोठे किंवा लहान साहान किरकोळ किरकोळ कोठे यांनांही घाऊक सौदा खात्रीपूर्वक जेथें होईल असें नक्की ठिकाण सांपडल्यानें फसगत न होतां त्यांनांही आपल्या गिऱ्हाईकांनां चांगलासा नफा देण्यास प्रथमपासूनच सांपडेल.

थोड्या भांडवलांत मोठा व्यवहार.

( ४ ) आतां घाऊक प्रमाणावर माल मिळण्याची सोय झाल्यानें मोठमोठ्या कोठ्यांचें सुद्धां भांडवल फार थोडें अडकून पडूं लागलें. पूर्वीं माल मिळेल कीं नाहीं, या धागधुगींत जेव्हां तो मिळतोसा वाटे तेव्हां एकदम सव्यानें घेऊन ठेवावा लागे. मग तो खपो वा न खपो, ठेवणीनें नासो किंवा सडो, भावाची चढउतार होवो; कांहीं होवो घेतला माल पत्करावा लागे. यामुळें बरेंच भांडवल नेहेमीं गुंतून पडे. आतां वाटेल तितका माल हवा तेव्हां मिळण्याची सोय झाल्यानें खपेल तेवढाच मंडळी उचलीत; त्या मुळें भांडवल सदा खेळतें राही.

निर्धास्ततेमुळें अनेक प्रकारची काटकसर.

( ५ ) मागें मागें काय होत असे कीं, प्रत्येक कोठ्यास पेठेंत माल घेतांना फसगत न व्हावी म्हणून ज्यांनां पारख आहे, पेठेची ज्यांनां चांगली माहिती आहे असे इसम स्वखर्चानें जवळ करावे लागत असत. सहकारी वखारी निघाल्यानें ही अडचण टळली. कोठ्यांतील वाटेल त्या इसमानें अशा वखारींत जा-

ऊन हवी तेवढी खरेदी निर्धास्त करावी. तेव्हां हा मध्यस्थांचा खर्च वांचला. प्रत्येक कोठ्याला जी अशी मध्यस्थाची जरूर लागावयाची ती सर्व कोठ्यां मिळून निघालेल्या एका वखारीलाच आतां लागावयाची. केवढी काटकसर ही ?

गांवकोठा व नगरकोठा यांच्यांतील परस्पर प्रेमळ संबंध.

( ६ ) घाऊक मालाच्या वखारीच्या योगानें शहर आणि खेडेगांव यांच्यांतील प्रेमसंबंध वाढतील. आणि राष्ट्रहितदृष्ट्या उभयतांतील स्नेहसंबंधाचे धागे बळकट तुणून निघणें अत्यंत हितावह आहे. शहरांत काबाडकष्टांत खपणाऱ्या मजुरास निर्भेळ अन्न मिळणें फार जरूर आहे, आणि असें निर्भेळ अन्न, गांवकऱ्यापासून शहरवासीयांस निर्भेळ पदार्थ प्रत्यक्षपणें मध्यस्थांच्या आडकाठी विना मिळाल्याशिवाय लाधणार नाहीं. मग हा गांवकऱ्यांचा व शहरवासी यांचा प्रत्यक्ष संबंध यावा कसा ? कोठ्याचे प्रकार सांगतांना मागें निरनिराळ्या प्रकारचे पण एकाच तत्वानें सांधलेले असे दोन कोठे दाखविले आहेतच:—एक गांवकोठा ऊर्फ खेड्यांतला कोठा आणि दुसरा शहर कोठा. यांपैकीं पहिल्यांत म्हणजे गांवोगांव उभारलेल्या डेपोंत शेतकरी आपआपलें धान्य आणून विक्रीस ठेवतात. शहरच्या सहकारी कोठ्यास तर असें धान्य हवें असतें. तेव्हां सहकारी घाऊक मालाची वखार ही गांवकोठा व शहरकोठा यांच्यांतील दुवा चांगला सांधील. डेपोंनीं आपला माल घाऊक वखारींत आणून टाकावा व घाऊक वखारीनीं तो किरकोळ कोठ्यांना पुरवावा अशा परंपरेनें गांव आणि शहर यांच्यांतील लागेबांधे बळकट होतील. या शिवाय शहरच्या कारागिरांनीं बनविलेला

माल शहरच्या घाऊक वखारींत येऊन पडल्यानें तो अदला-बदलीनें, ह्मणजे गांवकोठ्यांतून जें धान्यधुन्य अशा वखारींत येऊन पडेल त्याच्या ऐवजीं किंवा मोबदल्याच्या रूपानें खेडेगांवांत गरजानुसार जाईल. येथें विनिमयाचें काम आपोआप होऊन रोकड पैशाच्या अभावीं निव्वळ पतीवर पर्वताएवढ्या उलाढाली कंगाल मजूर आणि शेतकरी यांच्या दरम्यान होऊं लागतील. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें देशाच्या सांपत्तिक अवस्थेंत केवढा ही उत्क्रांती !

घाऊक मालाच्या वखारीची प्रस्थापना (१८६३) व वाढ.

९९ अशा कांहीं धोरणांनीं प्रेरित होऊन ता. ११ आगष्ट सन १८६३ रोजीं इंग्रजी घाऊक मालाची वखार रजिस्टर होऊन तिनें ता. १४-३-१८६४ रोजीं प्रत्यक्ष व्यवहारास हात घातला. आज मित्तीस यांच्या मोठमोठ्या इमारती, मोठमोठे कारखाने जंगीं जंगी शेतें, टोलेजंग आजाऱ्यांचीं शुश्रुषागृहें, देशपरदेशचा माल वाहून नेआण करण्याकरतां मोठमोठालीं जहाजें आहेत. अशा प्रकारें सहकारीतत्वाचा उत्तरोत्तर तिकडे सारखा उत्कर्ष होत आहे. सन १८७३ च्या सुमारास अशा वखारींनीं जिनसा तयार करण्याकरतां स्वतःचे कारखाने उभारले. लीस्टर येथें बूटजोड्यांचा तसाच क्रमशॉल येथें बिस्कीटें व मेवामिठाईचा, असे नाना जिनसांचे अनेक कारखाने त्यांनीं उभे केले. यांच्या कारखान्यांत कामकरी म्हणजे निव्वळ हमाल नसून ते सर्व प्रकारचीं सौख्यें व सोय अनुभविणारे, योग्य मेहनतीनें मिळवून साल अखेर नफ्याचा वांटा मिळविणारे खरेखुरे मालक आहेत.

स्कॉटलंडमधील अनुकरण.

९६ इंग्रजी घाऊक वखारींचें अनुकरण स्कॉटलंडांतही ताबडतोब झालें. १८६८ मध्यें ग्लॅसगो शहरीं अशी एक वखार निघाली. ही वखार काढ-

16 MAR 1990

तांना इतकी सावधगिरी बाळगण्यांत आली होती कीं, पहिल्या तिमाहीस अवघे १७९५ पौं. चें भांडवल या वखारीच्या उभारणीस जमा करण्यांत आलें होतें, आणि वखारीची विक्री अवघी ९६९७ पौं. ची झाली होती. आज मित्तीस सबंध ग्रेटब्रिटनभर

अन्य ठिकाणीं प्रसार.

या वखारींचें जाळें पसरलें आहे. लंदन येथील कोकोचा कारखाना, कॉफीची वखार, सिलोन मधील चहाचे मळे वगैरे अनेक प्रचंड कारखाने निव्वळ संयुक्त किंवा संघबळावर, सहकारितेच्या भरंवशावर यांनीं काढलेले आहेत.



# भाग ९ वा.

—:०:—

## सहकारिता आणि उद्योगधंद्यांचें पुनर्जीवन.

९७ आपल्याकडील उद्योगधंदे बसले आहेत, नवीन काढण्याची सोय नाहीं, हात–उद्योगधंद्यांचा तर पुरा नायनाट झाला आहे, ह्या गोष्टी आतां महशूर आहेत. रॉकडेलच्या कोष्ट्यांनीं काय केलें कीं बाजारांत जे जिन्नस मिळतात ते जरा जास्त कसोशीनें खरेदी करून थोडीशी फसवणुकीची जागा कमी करून थोडी फार प्रपंचांत काटकसरीस जागा केली. तरी पण त्यांना बाजारांत जिन्नस आला तर ही निवड करावयास सांपडे. समजा, जिन्नस नच आला, किंवा जे जिन्नस आपल्या देशांत होत नाहींत, परदेशांतून येतात ते परदेशानें एखादे वेळेस पाठविले नाहींत, किंवा अव्वाचीसव्वा त्या बद्दल किंमत मागितली तर सहकारी कोठे असून व नसून काय उपयोग? नुसती तागडी तराजू हातांत घेऊन या पेठेंतला माल त्या पेठेंत पोहोंचविणें हें काम वाणीसुद्धां करतात. आपल्या गरजांस लागणारा सर्व माल आपल्या देखरेखी खालीं जर आपण तयार करून कोठ्याच्या ठिक्यांत लावला तर केवढें महत्कार्य होईल! येवढ्याच करतां, रॉकडेलच्या नमुनेदार संस्थेनें आपल्यापुढें संस्थेच्या अनेक उद्देशांपैकीं चौथा मोठा महत्वाचा आणि उदात्त हेतु धरला होता. तो असाः—

*सहकारी कोठ्यानें आपणांस लागणारे जिन्नस स्वतः तयार करविले पाहिजेत.*

*नुसती उलाढाल वाणी उदमी सुद्धां करतात.*

( ४ ) शक्य तितक्या जिनसा तयार करण्यास आ-

रॉकडेलच्या कोष्ट्यांचें एक धोरण.

पले स्वतःचे कारखाने उभारावयाचे. अशा कारखान्यांत आपल्या सभासदांपैकीं ज्यांना ज्यांना उद्यो॰धंद्यांची वाण असेल त्यांना त्यांना उद्योग लावून द्यावयाचा.

अशा धोरणांत स्वावलंबनाचा धडा आहे

९८. वरील नियम म्हणजे स्वावलंबनाचा मूर्तिमंत मंत्र आहे. इंग्लंडमध्यें भाकरीची कणीक गिरण्यांतून दळून आणण्याचा रिवाज आहे. ह्या गिरण्यांत प्रथम पासून फसवेगिरीची लयलूट असे. सबब हा धंदा स्वतः करून पहाण्याकरतां १७९९ सालीं हल या गांवीं एक

हल येथील जुना प्रयत्न.

धान्याची गिरणी निघाली. सहकारी तत्वाचा जनक रॉबर्ट ओवेन याच्या लॅनॉर्क गांवीं गिरण्या असत. येथील मजुरांचें कौशल्य वाढून त्यांच्या मजुरींत भर पडावी ह्मणून मजुरांच्या शिक्षणाचे त्यानें तेथें

ओवेनचे धंदेशिक्षणार्थ यत्न.

वर्ग काढले होते. या वर्गांत मजुरांस अनेक हुन्नरांचें शिक्षण देण्यांत येई. ओवेननें नव्या नव्या वसाहती वसवून तेथील लोक उद्योगधंदे करण्यास समर्थ करावयाचे असा उदात्त संकल्प धरला होता. उद्योगधंद्यांचा उत्कर्ष करण्याकरतां, एखादी वस्तु बनविण्यांस जितका काळ वेळ लागला असेल त्याप्रमाणांत त्या वस्तूची बाजारांत किंमत यावी, ह्मणजे वस्तूची किंमत तिला बनविण्यास लागलेल्या काळ वेळानें मापिली जावी, अशा कांहीं योजना त्यानें योजिल्या. या प्रयत्नाच्या पाठीमागून कांहीं समाजोद्धारक मंडळ्या निघाल्या. या मंडळ्यांचा हेतु म्हणजे उद्योगधंद्यांचा उत्कर्ष स्वावलंबनपर प्रयत्नांनीं करण्याचा होता. या

समाज सुधारकांचे असेच प्रयत्न.

अशा प्रयत्नांत " ख्रिश्चन सोशियालिस्ट " नांवाच्या समाजसुधारकांनीं अविश्रांत व श्रेष्ठ स्वार्थत्यागाचे प्रयत्न केले आहेत. यांनीं कामकऱ्यांकरतां एक शिक्षण-

संस्था उभारली. यांनीं सहकारी तत्वावर औद्योगिक समिती कामकरी लोकांकडून काढविल्या. शिंपिणींची समिती, चांभारांची समिती, मुद्रकांची समिती, शिल्पकारांची समिती, काढण्यांत या समाज सुधारकांनीं आपलें प्रपंच—सर्वस्व अर्पण केले होतें.

सगळ्यांच्या प्रयत्नांपेक्षां रॉकडेलच्या प्रयत्नास श्रेष्ठ यश आलें.

९९. सर्वांनीं सर्व बाजूंनीं देशांतील उद्योगधंदे सजीव करण्याकरतां औषध योजना चालविली होती; पण सहकारी कोठ्यासारखें यश इतरांना क्वचित्च आलें. रॉकडेलच्या कोष्ट्यांनीं आपल्या कोठ्यांत विक्रीकरतां लागणारी कणीक दळून घेण्यास आपल्या स्वतःच्या गिरण्या उभारल्या. आपल्या सभासदांच्या पायांतले बूट जोडे तयार करण्याकरतां स्वतःचे कारखाने उभारले.

घाऊक मालाच्या वखारींनीं औद्योगिक कारखान्याचीपुरवणी जोडिली.

घाऊक मालाच्या वखारी जेव्हां निघाल्या, तेव्हां कोठ्यास आपल्या देखरेखीखालीं, आपल्यांतील कारागिरांनीं बनविलेला माल पुरविण्याची फार गरज भासूं लागली. प्रतिवर्षांच्या नफ्यांतून दरवर्षीं नवे नवे कारखाने निघूं लागले. घाऊक वखारींचे सभासदरुपी सहकारी कोठ्यांतील प्रत्येक सभासदाकडून वर्गणी, व भाग वगैरे रुपानें भांडवल जमवून सहकारी लोकांनीं इंग्लंडांत अनेक धंदे उर्जितावस्थेस आणले आहेत.

सहकारितेनें इंग्लंड देशांत अनेक उद्योगधंदे उर्जितावस्थेस आले आहेत.

एकच उदाहरण देणें येथें बस्स होईल. शिल्डहॉल ( स्कॉटलंड ) येथें सहकारी लोकांची एक जंगी इस्टेट आहे. उद्योगधंद्याच्या कारखान्यांनीं हें ठिकाण नुसतें फुलून गेलें आहे. या ठिकाणीं ५००० वर कामकरी निरनिराळ्या कारखान्यांत उद्योगमग्न असतात.

शिल्डहॉलचें उदाहरण.

या कामकऱ्यांच्या सुखसोयीकरतां मोठमोठे दिवाणखाने उभारले असून त्यांत १५०० लो-

भोर

कांना अन्नपाण्याच्या सोयीकरतां खोल्या काढून दिल्या आहेत येथें कामकऱ्यांना खासगी सोयीनें जो खर्च लागेल तेवढ्याच खर्चात खाणावळीची सोय करून देण्यांत येते. मध्यन्तरीं मोठमोठालीं दालनें असून कांहींत त्यांच्या मनरंजनाच्या साधनाचीं, कांहींत वाचनालयांची, सोय करून देण्यांत आलेली आहे. यामुळें येथील कामकरी सदा प्रसन्नमुख व तरतरीत असे दिसतात. लॅनॉर्क गांवांतील ओवेनच्या गिरण्यांतील उदार शिक्षणाचें व प्रयोगाचें धोरण येथेंही राखण्यांत आलेलें आहे. येथील कामकऱ्यांना माफक तास काम पडतें, मेहनताना साजेसा मिळतो आणि काम करण्याची जागा किंवा एकंदर वातावरण खुलें, प्रसन्न आणि आरोग्याच्या सर्व सोयींनीं भूषविलेलें असतें. या योगानें हजारों कामकरी आज सहकारितेच्या बिनीखालीं सुखानैं नांदत आहेत.

१०० सहकारितेनें उद्योगधंद्याचा उत्कर्ष होतो येवढी गोष्ट समजली म्हणजे आपल्याकडील जर्जर झालेला शेतीचा धंदाही उर्जितावस्थेस येईल हें निराळें सांगावयास नको. जगांतील सर्व देशांनीं सहकारितेच्या बळावर शेतकीस औद्योगिक स्वरूप देऊन मोठी उत्क्रांती घडवून आणली आहे. शेतकऱ्यांनीं आपल्या दुभत्या जनावरांच्या दुधापासून लोण्यातुपाचा पुरवठा वाढविण्याकरतां मोठमोठ्या सहकारी संस्था उभारल्या आहेत. बीट, ऊंस अशा पदार्थांपासून साखर वगैरे पदार्थ शास्त्रीय पद्धतीनें बनवून शेतकीच्या धंद्यांत पैदास्तीचा कडेलोट करून सोडला आहे.

सहकारितेनें आपल्याकडील निकृष्ट शेतीच्या धंद्यास उदीम पंथाचे रूप देववून त्याचा उत्कर्ष करतां येईल.

१०१ शेतकी आणि सहकारिता या संबंधानें पुढें एका प्रसंगीं लिहावयाचें असल्यानें आज नुसती त्रोटक दिशा दाखविण्यापलीकडे कांहीं करतां येत नाहीं.

१०२ १८३२ सालीं लंदन येथें सहकारी लोकांची कांग्रेस भरली होती. येथें मि. हर्स्ट नांवाच्या एका इसमानें सहकारी कारखान्यांत तयार झालेले हातरुमालाचे नमुने, धातूच्या बनविलेल्या चहादाण्या, चाकू वगैरे अनेक जिन्नस प्रदर्शनांत मांडले होते. त्यांचें वर्णन देत असतांना तो गृहस्थ मोठ्या कौतुकास्पद अभिमानानें "मी नखशिखांत सहकाऱ्यांनीं बनविलेल्या पोषाखांत आहे," असें सांगूं लागला. आणि त्याचा कोट, त्याचा शर्ट, त्याचें जाकीट इत्थंभूत सहकारी कारखान्यांतल्या कापडाचें व सहकारी कामकऱ्यांनीं शिवलेलें होतें. धन्य आहे सहकारितेची कीं, जिच्या बळावर, भांडवलाच्या अभावीं ही, देशांतील रसातळास गेलेले धंदे उत्कर्षाच्या शिखरावर चढवितां येतात. असा सुदिन आपल्याकडे केव्हां येईल?

स्वावलंबन तेजस्वितेंच एक उदाहरण.

दोन आण्याच्या भांडवलावर देशांतील औद्योगिक उत्कर्ष साधतो हा केवढा चमत्कार!

१०३ दोन दोन आण्याच्या वर्गणीनें सहकारी कोठा, घाऊक मालाची वखार व उद्योग धंद्याचे पुनर्जीवन इतक्या गोष्टी साधून दारिद्र्य हटवितां येतें हा केवढा चमत्कार?

## भाग १० वा.

—:०:—

### मीं सहकारिता कां पत्करावी ? हें व्रत कां घ्यावें ? हा वसा कां घ्यावा ?

१०४ सहकारिता म्हणजे सद्गुणांचा मळा, दरिद्र्याची कामधेनू, आंधळ्याची काठी किंवा पंगूचा श्यामकर्ण आहे. सहकारी कोठा म्हणजे सांपत्तिक, सामाजिक आणि नैतिक सद्गुणांची एक शाळा आहे. आपणांत केवढें सामर्थ्य सांठविलेलें आहे याची जाणीव सहकारितेनें उत्पन्न होते. अंगीं सामर्थ्य असून केवळ अज्ञानामुळें त्याची ओळख नसणें या सारखें दुर्दैव नाहीं. पै पैसा, दिडकी दुगाणीचा फंड करून केवढें राष्ट्रकार्य जिंकतां येते याची मूर्तिमंत शिकवण सहकारितेंत असल्यामुळें आतांपर्यंत ज्या सहकारी प्रयत्नांची पोथी ऐकली तिची सांगता काय, या पोथींत निरूपण झालेल्या व्रताची फलश्रुती काय, हें सांगितलें पाहिजे.

**१०५ सहकारी कोठा उघडला म्हणजे तुमचें दारिद्र्य हरेल.** कारणः—

१ या ठिकाणीं खर्चीं पडलेले पैसे जणूं पेरल्याप्रमाणें सव्याज उगवतात. सहकारी कोठ्यांत माल खरेदी करणारास दरवर्षीं झालेल्या नफ्यापैकीं कांहीं प्रमाणांत नफा वांटून देतात. समजा, तुम्हांस १५ रु. पगार आहे. प्रपंचाच्या कामीं तुम्ही हा पगार कोठ्यांतून धान्यधुन्य, कापडचोपड आणण्यांत खर्च केलेत म्हणजे जिनसाच्या रूपानें तुमचे रुपये वसूल होतातच, पण वर जो नफा म्हणा किंवा

स्वस्ताई म्हणा, फायदा पडेल तो जादा होईल. अदमासानें दरमहिन्यामागें तुम्हाला एक रुपया फायदा पडतो असें जर धरलें तर तुम्हास सोळावा रुपया मिळाला. म्हणजे पगार १५ रुपये पण हातांत मिळतात सोळा.

**२ या ठिकाणीं तुम्ही कर्जमुक्त राहाल.** कारण, सहकारी कोठ्यांत रोखीचा व्यवहार चालतो. उधारी बंद असते. वाण्याउदम्याच्या येथें उधारी–पाधारीची सवलत मिळाली म्हणजे मोह अनावर होतो. क्षुद्र गोष्टींत सुद्धां आत्मसंयमन करण्याची ताकद राहत नाहीं. क्षुद्र गोष्टी सांचतां सांचतां राईचा पर्वत होतो. कर्जाला कर्ज, व्याजाला व्याज, उधारीच्या उगमापासून फुटून, रोपाचा वृक्ष बनून त्याच्या मुळ्या पारंब्यांनीं आसपासचे जाईजुईचे वेल कोमेजून जातात. कर्जानें घरादाराचा उन्हाळा होतो. उधारीच बंद झाली, भिडभिकेचें मूळच उपटून निघालें म्हणजे मनुष्य खर्च आटोक्यांत करूं लागतो व भावी संकटापासून अनायासें दूर राहतो.

**( ३ ) या ठिकाणीं तुह्मांस संचय करण्याची आपोआप संवय जडेल.** कारण, सहकारी कोठ्यांतून सालअखेर तुम्हांस नियमित नफा पडेल. संसारिकानें केवढी जरी धडपड केली तरी या महिन्याचा पगार त्या महिन्यास राहात नाहीं. मग बचत व्हावी कशी? कुणगा सांचावा कोठून? वाण्या उदम्यांच्या दुकानांत जेव्हां आपण खरेदी करण्याकरतां जातों तेव्हां कोठला नफा नि काय आपल्याला मिळणार! उलट महागाईनें मात्र जिन्नस पदरांत घ्यावे लागतात. सहाकारी कोठ्यांत आपण केलेल्या खरेदीच्या मानानें साल अखेर जो आपणास नफा मिळेल

तो तसाच कोठ्याच्या गंगाजळींत सांचूं दिला ह्मणजे पर-भारें व अनायासें आपल्या नांवें अनामत रक्कम पडेल. कांहीं वर्षांपूर्वीं एका माणसानें या भांडारांत ५ पौं. चे शेअर भरले व पुढें त्यांत एक पैही भर टाकिली नाहीं. परंतु सुमार १२।१३ वर्षांनंतर त्याच्या नांवानें १२५ पौंड ह्मणजे १८७५ रु. झाले आहेत. त्याच प्रमाणें ८।९ वर्षांपूर्वीं एक गृहस्थ ९० रु. भरून भागीदार बनला. पुढें या दुकानांतून वरील गृहस्थाप्रमाणें आपल्या संसाराचा माल घेण्यापलीकडे त्यानें दुसरें कांहींएक केलें नाहीं; आणि दरवर्षीं त्याचा नफा या भांडवलांत सांचत जाऊन आज याच्या वांट्याची ११० पौं. म्हणजे १६५० रु. ची रक्कम जमली आहे. एका गृहस्थानें तर फक्त आठच आणे प्रवेश फी म्हणून भरले आहेत पण त्याला २०००।३००० रुपयांची ठेव अशा कोठ्यांतून मिळाली आहे.

(४) **सहकारितेमुळें तुमच्या सुखांत आणि वैभवांत भर पडेल.** दरिद्री लोकांना चिंतेनें सदा व्यापलेलें. काळजी त्यांच्या पांचवीला पुजलेली. हें जितकें खरें तितकेंच खालील आंकडे पण खरे आहेत:—

राकडेल गांवीं १८४४ सालीं जो आरंभ झाला त्यांत:—

| मेंबरांची संख्या | भांडवल |
|---|---|
| २८ | २८ पौं. |

ही सामुग्री होती. आतां १९०९ अखेरचा त्यांचा उत्कर्ष पहा:— (१९०९)

| | |
|---|---|
| सभासदांची संख्या.............. | १७०५४ |
| भागभांडवल.... .... .... .... | ३३३,४६८ पौं. |
| गंगाजळी.... .... .... .... | १००८८ पौं. |

कृपया पुस्तके जपून वापरा

| | |
|---|---|
| वार्षिक उलाढाल .... .... .... | ३६४,९९४ पौं. |
| शिक्षण खर्च.... .... .... .... | ६३२ पौं. |
| माल उत्पादन किं..... .... .... | ९६७७८ पौं. |
| किती लोक कामावर होते .... .... | १२२ |
| कितीलोक दुकानदारीवर होते .... .... | २७३ |
| पगार किती वांटला .... .... .. | २४३७२ पौं |

आतां निव्वळ घाऊक मालाच्या वखारवाल्यांनीं केवढी उलाढाल केली पहा. यांचे आपण १८६४ ते १८९४ दरम्यानचे तीस वर्षांचे आंकडे घेऊं तसेंच ते स्काटलंदचेही घेऊं.

| साल | नफा |
|---|---|
| १८६४—९४ | १,४७२,९३७ पौं. इंग्लंड |
| १८६८—९४ | ९०१,८२० पौं. स्कॉटलंड |
| | २,३७४,१९७ मिळून |

आतां माल उत्पादन आणि विक्री करणाऱ्या किरकोळ व घाऊक मंडळ्यांची वाढ एकट्या ग्रेटब्रिटनमधें १९०७ सालीं कशी झाली होती त्याचे आंकडे पहाः—

| सभासद | मंडळ्या | भाग व हुंडीरुपानें भांडवल | गंगाजळींत व विम्यांत | विक्री |
|---|---|---|---|---|
| २४,३२९९८ | ६६०५ | ४२,०९६,९७६ | ३,७२९,२८२ | १२३,३५०,४६४ |

| नफा व मुदलाचें व्याज | मंडळ्यांत किती लोक कामावर होते |
|---|---|
| ११,९७६,९९६ | ११९,९६९ |

सन १९०८ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें सहकारितेंत गुरफटलेल्या सभासदांची संख्या पाहिली ह्मणजे ती २९००,००० भरते. ह्मणजे २९००,००० कुटुंबांतील एक एक

प्रतिनिधी या सहकारी कोठ्याचा सभासद होता व प्रत्येक कुटुंबांत सरासरीनें ४ माणसांचा अंतर्भाव होतो असें मानलें तर एकंदर १००००००० एक कोटीवर गोरगरीब सहकारी वृक्षाच्या शीतळ छायेंत आले होते. एका तीस वर्षांच्या उलाढालींत सहकाऱ्यांनीं १६८००००,००० रु. नफा आपल्या घरांत वाहून नेला. येवढा द्रव्याचा प्रचंड ओघ सहकारीतेनें ज्या एक कोट सहकाऱ्यांच्या घरांत वाहून नेला त्यांच्या भाग्यास कोण पारावार! केवढें सौख्य, कोण सुखसमृद्धी यांच्या मुलाबाळांत नांदत असेल! खुद्द रॉकडेल गांवीं गोरगरिबांच्या चंद्रमौळी झोपड्यांत सुद्धां बाज्याच्या पेट्यांचे सुस्वर आलाप कामावरून घरीं आलेल्या लोकांनां रिझवीत असत.

(५) **सहकारितेच्या साहाय्यानें आपले लोक आपण अभ्यास लावतोः**—सन १९०७ सालीं सर्व जातीच्या सहकारी संस्थांत सबंध युनायटेड स्टेटस्‌मधें ११५,९६९ लोक वखारी कारखान्यांत खपत होते.

सन १९०८ सालीं खुद्द कामकऱ्यांनीं चालविलेल्या सहकारी संस्थांत २,४४६,६९६ लोक गुरफटले होते. याच सालीं घाऊक मालाच्या वखारींनीं काढलेल्या कारखान्यांत ५०१४२ कामकरी कामावर असून त्यांनां २,८२५,६४७ पौं. पगार ह्मणून वांटावे लागत. १९०७ सालीं शेतकीकडील उद्योगधंद्याच्या कारखान्यांत सुमार ४३,५३७ लोक काम करीत होते. आतां सहकाऱ्यांनीं जे निरनिराळे धंदे चालविले होते त्यांतः—

१ बांधकाम, २ इमारतीचें काम, ३ खाणीचें काम, ४ धातू-पत्र्याचें काम, ५ शिल्प कलेचें काम, ६ तांरवे

बांधण्याचें काम, ७ वीण काम, ८ बूट—जोड्याचें काम, ९ शिंप्याचें काम, १० आयते कपडे तयार करण्याचें ह्मणजे पोषाख तयार करणाराचें काम, ११ छापण्याचें व तत्संबंधी काम, १२ कांतण्याचे, लांकडावर काम करण्याचे, लांकडी सामान सुमान तयार करण्याचें सुतारकाम, १३ साबण, मेणबत्ती, स्टार्च तयार करण्याचें काम, १४ कणीक दळणाराचें पाव बनविणाराचें, हालवायाचें काम, कसायांचें काम ह्मणजे सर्व प्रकारच्या मुदपाक्याचें काम, १५ तंबाखू तयार करण्याचें, १६ चटया, ब्रश वगैरे तयार करणाराचें काम—वगैरे हजार धंदे व अठरा कारखानें यांनीं काढले आहेत.

**( ६ ) सहकारी कोठ्यामुळें कोणास रिकामे राहून उपाशीं मरण्याची पाळी येत नाहीं:—**

सहकारितेंत गुरफटलेल्या हजारों कामकऱ्यांनीं स्वसंरक्षणाकरतां ज्या निरनिराळ्या संस्था उभारल्या होत्या त्यां पैकीं कांहीं नमुन्या करतां खालीं दिल्या आहेतः——

## सभासद.

| | |
|---|---|
| १ घरें बांधणाऱ्या मंडळ्या | ६२३०४७ |
| २ बंधुसमाज | १५,९८३,२६४ |
| ३ औद्योगिक आणि प्राव्हिडंट | २९८८२०९ |
| ४ कामकऱ्यांचे संघ | १९७३५६० |
| ५ लंगड्या थोट्या ह्मणजे कामावर अगर गिरण्याकारखान्यांत अपघातानें पंगु झालेल्या अनाथ मजुरांची | |

| | |
|---|---|
| तरतूद लावणाऱ्या मंडळ्या. | ९९३७१ |
| ६ गरजेनुसार मजुरांनां रकमा उसनवार देणाऱ्या मंडळ्या. | ३३५७६ |
| | २१,३०१,०२७ |

## भांडवल.

| | |
|---|---|
| १ घरें बांधणाऱ्या मंडळ्या. | ७७॰८९२२९ |
| २. बंधुसमाज | ५७,१२८,१६८ |
| ३ औद्योगिक आणि प्राव्हिडंट | ५६३९३३१३ |
| ४ कामकऱ्यांचे संघ | ६४२४१७६ |
| ५ लंगड्या थोट्या ह्मणजे कामावर अगर गिरण्याकारखान्यांत अपघातानें पंगु झालेल्या अनाथ मजुरांची तरतूद लावणाऱ्या मंडळ्या | १६४५६० |
| ६ गरजेनुसार मजुरांनां रकमा उसनवार देणाऱ्या मंडळ्या. | २६०९०५ |
| | १९७,६६७,३५१ |

**( ७ ) सहकारी कोठ्यामुळें शुद्ध व स्वच्छ अन्नाची जोड होते.** तुपांत चरबी, खोबऱ्याच्या तेलांत रॉकेल, साखरेंत पीठ, दुधांत पाणी, चहांत रेती इत्यादि मिसळीचे प्रकार आपणांस पुऱ्या ओळखीचे झाले आहेत. खेड्यापाड्यांनीं तर विचारूंनका. सदर्न मराठा रेलवेच्या स्टेशनासारख्या आडरानाच्या ठिकाणीं तर गोरगरिबांनां निव्वळ माती पोटांत भरावी लागते. पाटीवाल्या दूध घालीत असतात, तें दूध ह्मणने

खडू उघाळलेलें पाणी किंवा तांदुळाचें धूण असतें असा पुष्कळांचा अनुभव आहे. सहकारी कोठ्यांत एकत्र गोंवलेल्या चारचौघांस आपल्या प्रपंचाचा पुरवठा आपल्यालाच करून घेण्याचा असल्यामुळें सर्व जिन्नस पाहून, निरखून, निर्भेळ असे ठेवावे लागतात. आपला संसार आपण हांकूं लागण्यास समर्थ झालेल्या लोकांची आत्मवंचना होत नाहीं. " जो दुसऱ्यावरी विश्वासला तो स्वयें ठार बुडाला, "असा जगांतला नियमच आहे.

**( ८ ) सहकारितेनें काढलेल्या कोठ्यामुळें मालाची स्वस्ताई होते. त्यामुळें गोर गरिबांना प्रपंच हलका होतो.** असें पहा कीं, इंदापुरास जोंधळा उत्पन्न होतो. पण शेतकऱ्यांजवळ त्राण नसल्यामुळें तो पुण्यासारख्या जवळपासच्या बाजारास नेऊन विकीत नाहीं. मुंबईचा एखादा व्यापारी इंदापुरापर्यंत येऊन सट्यानें सर्व धान्य खरेदी करून घेऊन जातो. ह्मणजे पहा, इंदापुरापासून मुंबई पर्यंतचें रेलवेचें भाडें त्या जोंधळ्यावर बसून पुन्हा ते पुण्यास आणावयाचे ह्मणजे त्यावर मुंबई ते पुणें रेलवे भाड्याची आकारणी होते. यांत रेलवेंतील चोऱ्यांची, अडत्यांच्या हमालीची व लुच्चेगिरीची, अडत्यांच्या जागेच्या भाड्याची सारखी भर पडत जाते. त्यानंतर दाणेआळींतील किरकोळ व्यापाऱ्यांच्या दुकानाच्या भाड्यातोड्याची, त्यांच्या नफ्याची, त्यांच्या भांडवलाच्या व्याजाची, अशी सारखी भर पडतेच. पुन्हां पेठां-पेठांतले वाणी-उदमी हा जोंधळा आपल्या दुकानांत नेऊन सांठवतातच. इतक्या सगळ्यांची तुंबडी गोरगरिबांस भरावी लागते. यामुळें दुष्काळांत तेरावा महिना होऊन महागाई जड जाते. सहकारी कोठ्यामुळें ही

परिस्थिती पालटेल. इंदापुरचे सहकारी इंदापुरचा माल प्रथम इंदापुरास खपवतील; नंतर वस्त्रापात्राच्या मोबदल्या करतां जिल्याच्या सहकारी घाऊक वखारींत उरला माल आणून भरतील. जिल्ह्याच्या घाऊक वखारींचे चालक सहकारी आपली सोय पाहून यांतून उरलेला माल इलाख्यासारख्या ठिकाणीं पोंहचवतील. इलाख्यांतले सहकारी स्वतःचें पोट भरून जवळपासच्या इलाख्याच्या शिल्लकबाकींतून समाचार घेतील. असे सर्व इलाखे सबंध देशाचा परामर्ष घेऊं लागून देशांत जास्त झालेल्या जिनसानें स्वदेश, परदेशाचें क्षेमवृत्त पाहील; अशा रितीनें सहकारितेनें एक सुखमय क्रांती चोंहोंकडे होऊन अखंड विश्रांत शांती, समृद्धी आणि बंधुप्रेम नांदूं लागेल. प्रत्येक देश स्वयंपूर्ण, स्वावलंबी होईल. आज जे हरठिकाणीं कायद्याच्या बंधनाचें राज्य आहे तें परस्पर विश्वासाच्या आणि नीतीच्या संबंधाचें होईल. उदाहरण पहा; अन्नपानाच्या जिनसाच्या भेसळीबद्दल अनेक देशांत अनेक कायदे झाले आहेत पण परिस्थिती आहे तीच आहे. तेंच सहकारी तत्वाचा फैलाव झाल्या- बरोबर भेसळीबिसळीच्या पापांचा आपोआप क्षय झाला आहे. **ह्मणजे जें कायदा करूं शकणार नाहीं तें सहकारिता घडवून आणिते.**

(९) याचें दुसरें ताजें उदाहरण पहाः—मजुरांना गुरांसारखें राबावें लागतें, म्हणून देशोदेशींच्या कायद्यांनीं कामाचे तास मर्यादित केले आहेत. पण कायदेवगैरेनीं बांधून न घेतां ही कामगिरी सहकारितेनें घडवून आणली आहे. चालू सहकारी डायरेक्टरी घ्या व तींत कोणत्याही संस्थेचे आठवड्याचे कामाचे तास तपासून पहा, संस्थेनें

आंखून घेतलेल्या वार्षिक सुट्टया पहा. कामाचे तास माणशीं दररोज सहा पासून आठ पडतील. सुट्टया बारावर तरी सबंध सालांत मिळाल्या असतील; शिवाय आठवड्यास एक दिवस तरी अर्ध्या सुट्टीचा असतोच. १९०९ सालीं युनायटेड किंगडम मध्यें १२०८ सहकारी मंडळ्यांतं ९९,-४१६ नोकरांनीं एका आठवड्यास ३,१८१,९६८ तास काम केलें. याच्या सरासरीचें प्रमाण सुमारें एका आठवड्यास ५३।५६ तासांचें म्हणजे रोजीं ८ तासांचें बसतें. हल्लीं तें सुमार ६ वर आलें आहे.

( १० ) **याचेंच तिसरें उदाहरण म्हणजे सहकारी कोठ्यांच्या प्रसारामुळें लोकांचें आरोग्य वर्धन होतें** सुधारलेलीं सरकारें प्रजेंत आरोग्य नांदावें म्हणून मोठ्या धोरणानें कायदे पास करीत असतात. यद्यपि परिणाम असावयाचा तसाच अनिष्ट असतो. दलदलीची जागा असेल तेथें मलेरिया होतो, असें पुष्कळ आरोग्यशास्त्रानें पढविलें आणि घरें शेतखाने कांहीं विशिष्ट तऱ्हेनें बांधावेत असें पुष्कळ मुनिसिपॅलिट्यांनीं आणि कॅन्टोन्मेंट कोडांनीं फर्माविलें तरी दारिद्य सगळ्या नियमांनां हरताळ फासतें. चोहोंकडे बारा आणे रुपाया खण जागा झाल्यामुळें गोरगरीब शेणखयीची, खताऱ्या मुताऱ्याची, डांस चिलटं घुंगरटांच्या अंडीं पिलांच्या मिराशीची स्वस्ताची जागा पत्करतात. करतील काय बिचारे! सगळीं सोंगें साधतात, पण पोटाचें सोंग साधत नाहीं. आपल्या सभासदांस राहतीं घरें बांधून द्यावयाचीं असा एक रॉकडेलच्या संस्थेचा उदात्त हेतू होता. त्याचाच अनुवाद इतर सहकारी संस्थांनीं केला आहे. या शिवाय तिकडे घरें बांधणाऱ्या

मोर

सहकारी मंडळ्याही निघाल्या आहेत. सुमारें १९०६ अखेर सहकारी मंडळ्यांनीं आपल्या सभासदांकरतां घरें बांधण्याचें जें काम केलें त्याची माहिती खालीं दिल्याप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| मंडळ्यांच्या मालकीचीं बांधलेलीं घरें | ८,५३० |
| मंडळ्यांच्या मालकीचीं विकलेलीं घरें | ५,५७७ |
| मंडळ्यांनीं आगाऊ उसनवार दिलेल्या पैशानें सभासदांनीं बांधलेलीं घरें | ३२,६०० |
| | ४६,७०७ |

| | |
|---|---|
| मंडळ्यांनीं घरें खरेदी करण्याकरतां खर्च केलेली रक्कम | १,८३९,०६९ पौं. |
| सभासदांना घरें विकलीं त्याबद्दल मंडळ्यांस आलेला खर्च | १,२३२,०७३ |
| सभासदांनीं बांधलेल्या घरांकरतां मंडळ्यांनीं उसनवार दिलेले पैसे | ६,५३२,२९६ |
| | ९,६०३,४३८ |

सहकारी तत्त्वावर राहतीं घरें पुरविणाऱ्या स्वतंत्र मंडळ्याच तिकडे निघाल्या आहेत. यांनीं एक एक पौंडाचे भाग करून भांडवल उभारलें आहे. ह्या मंडळ्या आसपास घरें विकत घेतात किंवा बांधतात. हीं घरें सभासदांस भाड्यानें राहण्यास मिळतात. मंडळ्यांस साल—अखेर जो नफा मिळेल त्या पैकीं निम्म्यांत दुरुस्ती वगैरे होते. निम्मा सभासदांना वांटून देण्यांत येतो. पण तो रोख वांटीत नाहींत. सभासदांस जें घरभाडें द्यावें लागतें त्यांत वजा केला जातो.

## ( ११ ) सहकारी कोठ्या मुळें सामाजिक सद्गुणांत भर पडते.

( १ ) सहकारी चळवळींत अंग घालतां तुह्मांला नकळत देशाची सांपत्तिक, औद्योगिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्याचें श्रेय घेतां येते.

( २ ) परस्परांनीं परस्परांची कळकळ, सहानुभूती वाहिली पाहिजे हें तत्त्व आपोआप तुमच्या वर्तनांत शिरूं लागतें.

( ३ ) सहकारितेनें व्यापार करूं लागलें म्हणजे परस्परांवरच्या जबाबदारीमुळें व आपणा एकट्याचें जें नुकसान तेंच सर्वत्रांचें हें नेहमीं डोळ्यांपुढें असल्यानें मनुष्य नेहमीं जागरूक, धोरणी, आगाऊ विचार करणारा, मन आवणारा, सहिष्णु आणि विश्वासयोग्य आपोआप बनूं लागतो.

( ४ ) सहकारितेनें हातांत हात घातल्यावर जुटीनें केवढें कार्य होतें याची कल्पना होऊन मनुष्य संघशक्तीनें काम करण्याची जास्त जास्त हांव धरतो. एकींत बळ व बेकींत छळ याची त्यास पूर्ण ओळख पटते.

( ५ ) सहकारितेनें व्यापारांत सचोटी कशी राखावी याचा उत्तम धडा मिळतो. जेथें आपलेच दांत व आपलेच ओंठ असतात तेथें सचोटीचा अभाव धरून निभणार नाहीं हें त्यास माहीत होतें.

( ६ ) सहकारितेनें मनुष्य कर्जविमुक्त होऊन, त्याचें रिणकोपण जाऊन त्याच्या राहणीचा दर्जा श्रेष्ठ होतो. दर्जा वाजवीपेक्षां फाजील खालावला म्हणजे मनुष्य आपोआप किंवा निरुपायानें दुर्गुणपंकांत रुतत जातो.

७ सहकारितेनें दारिद्य जातें असें एकदां अनुभवास आलें म्हणजे मनुष्यस्वभावांत खिळलेलें नैराश्य आं-पोआप विलयास जाऊन त्यास नवा हुरूप वाटूं लागतो. नैराश्यानें पौरुषाचा, पराक्रमाचा ऱ्हास होत असतो, तो जर सहकारितेच्या रामबाण औषधीनें थांबवितां आला तर केवढी राष्ट्रीय कामगिरी होणार आहे !

८ सहकारितेनें स्वावलंबनाचा सामर्थ्यवान् धडा मिळतो.

९ सहकारी कोठ्याच्या योगानें अप्रामाणिक लोकांच्या डोळ्यांत अंजन पडतें. सहकारी कोठ्याच्या सचोटीच्या व्यवहारानें शेजारपाजारच्या उदम्यांनां धंदा बसतो अशी भीति उत्पन्न झाली म्हणजे तेही साधा मार्ग शुद्धीवर आल्यासारखे पत्करूं लागतात. वुलविच येथील सहकारी मंडळीनें शुद्ध व स्वच्छ अशा रोट्या तयार करण्याचा जेव्हां धडाका सुरू केला तेव्हां शेजार पाजारच्या दुकानदारांचीं धाबीं दणाणून त्यांनीं आपले लबाडीचे व्यवहार सोडून प्रामाणिकपणानें वागण्यास सुरवात केली.

**( १२ ) सहकारितेनें देशाच्या औद्योगिक परिस्थितीवर अत्यंत हितावह परिणाम होतो.**

१ सहकारितेनें आपले देशबांधव अन्नाला लागतात.

२ सहकारितेनें औद्योगिक व्यवहारांत काटकसर साधते. ती अशी:—कोठ्यांत गोंवलेल्या सभासदांनीं अवश्य अशा प्रापंचिक जिनसांचाच भरणा कोठ्यांत केला अस-

त्यानें फाजील चैनीचे पदार्थ तेथें येऊन धूळ खात पडत नाहींत. असे ते येऊन जेथें पडतात तेथें त्यांचा भुर्दंड गिऱ्हाइकांवर पडतो. पुनः तो एक प्रकारानें पडतो कां? प्रथम, दुकानांत निष्कारण गळाठा वाढतो, दुसरें, जागा अडते, तिसरें, मालाची नासधूस झाली कीं नुकसानी गिऱ्हाइकांना सोसावी लागते. हा प्रकार सहकारी कोठ्यांत होत नाहीं. शिवाय सहकारी कोठ्यांत कायमचें गिऱ्हाईक नक्की असल्यानें येथें जाहिरातीचा वगैरे खर्च करून गिऱ्हाईक वळवून आणावें लागत नाहीं. पुनः कोठ्यांत गरजेनुसारच माल येत असल्यानें येथें मालाच्या राशीच्या राशी येऊन पडल्या कीं भाव उतरले, माल कमी पडला कीं भाव चढले असा प्रकार होत नाहीं. सहकाऱ्यांनीं घाऊक मालाच्याही वखारी काढल्यानें सहकारी लोक स्वतःच मालाची खरेदी करणारे व स्वतःच मालाची विक्री करणारे झाले आहेत. या योगानें अडत्यांचा, मध्यस्थांचा सुळसुळाट वांचला. त्यांचा १०।५ ठिकाणीं हिंडून माल तपासून पहा, भाव पडताळून पहा; हा त्रास चुकला. सर्व सहकारी कोठे एक घाऊक मालाची वखार स्वतः चालवीत असल्यानें बाराशें लष्कर व तेराशें न्हावी असा प्रकार होत नाहीं. प्रत्येक जिनसाकरतां निरनिराळी अडत व प्रत्येक अडतीवर शेंकडों मॅनेजर व तितक्यांच्या तावडींतून फसगत न होतां बाहेर पडण्याकरतां शेंकडों परीक्षक दलाल किंवा दिवाणजी यांचा बोजा सहकारी कोठ्यांनां उचलावा लागत नाहीं. अर्थात् मालाच्या किंमती या मानानें चांगल्याच सैलावतात. पुनः आपणास लागणारा माल कोठें

चोख मिळेल हें नक्की माहीत असल्यानें फसगतीस जागाच उरत नाहीं.

आतां सहकारी कामकऱ्यांची उन्नती कशी होते ती पहा. १ यांनां मनाजोगतें वेतन येथें मिळवितां येतें. २ यांना गुरांप्रमाणें राबावें लागत नाहीं. ३ हे ज्या कारखान्यांत नोकरी करतात त्या कारखान्यांत स्वतःच मालक असल्यानें, दुसऱ्याच्या ताबेदारीनें कुचंबून न जातां, मोठ्या हुरुपानें काम उठवितात. ४ येथें ज्याला जो धंदा आवडतो तोच त्याला पत्करण्याची मुभा असते. ५ येथें यांनां आपआपल्या उद्योगधंद्याचें शिक्षण मिळवून तरबेज होतां येतें. सहकारी कारखान्यांत, वखारींत, कोठ्यांत काम करणाऱ्या कामकऱ्यांनां साल अखेर प्राप्तीचा वांटा मिळतो. हा प्राप्तीचा वांटा निराळा मिळत असल्यानें सहकाऱ्यांचें हळूंहळूं भांडवल सांचतें. हें सांचविण्याकरतां त्यांस पोटास चिमटा घ्यावा लागत नाहीं, किंवा कांहीं नाहीं. सर्व आपोआप यंत्राप्रमाणें जुळून येतें. अशा भांडवलाच्या जोरावर इंग्रजी सहकाऱ्यांनीं संपासारख्या कठीण प्रसंगीं मोठ्या धैर्यानें संकटांशीं झगडा केला आहे. नफ्यांतून सांचविलेल्या भांडवलावर इंग्रजी सहकाऱ्यांनीं कोठ्याच्या गंगाजळींतून उचललेल्या निरनिराळ्या उसनावार रकमांची फेड केली आहे. कोणी घरें बांधण्यास उचलेल्या रकमांची फेड या नफ्याचे हप्ते लावून देऊन केली आहे; कोणीं वेळप्रसंगीं उचलेल्या रकमांची फेड नफ्याच्या हप्त्यानें केली आहे; कोणीं तोच नफा परत व्याजीं लावून जणू विम्याची सोय परस्पर लावली आहे.

म्हणजे पदरचा एक कपर्दिकही न खर्चीं घालतां विम्या सारख्या भावी तरतुदी सहकारी कोठ्यामुळें अगदीं अल्प श्रमानें करून ठेवितां येतात. इंग्रजी सहकारी कोठेवाल्यांनीं आपल्या सर्व सभासदांची एकदम विमा उतरण्याची सोय काढून सहकारी चळवळीपासून निष्पन्न होणाऱ्या फायद्यांवर जणूं कळस बसविला आहे. ते कोठ्यांत समाविष्ट असलेल्या सर्व सभासदांचा एकदम विमा उतरतात. तो प्रकार असा:—मंडळीनें कोठ्यांत जी साल अखेर एकंदर खरेदी केली असेल त्या पैकीं प्रत्येक पौंडामागें एक आणा विम्याची वार्षिक वर्गणी म्हणून जमा करण्यांत येते. अशी विम्याची वर्गणी भरली म्हणजे प्रत्येक मनुष्य विमाच्या फायद्यास—म्हणजे त्यानें प्रतिवर्षीं एकच आणा भरला असला तर मृत्युसमयीं त्यास चार आणे मिळावयाचे. आतां समाईक खरेदी जर माणशीं दोन पौंड झाली तर वर्गणीही दोन आणे होऊन अंतीं ८ आणे रक्कम मिळावयाची. वार्षिक विक्री १० पौंड झाली तर मृत्यु समयीं २ पौंड मिळावयाचे. असें हें विम्याच्या वर्गणींचें व प्राप्तीचें प्रमाण आहे. पुनः वयाची किंवा शरीरप्रकृतीची येथें कसलीच अट्ट नाहीं. वर्गणी भरण्याची तरी केवढी सोपी सोय आहे. ती वार्षिक जो नफा आपल्यास कोठ्यांतून मिळेल त्यांतून भरावयाची. अशा संयुक्त विमा उतरणाऱ्या ९४ मंडळ्या १९०८ च्या सुमारास इंग्लंडमध्यें निघाल्या असून त्यांत सुमारें १२६८३२ मंडळी गोंवली गेली होती.

**(१३) सहकारी कोठ्यांचा सर्व श्रेष्ठ असा फायदा म्हणजे लोक शिक्षणाचा.**

लोक शिक्षणाचा शुद्ध पाया मूळ ओवननें घातला. ओवेन यास जसा सहकारितेचा जनक तसा प्राथमिक शिक्षणाचा पिता असें समजतात. ख्रिश्चन सोशियालिस्ट नांवाच्या समाज सुधारकांनीं निव्वळ धंदेवाईकांनां त्यांच्या फावल्या वेळांत धंदेशिक्षण मिळविण्याची सोय काढून देऊन त्यांस स्वयंपूर्ण करण्याची योजना केली. रॉकडेलच्या २८ कोष्टयांनीं हाच उदात्त कित्ता गिरविला होता. शिक्षणाकरतां नफ्यापैकीं २॥ टक्के एका बाजूला शिक्षणफंड म्हणून काढून ठेवण्याचा स्तुत्य उपक्रम करून ठेवला आहे. हा उदात्त नियम सर्व सहकारी मंडळ्या आज तागाईत पाळीत आल्या आहेत. या शिक्षणफंडांतून सभासदांच्या मुलांबाळांकरतां शाळा, धंदे शिक्षणाचे वर्ग, शास्त्रीय बालोद्यान पद्धतीचीं उपकरणें, सभासदांकरतां वाचनालयें, सामाजिक व नैतिक विषय समजाविणारीं व्याख्यानें, सहकारिता समजाविणारीं छोटीं छोटीं पत्रकें व पुस्तकें, सहकारी वृत्तपत्रें वगैरे नानाप्रकारचीं प्रज्ञा वाढविणारीं साधनें निर्माण करण्याच्या योजना होत असतात. आजमित्तीस सर्व सहकारी संस्थांनीं एक संघ निर्माण करून त्यांकरवीं एक कायमची शिक्षण कमेटी उभारली आहे. यांनीं लहान मोठ्या मुलांकरतां, अधिकाराप्रमाणें वर्ग काढून त्यांत देशाचा इतिहास, देशाच्या व्यापाराचा इतिहास, उद्योगधंद्याची परिस्थिती वगैरे विषय शिकविण्याची सोय केली आहे. यांनीं विश्वविद्यालयासारखी व्याख्यानमाला सुरु केली आहे. हे सहकारी लोक सामाजिक संमेलनें, पार्ट्या, सभा, जत्रा, प्रद-

कृपया पुस्तकें जपून वापरा

र्शनें वगैरे प्रकारच्या निरनिराळ्या प्रयत्नांनीं आपल्या कार्यांच्या शिक्षणाचा पाया घालीत असतात; इतकेंच नव्हे तर सहकाऱ्यांच्या स्त्रियाही आपआपल्या परीनें ह्या सत्कार्यास हातभार लावीत आहेत. या बाया घरोघर जाऊन घरांतील बायामुलींस सहकारितेची माहिती करून देऊन अनेक प्रकारांनीं ज्ञानदान करीत असतात. गोरगरिबांचा परामर्ष घेण्याकरितां यांनीं शुश्रूषा गृहाची स्थापना केली आहे.

वरील माहिती त्रोटकच कां होईना, पण वाचली म्हणजे सहकारी कोठ्याच्या द्वारां प्राथमिक, प्रौढ अथवा स्त्रीशिक्षणाचा प्रश्न किती सोपा करतां येण्याजोगा आहे याची कांहीं तरी कल्पना होईल. खेड्याखेड्यानें गांवोगांव, शहरोशहरीं जर आपण सहकारी कोठा उघडला तर अशा प्रत्येक ठिकाणीं कोठ्यातर्फे एक तरी वाचनालय, एक तरी वर्ग, काढतां येऊन आठवड्यांतून एक तरी व्याख्यान सामाजिक, कौटुंबिक किंवा नैतिक विषयावर तेथील लोकांनां ऐकवितां येईल. लक्षावधि रुपये खर्चून, अनेक कायदे घडवून शिक्षणाचें जें कार्य घडवितां घडवितां लोकनायक व मुत्सद्दी रंजीस येतात तें कार्य सहकारी कोठा सहजासहजीं घडवून आणतो हा केवढा चमत्कार? लोकांस नागरिकत्वाचें खरें शिक्षण मिळावें अशा करतां आज मित्तीस अहोरात्र योजना निघत आहेत; पण सहकारी कोठ्यांत कमेटी असते, कार्यकारी मंडळ असतें, बहुजन समाजाच्या मतानें तेथील कार्यभाग हांकला जातो; दरमहा, तिमाही, साहामाही, वार्षिक इत्यादि सभांस एकत्र जमून हितप्रश्नांचे

खल करीत असतात; आढावा काढतात; मंडळ्यांचें आह-
वाल तयार करतात; हीं कामें लहान सहान नाहींत. प्र-
त्येक स्त्री पुरुषास या योगानें खऱ्या नागरिकाचें शिक्षण
आपोआप मिळतें. इंग्लंडांत सरासरी २९०००० स्त्रीपुरुष
वर्षांतून ४ वेळां अशा व्यवहारांचा निकाल लावण्या-
करतां एकत्र जमतात. आज अगदीं साधारण प्रती-
लोकांनीं घाऊक वखारींचा सुमारें २००००००० पौं
चा व्यवहार आटोपला आहे. हा संस्था चालविण्याच्या
लायखीचा काय सामान्य मगदूर आहे ?

श्री सो गं. पं.
वाचनालय, भोर
2007